पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

वर्ष : १ । अंक तेरावा । मराठी पाक्षिक । मूल्य :२५ ₹ । दिनांक १ ते १५ मार्च २०१९

# हल्ला प्रतिहल्ला




YuZen
Shaping Career
YuZen
Consultancy Services
JOB & EDUCATION OPPORTUNITIES IN JAPAN
Starting Technology Training in IT, Automotive Design(Mechanical),
Electrical & Electronics and Civil Engineering from 26-Jan-2019.
FREE JLPT N5 Level Coaching for students who opting for Tech Training.
1 Million Jobs in Japan for all the sectors with 200,000 jobs in IT sector available in next 5 years...
OUR STUDENT'S WORKING
JAPAN-13 MNC's IN INDIA-5
HIGHER EDU in Japan -1
www.yuzenconsultancy.com
Technology Training + Japanese Language (JLPT) Training
Highly Advanced Technology Lab to take care of Latest Technology Skill Set Training
Please register yourself for following high demanding Job Oriented Skills in Japan
Information Technology
redhat
CATIA
AUTODESK AUTOCAD
Linux Certified Engineer/ Server Side Engineers/ Desktop Engineers
Automation Programming – Python & Ruby
Cyber Security & Ethical Hacking
Core & Advance Java
Data Science
Automotive Design/Mech Engineering
CATIA/ANSYS/NX/AUTOCAD
Electrical & Electronics Engineering | PLC SCADA/MATLAB/EMBEDDED PROGRAMMING/VLSI DESIGN & PROGRAMMING
CIVIL Engineering
AutoCad Civil
STAAD.Pro
STAAD Pro
ETABS
Etabs
MATLAB
ANSYS Civil
Interested candidates/students please contact.
Mahesh Khaire: +91 9820963268
Sushant Mankar: +91 91300 21631
Chaitanya Patil: +91-7972472853
Training Location
24 Ekmat Society,Near Kala Maruti Mandir, Omkar Nagar - Besa Road, Near Jayawant Nagar, Omkar Nagar Area Nagpur -440027
ADMISSION OPEN
Fees: Below market rate & Depends upon each course.
* Faculty - Industry Experts. Some of the Faculties are having International work experience.
* On the Job Development & Design practice.
* Industry Standard Process Sessions from Industry experts.
* Free Career Guidence and Personality development mentoring.
* Free Communication skill development sessions.
* 24x7 Availablitiy of Technology Lab for Project development & practice
* Terms & Conditions are apply.
YuZen
Consultancy Services

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
शिवा बा. पाटील

**मुखपृष्ठ**
सचिन ओव्हाळ

**संपादकीय पत्रव्यवहार**

११, तळमजला, बी ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.)
मुंबई ४०००१६

**संपर्क**

८८८८५४१८२२
९५८८४५११५१
E mail :
thepeoplespost2014@gmail.com

(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
*अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असेलच असे नाही.

द पीपल्स पोस्ट | ८८८८५४१८२२

– जाहिरात विभाग संपर्क
९८२१४४५४०९/ ८८०५१५१४५२

– वर्गणीदारांसाठी संपर्क
**महाराष्ट्र / मुंबई :**
गजानन आठवले : ९०७६०६५२१५
**विदर्भ** : अंकुश वाकडे : ९४२१४२४२४२
**मराठवाडा** : सचिन : ७३५००९१५६९
**कोकण** : संकेत तांबे : ७७३८७८४१३२

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष
**द पीपल्स पोस्ट** या नावाने काढावा

पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : १ ।
अंक तेरावा । मूल्य : रु. २५ । दिनांक १ मार्च ते १५ मार्च २०१९

संपादकीय ५
कव्हर स्टोरी : रात्र वैऱ्याची आहे... विजय नाईक ८
दलितांचा हिंदुत्त्वाच्या उदारमतवादावरील विश्वास उडाला... प्रो. सुखदेव थोरात १४
मोदीया प्रचाराची बरसात जयदेव डोळे १८
पुरुषप्रधान संस्कृतीमुळे बहुजन महिलांचे राजकारण मर्यादित डॉ.माला मुखर्जी २२
दलित साहित्य आणि आफ्रो-अमेरिकन साहित्य : दुय्यम ओळखीचे सामाईक पैलू डॉ. प्रमोदकुमार २६
व्यक्तिविशेष : गुनित मोंगा प्रकाश खंडेलोटे ३२
ग्रंथ परिचय : प्रेमचंदांच्या दलित कथांमधून व्यक्त होतो विद्रोह अन् नकार! – सूर्यनारायण रणसुभे ३४
मुलाखत : डॉ. सतीश ढवळे चेतन शिंदे ३६
कविता : निळी पाखरं – रविचंद्र हडसनकर ४१
आजकालचे प्रश्न : पंक्चरवाला ४२
ग्रेट थॉट्स ४५
कोण काय बोलतं... ४६

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. *संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील.) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. नोंदणी क्र. MAHMAR/2018/76460

## सर्वच लेख वाचनीय

१ ते १५ फेब्रुवारीच्या अंकातील बहुतांश लेख वाचनीय होते. २०१४ च्या निवडणूक जाहीरनाम्यात दलितांच्या सक्षमीकरणाचं आश्वासन देणारा भाजप आता कसा दुटप्पी वागतोय, हे सांगणारा प्रो. सुखदेव थोरात यांचा 'दलितांचे सक्षमीकरण कसले? हा तर भाजपचा राजकीय फंडा' हा लेख वास्तवावर प्रकाश टाकणारा होता. सरकार दलितांच्या उद्योगाची निराशा करीत असल्याचे प्रो. थोरात यांनी आकडेवारीसह दाखवून दिले आहे. सत्ता हाती आल्याने भाजपा नेत्यांचा उद्दामपणा वाढल्याच्या घटना उद्विग्न करणाऱ्या आहेत, हे वस्तुनिष्ठपणे मांडणारे पी.बी. सावंत यांचे मंथनही विचार करायला लावणारे आहे. स्वातंत्र्यांच्या ७० वर्षांनंतरही सामान्यांच्या भूक आणि बेरोजगारीचा प्रश्न कायम असल्याचे प्रकाश खंडेलोटे यांनी 'भय, भूक आणि बेरोजगारीचा आगडोंब' या लेखातून स्पष्ट केले. हा लेख त्यातल्या आकडेवारीमुळे वाचनीय झाला.

**– संजय पी. पाटील,** अहमदनगर.

## आजकालचे प्रश्न सदर खासच

आजकालचे प्रश्न हे 'पंक्चरवाला'चं सदर वाचकाच्या आवडीचं सदर बनत चाललंय. १ ते १५ फेब्रुवारीच्या अंकातील या सदरात प्रसिद्ध झालेले तीन किस्से मजेशीर होते. साहित्य संमेलनात सामाजिक विषयांवर मंथन होणं गरजेचं असताना नको ते वाद तेथे उदभवतात, हे सांगणारा 'साहित्य संमेलनवाल्यांनी घाण केलीच' हा छोटेखानी लेख मराठी महामंडळाच्या कारभारावर टीकास्त्र सोडणारा होता. 'अपघाती पंतप्रधान आणि घाती डावपेच' हा लेखही उत्तमच.

**– एस.व्ही. गायकवाड,** मुंबई.


## शिक्षण क्षेत्रातील दुरवस्थेचं चित्रण

१६ ते २८ फेब्रुवारीच्या अंकातील 'पापाचा बाप कोण?' हे संपादकीय शिक्षण क्षेत्राच्या दुरवस्थेचं चित्रण करणारं होतं. शैक्षणिक गुणवत्तेच्या अनुषंगाने जे काही घडतं आहे, ते चीड आणणारंच आहे. गोर-गरिबांना शिक्षण महाग करणाऱ्या तथाकथित शिक्षण सम्राटांनी शिक्षण क्षेत्राला कसे वेठीस धरले आहे. याचे विवेचन संपादकीयमधून देण्यात आले. त्यामुळे संपादकीय अभ्यासपूर्ण होते.

**– पी. जे . ठाकुर,** पुणे.

## नवहिंदुत्ववादाचा उच्छाद थांबणार कसा?

भांडवलाचे 'धर्म'युद्ध ही दत्ता देसाई यांची १६ ते २८ फेब्रुवारीच्या अंकातील कव्हरस्टोरी सत्ताधाऱ्यांचा नंगानाच कथन करणारी होती. भ्रष्टाचार आणि गुन्हेगाराला अप्रत्यक्षपणे पाठीशी घालणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी जो काही स्वैराचार माजवला आहे तो संतापजनक आहे. सत्ताधाऱ्यांनी धारण केलेल्या नवहिंदुत्ववादाचा चेहरा विविध घटनांच्या माध्यमातून समोर आल्याचे देसाई यांचे म्हणणे पटणारेच आहे. **– सरिता संघई,** ठाणे




## भाजपचे खोटे दलित प्रेम

भाजपचे दलित प्रेम किती खोटे आहे, हे सांगणारा प्रो. सुखदेव थोरात यांचा 'भाजपशासित राज्यांमध्येच दलित अत्याचारांत वाढ' हा लेख आम्हाला खूप आवडला. एकिकडे दलितांप्रती आपल्याला किती कळवळा आहे, हे दाखवायचे आणि दुसरीकडष दलितांवरील अत्याचार गांभीर्याने घ्यायचेच नाहीत, हे भाजपचे दुटप्पी वर्तन प्रो. थोरात यांनी या लेखातून उघड केले.

**– अंजन रावके,** मुंबई

### वाचकांना आवाहन

'**द पीपल्स पोस्ट**'ला महाराष्ट्रभरातून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. वाचकांच्या पसंतीस उतरेल असा अंक देण्याचा आमचा प्रयत्न असतो. वाचकांच्या प्रतिक्रियाही आम्हाला अंक अधिकाधिक वाचनीय देण्याच्या दृष्टीने प्रेरणादायी ठरतात. वाचकांनी प्रतिक्रिया thepeoplespost2014@gmail.com या मेलवर पाठवाव्यात. - **संपादक**

## कोण काय बोलतं भन्नाटच

'कोण काय बोलतय' हे सदर मला भन्नाटच वाटते. विविध विषयांवरची मान्यवरांची मतं, प्रतिक्रिया, अभिप्राय, वेगळ्या स्वरुपात वाचून चांगलं वाटतं, यातील मान्यवरांची निवड योग्यच असते.

**– श्रावण साजन,** औरंगाबाद.

## लोकांनी आता तरी सुधारले पाहिजे

'भाजपला सत्ता देऊन आता लोकांना पश्चाताप' हे डॉ. सुर्यनारायण रणसुभे यांनी चेतन शिंदे यांना दिलेल्या मुलाखतीत व्यक्ती केलेले मत म्हणजे प्रातिनिधीक स्वरुपातील प्रतिक्रियाच आहे. १६ ते २५ फेब्रुवारीच्या अंकात ही मुलाखत प्रसिद्ध झालेली आहे. या मुलाखतीत रणसुभे यांनी सत्ताधाऱ्यांना वैतागलेल्या जनतेच्या भावनाच बोलून दाखवल्याचे दिसते.

**– सुहास वाघमारे,** पुणे.

संपादकीय

# जोड्या जुळवा, मते मिळवा...



**निवडणुकांचा** हंगाम म्हणजे जोड्या जुळवण्याचा हंगामही असतोच. सामान्य माणसाला तो क्षणाक्षणाला असतो. सुख-दुःख, समाधान-असमाधान, महागाई-स्वस्ताई, बेकारी-नोकरी, दंगल-शांतता अशा जोड्या जुळवत त्याला रोज श्वास घ्यावा लागतो. असा श्वास घेत घेतच त्याला जगावं लागतं. जगता-जगता मरण अनुभवावं लागतं; कारण तो सामान्य असतो. पण त्याच्या याच गोष्टींचं राजकारण करणारे, सत्तेत पोहोचणारे, नेते बनणारे असामान्य असतात. लोकच त्यांना आणि त्यांच्या चार-चार पिढ्यांना असामान्य बनवत असतात. एकेक जण पन्नास-पन्नास वर्षे सामान्यांच्या मानगुटीला चिकटलेला असतो वेताळासारखा... सामान्यांच्या मानगुटीवर कायमचा मुक्काम करून असतो. तेथून तो निवडणुका आल्या की लोककल्याणाची भाषा बोलत असतो. गरिबांचं अधिकाधिक कल्याण व्हावं म्हणून बुलेटप्रूफ गाड्यांतून फिरतो. पंचतारांकित हॉटेलवर लोककल्याणाची स्ट्रॅटिजी आखतो. कोणताही प्रश्न न विचारता एकामागोमाग जाणारी मेंढरे हा सारा खेळ पाहतात. मोफत पाहतात. त्यासाठी मनोरंजन कर नसतो. आपल्या बंडीच्या खिशात जपून ठेवलेलं आणि राज्यघटनेनं व डॉ. बाबासाहेबांनी दिलेलं मत हलक्या हातांनी टाकायचं असतं. अर्थात, जोड्या जुळवणाऱ्या पुढाऱ्यांच्या ओंजळीत. त्यांची ओंजळ भरली की लोकांचं पोट भरतं. त्यांनी समाधानानं ढेकर दिला की मेंढरंही खोटा खोटा का असेना ढेकर देतात किंवा फार तर त्यांना ढेकर फुटतो असं म्हणू या. मेंढरं निष्ठावान असतात. त्यांच्यात काही निष्ठावानांच्या जाती नसतात. उदा. ७५ पूर्वीचे आणि नंतरचे. मशीद पडण्यापूर्वीचे आणि नंतरचे. काही झालं तरी मेंढरं आपल्या धन्याला आपलं सर्वकाही देतात. तो आपल्याला खाटकाकडे नेणारा असो किंवा बिरोबाच्या जत्रेत टकरीसाठी नेणारा असो. 'सर सलामत तो पगडी पचास' हे जसं असतं ना तसंच अगदी तसंच 'धनी सलामत तो मेंढरं पचास' यासारखं. लोकांच्या नावानं, लोकांच्या भल्यासाठी त्यांच्याच लंगोट्या काढून घेण्याच्या खेळाला आपण लोकशाही म्हणतो. लोकांच्या नावानं टिऱ्या बडवून आवाज काढण्याला अभिजात किंवा शास्त्रीय संगीत म्हणतो. विशेष म्हणजे, या संगीताला अभिजात म्हणून दर्जा मिळालाच पाहिजे यासाठी मोर्चा काढतो. टी.सी.ला दणके देत विनातिकीट दिल्लीला पोहोचतो. लाल किल्ल्यावर खोटं खोटं रवंथ करणाऱ्या मेंढरांना भेटायला जातो. त्यांचं निवेदन घ्यायला मेंढरांचा मालक येतो, तेव्हा मेंढरांना कोण आनंद झालेला असतो! जणू काही आपल्याला चारा मिळालाच असं वाटायला लागतं. पूर्वी मेंढरांना निवडणुकीच्या वेळेला काळ्या पैशांत वैरण दिली जायची, आता ती सरकारी खर्चात म्हणजे मेंढरांनीच भरलेल्या करातून जमलेल्या पैशांतून दिली जाते. म्हणजे असं, की मतदान दारात आलं की त्यांच्या नावावर अनुदान जमा केलं जातं. पूर्वी दिली जाणारी खासगीतली वैरण आणि आता सरकारी शिक्क्यातली वैरण यात काय फरक? वैरण कोणतीही असो, तिच्या शेवटी एक अदृश्य गळ बसवलेला असतो. तो मेंढरांना दिसत नाही. गळाला सेन्सर असतो. तो बरोबर मेंढरांच्या काळजात राज्यघटनेनं ठेवलेलं मत उचलतो. वैरणीच्या मोबदल्यात आपला आत्मसन्मान असलेलं मत आपण कसं देऊन बसलो किंवा विकून बसलो हे मेंढरांना अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये भाग घेऊनही कळलेलं नाही. मेंढरांच्या मालकालाच ते कळतं. कारण ते त्यात तज्ज्ञ असतात. एक-दोन नव्हे तर सत्तर वर्षे हे चाललंय. सत्तर वर्षांपूर्वी या गोष्टीला विरोध करणारेही आज हेच करतात आणि मोठ्या आवाजात छाती फुगवून सांगतात, की सत्तर वर्षांपासून हे चालत आलंय. म्हणजे बघा, त्यांनी चिमटीत पकडून खाल्लं म्हणून यांनी मुठीत

पकडून खायचं! सत्तर वर्षांचा इतिहास पुढं-मागं किंवा फॉरवर्ड, रिव्हर्स करायचा. किती भारी आहेत मालक! काहींनी मंदिरात, काहींनी कुंभमेळ्यात, काहींनी नागव्या धर्मनिरपेक्षतेमध्ये हे सारं खास प्रशिक्षण घेतलंय. स्कॉलरशिपची परीक्षा दिलीय. ब्रिलियंट जनरेशन आहे. यांनी केवळ श्रद्धेच्या जोरावर साऱ्या देवांच्या जन्मतारखा, मृत्यूतारखा, जन्मस्थळं शोधून काढलीयत. फक्त यांना माणसाचा जन्म, त्याचं दुःख आणि दुःखाचं मूळ शोधायचं नाहीय. त्याच्यासाठी ड्रोन वापरायचा नाही किंवा सॅटेलाईट वापरायचा नाहीय.



निवडणुकीच्या कोंबड्यानं लाल किल्ल्यावरून भली मोठी बांग दिली की यांचा जोड्या लावण्याचा म्हणजे जुळवण्याचा खेळ सुरू होतो. लोक तो मोठ्या उत्सुकतेनं पाहतात. त्यांच्या कल्पनेतही कधी न आलेल्या घटना घडून जातात. भाजपबरोबर युती करणार नाही अशा आणाभाका घेणारा, अंबाबाईची शपथ घेणारा, छातीची भाषा आणि मर्द मावळ्यांची भाषा करणारा शिवसेनेचा खोटा का असेना पण ढाण्या वाघ ए.सी. हॉटेलमध्ये जातो. जसा बिबट्या नागरी वसाहतीत येतो तसा हा वाघ लाल दिव्याच्या गाडीतून भल्या मोठ्या लाल-लाल हॉटेलमध्ये जातो. डरकाळ्या मारतच युती झाल्याचं सांगतो. तीस वर्षांपूर्वीची कमळ आणि धनुष्यबाण जोडी कायम असल्याचं जाहीर करतो. गेली पाच वर्षे कमळाच्या नाजूक पाकळ्यांना जखमी करण्याचा प्रयत्न करणारा वाघ कमळाला कुरवाळतो. सुरेश भटांचं गाणं म्हणतो. 'किती दिसांत लाभला निवांत संग, मालवूनी टाक दीप, चेतवूनी अंग अंग...!' विस्कटणार विस्कटणार असं सांगितली जाणारी जोडी सत्तेचं फेविकॉल लावून जाम चिकटवली जाते. आता निदान निवडणुकांचे निकाल लागेपर्यंत तरी तिला मरण नाही आणि मेलीच तर आत्मा अमर असणार आहे. भगव्यांच्या तत्त्वज्ञानात मरण असं कुणाला नसतंच. आत्म्यात, महाआत्म्यात, अजरामर आत्म्यात ते जगत असतात.

आता आत्माचं हंगामी अस्तित्व मानणारे काही जण आपल्याकडे आहेत. काही आत्मावादी असल्यानं हे आपोआपच अनात्मवादी झाले आहेत. त्यात बाबासाहेबांची सारीच नसली तरी काही लेकरं आहेत. शिवशक्ती-भीमशक्ती अशी जोडी ते तयार करतात. त्यासाठीचं तत्त्वज्ञान करतात. भगवा, निळा भंडारा एकाच कपाळावर कसा लावायचा याचंही तत्त्वज्ञान तयार करतात. जे फक्त निळा झेंडाच घेऊन फिरतात, त्यांनाही आपल्या कळपात ओढण्याचा प्रयत्न करतात. त्याला ऐक्य असं नाव देतात. अशा प्रयत्नातून आलेलं तात्कालिक यश मिरवत राहतात. बीएसपी, बीजेपी जोडी कशी तयार झाली होती. बीएसपी, एसपी जोडी कशी तयार झाली असं सांगत चौकाचौकातल्या पुतळ्यासमोर गारुड्याचा खेळ लावतात. त्याच्याकडे नागनाथ असतो. सापनाथ असतो. ते त्याला गोंजारतात आणि खेळावर लोकांनी पैसे टाकले की पाच वर्षांसाठी खेळ बंद करतात. बघता-बघता हे मेंढरांचा बुद्धिभेद तयार करतात. मेंढरांना गुंगी आणणारं औषध यांच्याकडंही असतं. या लोकांच्या ओठावर एक वाक्य कोरलेलं असतं, झेंडा कुणाचाही असला तरी दांडा भीमाचा असतो. बरं आहे की हे पाहायला भीम नाहीय; अन्यथा हा दांडा त्यांनी यांच्या डोक्यावर फोडला असता आणि तिथं निळ्या दांड्याचा निळा झेंडाच रोवला असता. बापाच्या माघारी काय काय करतात पोरं... कसल्या कसल्या कविता रचतात पोरं... जी चारोळी किंवा वात्रटिका यात्रे-जत्रेत म्हणायची तीच संसदेत सांगतात पोरं... उदंड झालीयेत पोरं... कोण काँग्रेसच्या, कोण राष्ट्रवादीच्या, कोण भाजपच्या, कोण शिवसेनेच्या, कोण डाव्यांच्या, कोण उजव्यांच्या दावणीला बांधली गेली आहेत पोरं...

आता म्हणजे कम धर्मनिरपेक्षतावाले आणि बिनधर्मनिरपेक्षतावाले तर जोड्या जुळवण्यात पटाईत. जोड्या जुळवण्याचं एक खास पेटंट बारामतीत विकसित झालंय, तर दुसरं खानदानी नागपूरमध्ये. तिथे तर डॉ. बाबासाहेब आणि हेडगेवार, म. फुले आणि गुरुजी, सावित्रीबाई आणि सरस्वती अशा जोड्या जुळवल्या जातात. त्यांचे चेले म्हणजे भाजपवाले रामवादी आणि यूपीतले आंबेडकरवादी, कमळवादी आणि अकाली, कमळवादी आणि एआयएडीएमके, कमळवादी आणि काश्मिरात मेहबुबावादी, शेतकरीविरोधक विरुद्ध शेतकरीवादी अशा जोड्या जुळवतात. जोड्या जुळवण्यात





त्यांचा हातखंडा असतो. जोडी जुळण्यात अडचण आली की त्यांच्याकडे सध्या असलेल्या राष्ट्रीय पुरस्कारांचा वापर करतात. गांधीवादाचा बुरखा वापरून खादीत लपणारे यांचं अजून वेगळं. सोनिया गांधींना परकीय नागरिक ठरवणारे आणि त्यातून उठाव करणारे आता त्यांच्याबरोबर आहेत. त्यांना डावेही पाहिजे आहेत. मध्यमवर्गीयही पाहिजे आहेत. अंशतः मध्यमवर्गीयही पाहिजे आहेत. कमळापासून दूर राहिलेले सारे काही त्यांना पाहिजे. डावे-उजवे, उजवे-काँग्रेस, प्रादेशिक-राष्ट्रीय अशा अनेक जोड्या जुळवत त्यांची महाआघाडी तर उजव्यांची अतिमहाअघाडी झालीय. आघाडीत जाण्यासाठी अनेकांनी नवे पक्ष आणि नव्या संघटना तयार केल्या आहेत. जगातील सर्वांत मोठी लोकशाही भारतात असल्यानं इथं पक्ष जन्माला येण्यावर कुठलंही बंधन नाही. काहीच जमलं नाही तर काढा राष्ट्रीय पक्ष, काहीच जमलं नाही तर खेळा राजकारण... चित्रविचित्र गुणधर्माच्या जोड्यांचा आता ऋतू सुरू झालाय. आता कोणी म्हणेल की मतदारांची दिशाभूल नाही का होणार? पण दिशाभूल करण्यासाठीच या गोष्टी घडत असतात. निवडणुका तोंडावर आल्या की युद्धाचे ढग जमतात. निवडणुका तोंडावर आल्या की कल्याणकारी राष्ट्राची आठवण साऱ्यांना होते. निवडणुका आल्या की यांना शेतकऱ्यांचे बँकेतील कर्जबाजारी खाते आठवते. आदिवासी आठवतात. भारत खरंच एक चांगलं राष्ट्र बनवायचं असंल



तर सर्वप्रथम या जोड्यांचा खेळ मेंढरं बनलेल्यांनी समजून घेतला पाहिजे. आपल्यावर लादलेलं मेंढराचं रूप फेकून दिलं पाहिजे. आपल्याला डॉ. बाबासाहेबांनी कोणती लोकशाही दिली आणि तिच्या चिंध्या करणारे हे चिंध्यापीर कोण आहेत हे समजून घेतलं पाहिजे. प्रशासनाने, पुढाऱ्याने केलेल्या चुका दुरुस्त करता येतात. त्यांना हुसकून लावता येतं. कुंभमेळ्यात नाक बंद करून डुबकी मारायला आणि पावन व्हायला सांगता येतं. पण मतदारांनी केलेल्या चुका दुरुस्त करता येत नाहीत. त्या अदृश्य झाल्या तरी व्रण कायम राहतात. म्हणूनच

***ऐका हो ऐका,***
***मेंढरं बनलेल्या मतदारांनो ऐका***
***मेंढरातून बाहेर पडणाऱ्यांनो ऐका***
***शांत होऊन ऐका***
***ध्यान देऊन ऐका***
***चित्त देऊन ऐका***
***आता चुकायचं नाही***
***मतदानाला मुकायचं नाही***
***तंगडी-बाटलीसाठी***
***मत कोणा विकायचं नाही***
***खोट्या चेहऱ्यांना फसायचं नाही***
***खोट्या जोड्यांना भुलायचं नाही***
***आपण लोकशाहीचे मालक***
***गुलामासारखं वागायचं नाही***
***आपण लोकशाहीचे मालक***
***बाबांच्या राष्ट्राला विसरायचं नाही***
***कुणाच्या नातवंडांचं भलं करायचं***
***की लोकशाहीचं गाणं गायचं***
***गणित कधी चुकायचं नाही...***

राजकारणात मतांसाठी कसल्याही जोड्या चालतात. जोडीत काय आहे यापेक्षा मन मिळवण्याची त्यांची क्षमता किती हे महत्त्वाचे असते. लोकशाहीत विशेषतः बाबासाहेबांना नको असलेल्या अती राजकीय लोकशाहीत अशा जोड्या नको होत्या. राष्ट्रापेक्षा धर्म आणि राजकारण श्रेष्ठ मानणाऱ्या जोड्या नको होत्या. सुरूप विरुद्ध दुरूप, पिकलेले विरुद्ध सडलेले, सुगंधी विरुद्ध दुर्गंधी, अतिरेकी विरुद्ध मवाळ अशा जोड्या नको होत्या. त्यामुळे सामाजिक आणि आर्थिक समता कधीच येत नाही. सत्ता मिळवणाऱ्या टोळ्या तयार होतात. मनांवर घाला घालणारे तयार होतात. ते मंदिर लुटतात व स्वतःचे नाव कोरलेला कळसही मंदिराला देतात. राज्यघटनेची पूजा करणाऱ्यांनी या जोड्यांच्या नादाला न लागता सर्वप्रथम लोकशाही साक्षर करायला पाहिजे. घटनेचा योग्य वापर करायला शिकले पाहिजे. संमोहनाचा खेळ करून गुंगीच्या जगात आपल्याला नेऊन सोडणाऱ्यांपासून सावध राहिले पाहिजे.

●●●

एकीकडे सुरक्षा दले तर दुसरीकडे अतिरेकी, अशा दुष्टचक्रात आम्ही सापडलो आहोत. दहशतवाद नष्ट व्हायला हवा. पण त्यासाठी केवळ लष्करी उपाय करून अथवा युद्ध केल्याने तो आटोक्यात येणार नाही. 'वुई हॅव टु एनलार्ज डेमॉक्रॅटिक स्पेस इन काश्मीर.' मी युवकांना शस्त्रे सोडण्याबाबत सांगतो, तेव्हा प्रथम लष्कर व पोलिसांनी शस्त्र सोडली पाहिजे, असे ते उत्तर देतात. काश्मीर इज ब्लीडिंग ऑन बोथ साईड्स, पीपल अँड सोल्जर्स. टीव्ही चॅनेल्समधून रोज विष पेरले जात आहे. अशा परिस्थितीत सूज्ञ विचार सुचणार कुणाला?''












विजय नाईक

नवी दिल्ली


**पुलवामा** येथे १४ फेब्रुवारी रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या बारा दिवसांनंतर २६ फेब्रुवारीच्या मध्यरात्री साडेतीन वाजता भारतीय हवाई दलाच्या मिराज-२००० या लढाऊ विमानांनी पाकिस्तानमधील खैबर पख्तूनवाच्या बालाकोट जंगलातील जैश-ए-महंमदच्या प्रशिक्षण छावणीला अवघ्या दीड मिनिटात उद्ध्वस्त केले व पुलवामाच्या हल्ल्याचा वचपा काढला. या कारवाईत हवाई दलाच्या अन्य विमानांनीही भाग घेतला. विमानांना प्रत्यक्ष ताबारेषा ओलांडून काही कि.मी. आत जावे लागले. १९७१ च्या युद्धानंतर प्रथमच हवाई दलाने सीमापार केली. यापूर्वी २८ व २९ सप्टेंबर २०१६ रोजी केलेल्या सर्जिकल स्ट्राईकमध्ये लष्कराच्या जवानांनी पाकिस्तानात प्रवेश करून दहशतवाद्यांना कंठस्नान घातले होते. यावेळी 'हवाई' हल्ल्याचा पर्याय वापरण्यात आला. कारण, पुलवामातील हल्ल्यासारखाच आणखी हल्ला करण्याच्या तयारीत जैश-ए-महंमद असल्याची माहिती भारताला मिळाली होती. पहिल्या सर्जिकल हल्ल्याचा पाकिस्तानने इन्कार केला होता. तसे यावेळी झाले नाही. कारण, 'जैश'च्या सुमारे तीनशे अतिरेक्यांसह या छावणीचा म्होरक्या व मसूदचा जावई मौलाना युसूफ अझहर ऊर्फ उस्ताद घौरी या कारवाईत ठार झाले. त्यांच्यापैकी अनेकांची नावेही भारताकडे आहेत. भारताने केलेल्या कारवाईबाबत कोणत्याही मुस्लिम राष्ट्राने पाकिस्तानची बाजू घेतलेली नाही, हे विशेष. सीमेवर एक प्रकारे युद्धच सुरू झाले आहे.

पुलवामाच्या हल्ल्यात ठार झालेल्या केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या चाळीस जवानांच्या हौतात्म्याभोवती देशातील वातावरण गेले दहा दिवस फिरत होते. बालाकोट हल्ला हा 'गैरलष्करी' असल्याचे परराष्ट्र सचिव विजय गोखले यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. हल्ल्याचा सूत्रधार व जैश ए महंमदचा म्होरक्या मसूद अजहर पाकिस्तानमध्ये आजही मोकाट आहे. त्याला अथवा त्याचं कार्यालय ताब्यात घेतल्याच्या वृत्ताचा पाकिस्तानने इन्कार केलाय. 'पाकिस्तान को मुँहतोड जवाब दिया जाएगा,' असे दुसऱ्याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केले होते. बालाकोट येथील हल्ला हे 'मुँहतोड जवाब' मधील पहिले प्रत्युत्तर समजावे लागेल. दहा दिवस जवानांच्या कुटुंबियांचा आक्रोश मन उद्विग्न करीत होता. संताप शिगेला पोहोचला होता. गेल्या तीस वर्षात हजारो सैनिक, निमलष्कराचे जवान व निष्पाप लोकांचे बळी गेले. पुलवामा हल्ला व बालाकोट येथील कारवाई याकडे पाहता, आपल्याला जगातील अनेक देशांतून पाठिंबा मिळत असला, तरी दहशतवादाची लढाई अखेर भारतालाच एकट्याने लढावी लागणार आहे. याची परिणती निम-क्षमतेच्या (लो इन्टेन्सिटी) युद्धात होणार काय? या प्रश्नाचे उत्तर मिळावयास

एका दिवसाचाही अवधी लागला नाही. कारण, पाकिस्तानी हवाई दलाच्या एफ-१६ विमानाने भारतीय सीमेत प्रवेश करताच त्याला जमीनदोस्त करण्यात आले. तर, भारतीय मिग-२१ विमान पाडून त्यातील दोन वैमानिकांना ताब्यात घेतल्याचा दावा पाकिस्तानने केलाय. दोन्ही बाजूंनी कारवाईची तीव्रता वाढू शकते.

पुलवामाच्या लेथपुरा येथील हल्ल्याचा तपशील हळूहळू पुढे येत आहे. अतिरेकी आदिल अहमद दर याला 'जैश'च्या झेंड्यासह दाखविलेल्या व्हिडिओत हल्ला केल्याचे 'जैश'ने कबूल केले. जम्मू ते श्रीनगर मार्गावर केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या २५०० जवानांना घेऊन जाणाऱ्या ताफ्यावर आदिल दर याने विस्फोटांनी भरलेल्या मोटारीसह हल्ला केला. जम्मू काश्मीरचे राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी ही घटना म्हणजे 'गुप्तचर संघटनेचा ढिसाळपणा (फेल्यूअर ऑफ इंटेलिजन्स)' असल्याचे जाहीर केले. परंतु, केंद्र सरकारने त्याबाबत कुणालाही जबाबदार धरलेले नाही. एवढ्या मोठ्या ताफ्यावर हल्ला होण्यापूर्वी या संघटना गाफील राहिल्या, असे म्हणावे लागेल. या संदर्भात, राष्ट्रीय सुरक्षा मंडळाचे सदस्य ले. जनरल एस.एल.नरसिंव्हन म्हणाले, ''काही हल्ल्यांबाबत पूर्वसूचना मिळते. तथापि, हल्ला केव्हा व कुठे होणार याचा तपशील दिला जात नाही. त्याचा फायदा उठवून दहशतवादी हल्ला करतात. त्यामुळे शंभर टक्के काहीच सांगता येत नाही.'' १९८९ पासून काश्मीरमध्ये सुरू असलेली घुसखोरी व दहशतवादी घटना व अस्थिरतेमुळे आजवर तब्बल ७० हजार लोक ठार झाले. जगातील कोणत्याही राष्ट्रात एवढ्या मोठ्या प्रमाणावर सातत्याने दहशतवादी हल्ले झालेले नाहीत. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेला अनन्यसाधारण महत्त्व आले असून त्याचे सूत्रबद्ध धोरण ठरविण्याची गरज भासू लागली आहे. बऱ्याच वेळा हल्ला झाल्यावर सरकारी यंत्रणा जागी होते. तोवर व्हायचे ते नुकसान, मनुष्यहानी झालेली असते. अतिरेक्यांशी लढताना जवानांचे, लष्करी अधिकाऱ्याचे जीव गेलेले असतात. रोज छोट्या प्रमाणावर होणाऱ्या घटनांकडे देशाचे लक्ष जात नाही. शहीद जवानांना मरणोपरांत वीरचक्र प्रदान केले जाते. कुटुंबियांना आर्थिक साह्य घोषित केले जाते. सीमेवर व देशात सुरू असलेला लढा एक नित्याची बाब बनते. तथापि, संसदेवरील अथवा मुंबईवरील अतिरेकी हल्ले यांनी देश हादरला होता. त्यानंतर अनेक उपाययोजना करूनही देशाची सुरक्षा आपण अभेद्य करू शकलेलो नाही. देशाचे सुरक्षाविषयक धोरण घोषित झालेले नाही. जम्मू काश्मीरचे माजी राज्यपाल एन.एन.व्होरा यांनी केंद्रीय पातळीवर राष्ट्रीय सुरक्षा मंत्रालय असावे, अशी सूचना केलीय. राष्ट्रीय सुरक्षा मंडळाचे माजी उपाध्यक्ष डॉ. अरविंद गुप्ता म्हणाले, की सुरक्षेसंदर्भात राज्य व केंद्रात समन्वय नाही.

१९७१ नंतर भारत व पाकिस्तानदरम्यान दोन युद्ध झाली. पाकिस्तानचे दोन तुकडे होऊन बांग्लादेशची निर्मिती झाली. तेव्हापासून चेकाळलेल्या पाकिस्तानने जैश-ए-महंमद, जमात-उद-दावा, लष्करे तोयबा, हिजबुल मुजाहिदीन आदींना हाताशी धरून व आधुनिक शस्त्रास्त्रे पुरवून भारताविरूद्ध 'प्रॉक्झी वॉर' सुरू केले. त्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतेय. निराश झालेल्या काश्मिरी युवकांचे (जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रन्ट-जेकेएलफ) आयते



खाद्य वरील संघटनांना मिळत असून, आत्मघातकीच्या फौजेला काश्मीरमधील विघटनवादीही खतपाणी घालीत आहेत. पण काश्मिरी जनता व सारे काश्मिरी तरूण यांना त्यासाठी जबाबदार धरता येणार नाही. म्हणूनच पुलवामाच्या हल्ल्यानंतर निरनिराळ्या शहरातून काश्मिरी युवकांविरूद्ध होणारी प्रक्षुब्ध निदर्शने अनाठायी व तणाव निर्माण करणारी आहेत, असे म्हणावे लागेल. दरम्यान, काश्मिरी लोकांना विशेषाधिकार देणारे घटनेतील ३५ अ हे कलम रद्द करण्याचा विचार केंद्र करीत आहे. त्याला काश्मीरमध्ये जोरदार विरोध सुरू झाला असून तणावग्रस्त परिस्थिती आणखी चिघळेल, असे पाऊल केंद्राने न टाकणे उचित ठरेल.

सेना काय कारवाई करणार, याविषयी अनेक अंदाज, तर्कवितर्क वर्तविण्यात आले होते. 'दुसरा' सर्जिकल स्ट्राईक, सीमापार हल्ला, आपल्याच सीमेतून तेथील दहशतवाद्यांच्या छावण्यांवर हल्ला करणे, पाकिस्तानविरूद्ध युद्ध पुकारणे, इस्त्राईलचे साह्य घेऊन मसूद अजहरला यमसदनी पाठविणे यांचा त्यात समावेश होता. त्यापैकी, 'सीमापार' हल्ल्याचा पर्याय लष्कराने निवडला. दरम्यान, पाकिस्तानची पूर्ण गळचेपी करण्याच्या उद्देशाने भारताने प्रथम सुमारे पंचवीस ते तीस देशांना विश्वासात घेतले. परराष्ट्र सचिव गोखले यांनी पुलवामा हल्ल्याची माहिती त्यांना दिली. ही प्रक्रिया बालाकोटमधील कारवाईनंतर चालू राहील. पुलवामा हल्ल्याचा जगातील अनेक देशातून निषेध करण्यात येऊन भारताला पाठिंबा मिळाला. पाठिंब्याचा अर्थ म्हणजे, ''पाकिस्तानविरूद्ध कोणतीही कारवाई केल्यास त्याची जबाबदारी पूर्णपणे पाकिस्तानवर असेल.'' पाकिस्तानला देण्यात आलेला 'मोस्ट फेवर्ड नेशन (अति अनुकूल वा प्राधान्य दर्जा)' रद्द करण्यात आला. पाकिस्तानहून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर २०० टक्के जकात लावण्यात आली. मोस्ट फेवर्ड नेशनचा दर्जा १९९६ मध्ये भारताने पाकिस्तानला दिला होता. दर्जाचा लाभ फक्त पाकिस्तानला मिळाला. पाकिस्तानबरोबर सुरू असलेल्या व्यापारात त्यांना अनेक सवलती मिळाल्या. त्यानंतर तब्बल वीस वर्षे पाकिस्तानने तोच दर्जा भारताला देण्याचे नाकरले. भारत व



पाकिस्तानचा व्यापार वर्षाकाठी जेमतेम २ अब्ज डॉलर्सचा आहे. त्यात वाढ झालेली नाही.

संबंध सामान्य करण्याच्या प्रयत्नात पाकिस्तान व भारतातील लोक, यात्रेकरू, पत्रकार, राजकीय नेते, साहित्यिक, क्रिकेटपटू, कलाकार, दुसऱ्या फळीतील राजदूत व विचारवंत यांची अनेक वर्षे ये जा चालू होती. विचारविनिमय होत होता. पुलवामाच्या घटनेनंतर तो बंद झालाय. केंद्र सरकारनेच दुसऱ्या फळीतील संवाद बंद केल्याची घोषणा केली. जलवाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी १९६० मध्ये भारत व पाक यांच्यातील सिंधू पाणीवाटप करार जवळजवळ रद्द केल्याची घोषणा केली. त्यामुळे, भारतातून पाकिस्तानात वाहणारे पाणी बंद करण्यात येईल. त्याचा थेट परिणाम तेथील शेतीवर होणार आहे. सर्व बाजूंनी पाकिस्तानची कोंडी, गळचेपी करण्याचे प्रयत्न भारताने चालविलेत. राजदूतीय पातळीवरील संबंध मात्र कायम आहेत. दूतावासातील उप-राजदूतांची संख्याही अद्याप कमी करण्यात आलेली नाही. कर्तारपूर कॉरिडॉरच्या निमित्ताने निवळलेले वातावरण कधी नव्हे इतके तापले. केवळ ४.७ कि.मी लांबीच्या या कॉरिडॉरची (मार्गाची) मूळ कल्पना माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी व पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाझ शरीफ यांची. १९९९ मध्ये वाजपेयी यांनी बस शिष्टाईच्या निमित्ताने लाहोरला भेट दिली. त्यावेळी परस्परांच्या देशातील शीख यात्रेकरूंना पाकिस्तानातील कर्तारपूर येथील गुरूद्वारा दरबार साहीबला भेट देता यावी, यासाठी हा मार्ग बांधून खुला करण्याचे ठरले होते. गुरू नानक यांची ५५० वी जयंती नोव्हेंबर २०१९ मध्ये साजरी केली जाणार आहे. या संदर्भात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्याची तुलना जर्मनीला 'दुभंगणाऱ्या बर्लिन'च्या भिंतीशी केली होती. या योजनेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

काश्मीरमधील पाकधार्जिण्या विघटनवादी हुरियतच्या नेत्यांची सुरक्षा काढून घेण्यामागे पाकिस्तानलाही इशारा आहे, की त्याचे लांगूलचालन करणाऱ्यांविरूद्ध कारवाई करण्यास भारत पुढेमागे पाहाणार नाही. खरे तर, गेली अनेक वर्षे या नेत्यांचे चोचले भारत सरकारनेच पुरविले. त्यामुळे ते अधिक सोकावले. त्यांना मिळणारी सुरक्षा, सवलती केंद्राने केव्हाच काढून घ्यावयास हव्या होत्या. सुरक्षा काढून घेतल्यावर 'आम्हाला काही फरक पडणार नाही' अशी त्यांची आगोचर प्रतिक्रिया. या नेत्यांना काश्मीरमधील अतिरेक्यांकडून धोका नाही. कारण ते त्यांचाच व पर्यायाने पाकिस्तानचा अजेंडा पुढे नेत आहेत. त्यापैकी यासीन मलिक याने पाकिस्तानात जाऊन मसूदअजहर बरोबर एकाच व्यासपीठावरून भारतविरोधी भाषण केले होते. जटील समस्या आहे, ती पाकिस्तानच्या वतीने काश्मीरमध्ये आत्मघातकी व दहशतवादी हल्ले करणाऱ्या तरूण अतिरेक्यांची. त्यांची एक फौज तेथे तयार झाली आहे. त्यांना चोरीछुप्या मार्गाने पाकिस्तान आरडीएक्स, स्फोटके, शस्त्रास्त्रे पुरवित आहे. हल्ल्याची योजना आखली जाते पाकिस्तानमध्ये व ती कार्यान्वित करण्याची जबाबदारी टाकली जाते या अतिरेक्यांवर. दिवसेंदिवस त्यांची संख्या वाढण्याचे कारण, काश्मीरच्या खोऱ्यात खुंटलेली रोजगार निर्मिती. ''आत्मघातकींच्या कुटुंबाची काळजी घेतली जाईल,'' असे आश्वासन दिले जाते. ''हल्ला करणारा अल्लाहला प्यारा, म्हणूनच तो जन्नतमध्ये जाणार'' असे ब्रेनवॉश केले जाते. त्याचीच परिणती सुरक्षा दलांवर दगडफेक, हातबॉंबफेक आदी योजनाबद्ध कृत्यातून होत आहे. ८ जुलै, २०१६ रोजी सुरक्षा दलांतर्फे हिजबुल मुजाहिदीनचा अतिरेकी बुऱ्हाण वाणी ठार झाल्यावर काश्मीरच्या खोऱ्यात त्याच्या सहानुभूतीचा उसळलेला आगडोंब अद्याप शमलेला नाही. त्यानंतर तब्बल दीड वर्ष निर्माण झालेल्या दंग्यात ९६ लोक ठार, १५ हजार नागरिक व सुरक्षा दलाचे ४ हजार जवान जखमी झाले होते, हे नजरेआड करून चालणार नाही. केंद्रात असलेल्या मोदी सरकारने सुरक्षा दलांना मोकळीक दिली. त्यामुळे एकीकडे अतिरेक्यांविरूद्धच्या कारवायांत वाढ झाली. दुसरीकडे, दहशतवादी हल्लेही वाढले. त्यापैकी, प्रमुख हल्ल्यांत १८ सप्टेंबर रोजी (उरी येथील लष्करी छावणीवरील फिदाईन हल्ला) १९ सैनिक व चार अतिरेकी ठार झाले, २९ नोव्हेंबर रोजी नगरोटा येथे झालेल्या हल्ल्यात सात जवान ठार झाले व पुलवामातील हल्ल्यात ४० जवान ठार झाले. यातून हल्ल्यांची वाढणारी तीव्रता स्पष्ट होते.

'इंडिया टुडे' ने प्रसिद्ध केलेल्या सरकारी आकडेवारीनुसार, २०१४ ते २०१८ दरम्यान अतिरेकी हल्ल्यात तब्बल १७६ टक्के वाढ झाली, सुरक्षा दलतील जवान ठार होण्यात ९३ टक्के वाढ झाली. दरमहा जम्मू-काश्मीरमध्ये सीमेपलीकडून ११ दहशतवादी भारतात प्रवेश करतात. त्यांची बेरीज केली, की गेल्या दोन वर्षात २६४ पाकिस्तानी अतिरेक्यांनी प्रवेश केला असावा, असा अंदाज आहे. अंतर्गत व बाह्य सुरक्षेचे आव्हान किती मोठे आहे, हेही स्पष्ट होते. २ जानेवारी २०१६ रोजी हवाई दलाच्या पठाणकोट येथील स्टेशनवर झालेल्या आत्मघातकी हल्ल्यात ७ सुरक्षा जवान व एक नागरिक व पाच अतिरेकी ठार झाले. त्या हल्ल्यात जैश-ए-महंमदबरोबर युनायटेड जिहाद कौन्सिलचेही नाव होते. पठाणकोट हल्ल्याची पाहणी करण्यासाठी भारताने पाकिस्तानमधील अधिकाऱ्यांच्या एका शिष्टमंडळालाही आमंत्रित केले. असे सांगण्यात येते, की त्यात आयएसआयचे गुप्तचरही होते. हवाई दलाच्या विमानतळावर त्यांना भारताने प्रवेश का

दिला? असाही सवाल त्यावेळी उपस्थित करण्यात आला. कारण, ते स्थळ अत्यंत संवेदनशील होते. बदल्यात भारतीय अधिकाऱ्यांना पाकिस्तानमध्ये पाहणी करण्याची भारताने केलेली विनंती मात्र नाकारण्यात आली. प्रत्येक वेळी भारताने बोटचेपी भूमिका घेतली. त्यामुळे हल्ले कमी होण्याऐवजी बेसुमार वाढले. बालाकोटवरील कारवाईपूर्वी पाकिस्तानचे माजी अध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांनी भाकित केले. त्यांच्या मते, भारत व पाकिस्तानचे संबंध विकोपाला गेले आहेत. अण्वस्त्रांबाबत ते म्हणाले, की पाकिस्तानने भारतावर एक अणुबॉम्ब टाकला, तर भारत वीस अणुबॉम्ब टाकून पाकिस्तानला बेचिराख करील. संयुक्त अरब अमिरातीतील पत्रकार परिषदेत त्यांनी सुचविले की, यावर एकच उपाय आहे, तो म्हणजे पाकिस्तानने पहिल्याच हल्ल्यात भारतावर पन्नास अणुबॉम्ब टाकावे, म्हणजे ते पाकिस्तानवर वीस अणुबॉम्ब टाकू शकणार नाहीत. ५० अणुबॉम्ब टाकण्यास पाकिस्तान तयार आहे का, असा सवाल त्यांनी विचारला व दोन्ही देशांचे संबंध विकोपाला गेले, तरी पाकिस्तान भारतावर अण्वस्त्र हल्ला करणार नाही, अशी पुष्टी जोडली.

पाकिस्तानचा दहशतवाद व भारताचा प्रतिसाद याच्या इतिहासाकडे पाहता असेही दिसते, की काश्मीरचा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्राने कधीही नेटाने प्रयत्न केले नाही. प्रत्येक वेळी धरसोडीचे धोरण ठेवले. ''लष्करी सेनेद्वारे भारताने काश्मीर ताब्यात ठेवलाय,'' अशी टीका पाकिस्तानने केली. ''स्वच्छ वातावरणात निवडणुका घेऊन लोकनियुक्त सरकारतर्फे तेथील कारभार चालविला जातो,'' असे नेहमीचे उत्तर सरकार देत आले आहे. असे असूनही सातत्याने खोरे का धुमसते, याला समाधानकारक उत्तर नाही. १९९३ पासून तर सरकारने दहशतवाद्यांना 'सुरक्षित सोडवणूक (सेफ पॅसेज)' करण्याचे धोरण अवलंबिले. १९९३ मध्ये श्रीनगरमधील हजरतबल मशिदीवर दहशतवाद्यांनी कब्जा केला, तेव्हा तत्कालीन गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांच्याबरोबर मला श्रीनगरला जाण्याची संधी मिळाली होती. त्यावेळी मशिदीतील लोकांना वाचविण्यासाठी दहशतवाद्यांना सेफ पॅसेज देण्यात आला. त्यावेळी केंद्रात काँग्रेसचे सरकार होते. नंतर अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय आघाडीचे सरकार आले, तेव्हा १९९९ मध्ये हरकत-उल मुजाहिदीनच्या दहशतवाद्यांनी इंडियन एअर लाईन्सच्या विमानाचे अपहरण केले. ते कंदाहारला नेण्यात आले. त्यातील प्रवाशांना वाचविण्यासाठी दहशतवाद्यांच्या मागणीनुसार तुरुंगात डांबून ठेवलेल्या मौलाना मसूद अजहरसह मुश्ताक अहमद झर्गर, अहमद ओमर सईद शेख या तीन दहशतवाद्यांना घेऊन खास विमानाने खुद्द परराष्ट्रमंत्री जसवंत सिंग कंदाहारला गेले. त्या विमानात इंटेलिजन्स ब्युरोचे प्रमुख अजित दोवाल होते. तो केवळ 'सेफ पॅसेज' नव्हता, तर 'रॉयल पॅसेज' होता. विद्यमान राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोवाल यांच्या मते, ''तालिबान व पाकिस्तानच्या आयएसआयने या अपहरणाला पाठिंबा दिला नसता, तर भारताने प्रश्न सोडविला असता.'' कसा? ते मात्र त्यांनी विषद केले नाही. भारताच्या शिष्टाईचे त्यावेळी बारा वाजले. विघटनवादी व दहशतवाद्यांशी बोलणी करण्यासाठी माजी पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंग यांनी माजी उद्योगमंत्री जॉर्ज फनारडिस यांची नियुक्ती केली. जॉर्ज श्रीनगरला अनेकदा भेट देऊन हुरियत तसेच दहशतवाद्यांशी बोलणी करीत.पंतप्रधान नरसिंह राव यांच्या कारकीर्दीत तेच काम गृहराज्यमंत्री राजेश पायलट यांच्यावर सोपविण्यात आले होते. नंतर डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना ख्यातनाम पत्रकार दिलीप पाडगावकर यांच्या नेतृत्वाखाली तीन तटस्थ तज्ञांची समिती स्थापन करण्यात आली. तिने वेगवेगळ्या संघटना, काही अतिरेकी यांच्याबरोबर चर्चा करून केंद्राला एक अहवाल तयार केला. परंतु, त्यानंतर ''एकदाही डॉ. सिंग यांनी आम्हाला बोलाविले नाही, की चर्चा केली नाही. उलट, अहवाल कचऱ्याच्या टोपलीत फेकून दिला,'' असे खेदजनक उद्गार पाडगावकर यांनी मा याशी बोलताना काढले होते. मोदी सत्तेवर आल्यावर त्यांनी २०१७ मध्ये आयबीचे माजी प्रमुख दिनेश्वर मिश्रा यांना काश्मीरसाठी खास दूत नेमले. या दूताने गेल्या दोन वर्षात नेमके काय केले, हे कुणालाही



ठाऊक नाही, की सरकारने ते जाहीर केले नाही. मिश्रा यांना जम्मू काश्मीरमध्ये थंड प्रतिसाद मिळाला. दरम्यान, भाजप व पीडीपी यांचे सरकार तेथे आले अन् गेले. परिस्थिती धुमसतच राहिली.

पुलवामाच्या हल्ल्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघाचे महासचिव अन्तोनिओ गुटेरस यांनी भारत व पाकिस्तानदरम्यान मध्यस्थी करण्याची तयारी दर्शविली. तथापि, भारताचा कोणत्याही तिसऱ्या व्यक्ती अथवा संघटनेच्या मध्यस्थी अथवा हस्तक्षेपास विरोध आहे. दुसरीकडे, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही भारताला पाठिंबा देऊन पाकिस्तानचे अर्थसाह्य कमी केले आहे. 'भारत लवकरच कारवाई करणार' असे आठवड्यापूर्वी ते म्हणाले होते. जर्मनीच्या चॅन्सेलर मर्केल असो, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन असो, की फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन असो, या सर्वांनी भारताला कारवाईसाठी पाठिंबा दर्शविल्याने भारतावर कोणताही हल्ला करण्यापूर्वी पाकिस्तानच्या लष्कराला चारदा विचार करावा लागेल. याचा अर्थ, पाकिस्तान युद्धसदृश चढाई करणारच नाही असे नाही, किंवा प्रॉक्झी वॉर थांबेल असेही नाही. उलट,



## सुज्ञ विचार कोणाला सुचणार..?

**पुलावामा येथे हल्ला झाला, त्याच्या दुसऱ्या दिवशी काश्मीरमधील युवा नेते शहा फैजल दिल्लीत होते. इंडिया इंटरनॅशनल सेन्टरमध्ये झालेल्या कार्यक्रमात त्यांचे भाषण झाले. खरे तर त्या हल्ल्यानंतर त्यांना बोलावयाचे नव्हते. परंतु, कार्यक्रम पूर्वनियोजित असल्याने त्यात भाषण करताना त्यांनी 'हाय अल्टिट्यूड ग्रेव्हयार्ड' असे काश्मीरचे वर्णन केले. ते म्हणाले, ''युवकांपुढे कोणतेही भविष्य उरलेले नाही. पुढच्या पंधरा वीस वर्षात काश्मीरचे चित्र कसे असेल, याचे भाकित कुणी करू शकत नाही. २०१८ मध्ये सर्वाधिक लोक चकमकीत ठार झाले. काश्मीरमध्ये एक नवी आणीबाणी आहे, ज्यात तरूणांना निवडणूक प्रक्रियेमध्ये रस राहिलेला नाही. गेल्या अर्धशतकात काश्मीरचा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र व काश्मीरचे नेते यांच्यात शेकडो वेळा वाटाघाटी झाल्या. दरम्यान, काश्मीरमध्ये गेल्या दशकात जी तरूण पिढी जन्माला आली, त्यांनी हिंसाचारापलीकडे काही पाहिलेले नाही. एखाद्या तरूणाचा गोळीबारात मृत्यू झाला, की ते गाव शोकमग्न व संतप्त होते, परंतु त्याचबरोबर भोवतालचा परिसर तणावग्रस्त होतो. गावेच्या गावे दहशतीत वावरत आहेत. एकीकडे सुरक्षा दले तर दुसरीकडे अतिरेकी, अशा दुष्टचक्रात आम्ही सापडलो आहोत. दहशतवाद नष्ट व्हायला हवा. पण त्यासाठी केवळ लष्करी उपाय करून अथवा युद्ध केल्याने तो आटोक्यात येणार नाही. 'वुई हॅव टु एनलार्ज डेमॉक्रॅटिक स्पेस इन काश्मीर.' मी युवकांना शस्त्रे सोडण्याबाबत सांगतो, तेव्हा प्रथम लष्कर व पोलिसांनी शस्त्र सोडली पाहिजे, असे ते उत्तर देतात. काश्मीर इज ब्लीडिंग ऑन बोथ साईड्स, पीपल अँड सोल्जर्स. टीव्ही चॅनेल्समधून रोज विष पेरले जात आहे. अशा परिस्थितीत सूज्ञ विचार सुचणार कुणाला?''**

त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. असेही सांगितले जाते, की अलीकडे सौदी अरेबियाचे राजे प्रिन्स सलमान यांनी दिलेल्या २ अब्ज डॉलर्सपैकी काही पैसा पुन्हा दहशतवादाकडे वळविण्यात येईल. पुलवामावर हल्ला होत असता पाकिस्तानी जैश उल आदीलच्या अतिरेक्यांनी इराणमधील सिस्तान -बलुचिस्तान प्रांतातून प्रवास करणाऱ्या रिव्होल्यूशनरी गार्डस कॉर्प्सवर हल्ला चढविला. त्यात २७ गार्डस ठार व अन्य १३ जखमी झाले. त्यामुळे, इराण संतप्त असून पाकिस्तानवर कारवाई करण्याचा इशाराही त्याने दिला आहे. तथापि, पुलवामातील हल्ल्यानंतर काश्मिरी युवकांवर होणारे हल्ले घृणास्पद असून त्यामुळे भारतविरोधी वातावरणात भर पडेल. हल्ले होत असताना पंतप्रधान काही म्हणाले नाहीत. हल्ले झाल्यावर त्यांनी संयम पाळण्याचा सल्ला दिला.

पाकिस्तानला ताळ्यावर आणण्याचा एक रामबाण उपाय म्हणजे इंदिरा गांधी यांनी जसे पाकिस्तानचे दोन तुकडे केले, तसे पख्तुनिस्तान, बलुचिस्तान व सिंध असे आणखी तीन तुकडे केले पाहिजे. या प्रांतात गेल्या अनेक वर्षांपासून स्वातंत्र्याच्या चळवळी सुरू आहेत. त्यांना पाठिंबा द्यावा लागेल. दुसरीकडे, डोळ्यात तेल घालून दहशतवादाला मुळापासून उखडून टाकावे लागेल. त्यासाठी मोठी किंमत मोजावी लागेल. त्याचप्रमाणे, चीनच्या पाकधार्जिण्या धोरणाचाही सामना करावा लागेल. भारताला आणखी एका धोक्याला सामोरे जावे लागणार आहे. तो म्हणजे, अमेरिकन सैनिक माघारी गेल्यावर तालिबान व पाकिस्तानी दहशतवादी संघटनांचे अफगाणिस्तानात वाढणाऱ्या संभाव्य वर्चस्वाचे. अफगाणिस्तानच्या स्थैर्यामध्ये भारताचे मोठे हितसंबंध गुंतले आहेत. तेथील विकास योजनांमध्ये भारताने आजवर अब्जावधी डॉलर्स ओतले आहेत. त्यांची सुरक्षा करावी लागेल.

वाजपेयींच्या लाहोर भेटीनंतर लगेचच कारगिल युद्ध झाले. त्यावेळीही भारत बराच गाफिल राहिला. अखेर ते युद्ध भारताने जिंकले व पाठोपाठ 'कारगिल शहीद दिवस,' 'कारगिल विजय दिवस' मनविण्यात आले. या यशाचे भाजपने बरेच राजकीय भांडवल करून निवडणुका जिंकल्या. त्याची पुनरावृत्ती बालाकोटमधील हल्ल्याबाबत होणार काय? या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी द्यावे लागेल. या वातावरणात मोदी यांना विरोधकांसह देशातून सर्वत्र पाठिंबा मिळत आहे. सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी केंद्राने पाकिस्तानमधील 'जैश'च्या तळ अथवा छावण्यांवर आणखी एक गैरलष्करी हल्ला केल्यास मोदी यांची लोकप्रियता आणखी वाढेल. पण, पाकिस्तानने युद्ध लादल्यास परिस्थिती हाताबाहेरही जाऊ शकेल. पश्चिमेस पाकिस्तान, उत्तर व ईशान्येस चीन असे दुहेरी आव्हान आहे. भारताच्या बाजूने असलेली गोष्ट म्हणजे, राष्ट्रसंघाच्या सुरक्षा मंडळातील पाचपैकी अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन व रशिया आज भारताच्या पाठीशी असून चीन एकाकी पडला आहे. मसूद अजहरला राष्ट्रसंघाच्या दहशतवाद्यांच्या यादीत समाविष्ट करण्यास चीनने विरोध दर्शविला असला, तरी त्याच्या दहशवादी कृत्यांचे सारे पुरावे जगजाहीर होत असल्याने चीनचा विरोध फार काळ टिकेल, असे दिसत नाही. चीनच्या शिंजियांग प्रांतात सुरू असलेल्या दहशतवादालाही पाकिस्तानातील अतिरेकी संघटनांकडून शस्त्रपुरवठा होतो, याची माहिती चीनला आहे. भारताने चीनशी बऱ्यापैकी संबंध ठेऊन याबाबत पाठपुरावा चालविला आहे. त्याचे दृश्य परिणाम केव्हा न केव्हा तरी दिसतील, अशी आशा आहे. दुसरे म्हणजे, पाकिस्तानमधील दहशतवाद संपुष्टात आणण्यासाठी भारताला दुहेरी धोरण राबवावे लागेल. एकीकडे इराणला पाठिंबा द्यावा लागेल व दुसरीकडे इस्त्राईलचा सक्रीय पाठिंबा घ्यावा लागेल. दरम्यान, भारताला धमकावणारे पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान यांनी एकाएकी वाटाघाटीची सबुरीची भाषा केली आहे. त्यावर किती विश्वास ठेवायचा? त्यांच्या वक्तव्याला लष्कराचा पाठिंबा आहे काय? हे कळायला मार्ग नाही. सारांश, येते काही महिने भारताला सीमेवरची खबरदारी व दक्षता यात कोणतीही कसर सोडता येणार नाही. *कारण, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका तोंडाशी आल्या असून दिवस व रात्र दोन्हीही वैऱ्याच्या आहेत. कारवाईतील यशाचे ढोल मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांनी बडवून त्याचे राजकीय भांडवल केले, तर, पुलवामाच्या हल्ल्यात ठार झालेल्या जवानांचा अपमान केल्यासारखे होईल. तो मोह पंतप्रधान मोदी आवरणार काय?* •••



# दलितांचा हिंदुत्त्वाच्या उदारमतवादावरील विश्वास उडाला...

**उना प्रकरणानंतर दलित अत्याचाराची झळ बसलेल्या दलितांचा हिंदुत्त्वाच्या उदारमतवादावर जो काही उरलासुरला विश्वास होता, तोही संपुष्टात आला आहे आणि म्हणूनच काही जणांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला आहे. राजकीय पातळीवर दलित राजकीय पक्ष आणि सामुदायिक कृती करणारे गट हे धर्मनिरपेक्ष शक्तींकडे वळत आहेत. उत्तर प्रदेशात दलित नेत्या मायावती यांचा बहुजन समाज पक्ष किंवा बसपने समाजवादी पक्षाशी केलेली युती हे याचे सर्वाधिक लक्षणीय उदाहरण आहे.**



**प्रो. सुखदेव थोरात**
नवी दिल्ली


**धार्मिक** कल्पनांची कोठारे आणि हिंदू सामाजिक उतरंडीचा स्रोत असलेल्या ऋग्वेद, गीता, मनुस्मृती आणि इतर स्मृती यांसारख्या हिंदू धार्मिक साहित्याची काळजीपूर्वक छाननी केल्यावर आंबेडकरांनी वर्ण किंवा जातिव्यवस्थेला हिंदू धार्मिक ग्रंथांमधून समर्थन मिळत असल्याचे विपुल पुरावे सादर केले. ऋग्वेदातील पुरुषसूक्तात पहिल्यांदा चातुर्वर्ण्याचा सिद्धांत मांडण्यात आला आहे ही गोष्ट निःसंशयपणे स्पष्ट आहे. ऋग्वेदातील एक श्लोक असे सांगतो की 'त्याच्या मुखातून ब्राह्मण, दोन हातांमधून क्षत्रिय. मांड्यांमधून वैश्य आणि पावलांमधून शूद्रांचा जन्म झाला.


भगवद्गीता वर्णव्यवस्थेला उचलून धरते. भगवान कृष्ण सांगतो, 'चातुर्वर्ण्य नावाची व्यवस्था मी स्वतः निर्माण केली आहे आणि त्यांच्या जन्मजात क्षमतांनुसार त्यांना विविध व्यवसाय नेमून दिले आहेत. मनुस्मृतीने वर्णांचे जातिव्यवस्थेत रूपांतर केले आणि जातींतर्गत विवाह व सामाजिक अलगीकरण पद्धती प्रचलित केल्या. ***मनु असे सांगतो की :*** *जगाच्या भरभराटीसाठी त्याने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांना अनुक्रमे आपल्या मुखातून, बाहूंमधून, मांड्यांमधून आणि त्याच्या पावलांतून जन्म दिला. परंतु जगाचे संरक्षण करण्यासाठी त्याच्या मुखातून, हातांतून, मांड्यांतून आणि पावलांमधून बाहेर पडलेल्यांना त्याने वेगवेगळे व्यवसाय (कर्तव्ये आणि हक्क) नेमून दिले.* याप्रमाणेच महाभारतात ***भीष्म असा उपदेश करतो की :*** *ब्राह्मणाची पूजा करणे हे अभिषिक्त राजाचे सर्वोच्च कर्तव्य आहे. त्यांचे संरक्षण करावे आणि त्यांना मान द्यावा. त्यांच्यासमोर वाकून नमस्कार करावा आणि जणू काही ते आपले पालकच आहेत, अशा प्रकारे त्यांना पूज्य मानावे.* (मणी २०११) *रामायणाचे जनक वाल्मिकी असे सांगतात की, जातसंहितेचा भंग करणारे वर्तन केल्यामुळे शंभूकाचा बळी दिला गेला. अर्थशास्त्रात कौटिल्याने, प्रत्येक वर्णाने आपापली कार्ये*


*करावीत असे म्हटले आहे आणि जी व्यक्ती आपली कर्तव्ये पार पाडते तिला स्वर्ग आणि असीम समाधान मिळते असेही त्याने जाहीर केले आहे. (मणी २०११). यावरून आंबेडकरांनी असा निष्कर्ष काढला होता, की वेद, भगवद्गीता आणि मनुस्मृती यांच्यामध्ये फारसा फरक नाही. त्यांनी असे निरीक्षण नोंदवले की : वेद आणि भगवद्गीता सर्वसामान्य सिद्धांत मांडतात; तर स्मृती या सिद्धांताची वैशिष्ट्ये आणि तपशील मांडतात हाच काय तो या दोहोंमधील एकमेव फरक आहे. परंतु या ग्रंथांचे सार असे आहे की, ते एका समान संरचनेत गुंफलेले आहेत. त्या प्रत्येकामधून एकच धागा गुंफलेला आहे आणि हे सगळे ग्रंथ अखेरीस एकाच धाग्याचे भाग आहेत. त्यांच्यापैकी एखाद्या ग्रंथाला बाजूला काढून आणि निवडून काहीही साध्य होणार नाही. हिंदुत्वाचे (सामाजिक) तत्त्वज्ञान हे सगळीकडे समानच आहे. मग तुम्ही मनुस्मृतीचा, वेदांचा किंवा भगवत् गीतेचा अभ्यास करा; त्याने काहीही फरक पडणार नाही. (आंबेडकर, १९८७ तोला आणि द्रगोनेट्टी, २०१३.)*


भारतीय राज्यघटना सर्वांना त्यांच्या स्वतःच्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य देते. हिंदू धर्माची शिकवण देणे आणि पालन करणे हा हिंदूंचा हक्क आहे. मात्र तरीही वर उल्लेख केल्याप्रमाणे वेद, गीता, स्मृती, रामायण आणि महाभारत या सर्वांनीच वर्णव्यवस्थेवर आधारित सामाजिक उतरंडीचा पुरस्कार केला आहे. (धार्मिक शिकवणुकीचा भाग म्हणून.) आणि ही वर्णव्यवस्थाच नंतर जातिव्यवस्थेत रूपांतरित झाली. या धार्मिक ग्रंथांच्या आधारावर धार्मिक नैतिकतेचा उपदेश करत असताना (जे हिंदू त्यावर विश्वास ठेवतात त्यांचा तो अधिकारच आहे.), त्यांनी उघडपणे हिंदू धार्मिक ग्रंथातील सामाजिक उतरंड नाकारावी. ऋग्वेदातील आणि गीतेतील वर्णव्यवस्था, मनुस्मृतीतील, रामायणातील, महाभारतातील किंवा कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील जातिव्यवस्थेला त्यांनी स्पष्टपणे नाकारावे. सामाजिक व्यवस्था न नाकारल्यामुळे ते दलितांविषयी किंवा अस्पृश्यांविषयी मोठ्या प्रमाणात असंवेदनशीलता व्यक्त करत आहेत हे अनेकांच्या लक्षातच येत नाही. नाकारण्याच्या सातत्यपूर्ण मनःस्थितीतून बाहेर पडणे हे हिंदूंसाठी चांगले ठरेल. त्यामुळे दलितांमधील आत्मविश्वासाला उत्तेजन मिळेल.

याखेरीज नेहमीच हिंस्र बळाचा वापर करून दलितांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य दडपून टाकण्याचा त्रासदायक प्रवाह निर्माण झाला आहे. दलितांना याविषयीही तितकीच काळजी वाटते. इंडियन एक्सप्रेसमध्ये छापून आलेल्या 'व्हॉट द हाय कास्ट्स ओ ऑन द उना ॲट्रॉसिटी' या लेखानंतर लेखकाला दलित लेखक म्हणून एक सल्ला देण्यात आला आणि अप्रत्यक्षपणे एक सूचनाही मिळाली. त्याचा एक भाग पुढे देत आहे :हिंदुत्व हा महान आणि सातत्याने उत्क्रांत होत चाललेला धर्म आहे आणि प्रत्येक जातीत त्यांच्या कामांनुसार सर्व चारही वर्णांचे लोक




**वेद, गीता, स्मृती, रामायण आणि महाभारत या सर्वांनीच वर्णव्यवस्थेवर आधारित सामाजिक उतरंडीचा पुरस्कार केला आहे आणि ही वर्णव्यवस्थाच नंतर जातिव्यवस्थेत रूपांतरित झाली. (संग्रहित छायाचित्र)**

आहेत. अस्पृश्यतेसारखी दुष्ट प्रथा ही कधीही हिंदू प्रथा असणे शक्य नाही. एससी, एसटी आणि बीसी यांच्यातील जबाबदार बुद्धिवंतांनी ही गोष्ट लक्षात घेतलीच पाहिजे, की त्यांच्या सगळ्या दुःखांसाठी हिंदुत्त्वावर दोषारोप करण्याने दीर्घ काळाचा विचार करता त्यांचे भले होण्यापेक्षा त्यांचे नुकसानच अधिक होईल. संपूर्ण धर्मालाच दोष देत राहण्याने किंवा काही थोड्याच व्यक्तींच्या चुकांसाठी सगळ्या उच्चवर्णीयांना दोष देण्याने दीर्घकाळाचा विचार केला तर काहीही निष्पन्न होणार नाही. त्यांचा वंशपरंपरागत धर्म असलेल्या हिंदुत्त्वाला त्यांनी पूज्य मानले आणि त्याच्याविषयीची निष्ठा दर्शवली; तसेच इस्लामच्या एकनिष्ठ अनुयायांकडे त्यांनी प्रतिस्पर्धी

म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन ठेवला तर आरक्षणाच्या धोरणामुळे संधी गमवाव्या लागल्याबद्दल राग असला तरीही अगदी उच्चवर्णीयांकडूनही त्यांना नक्कीच आदराने वागवले जाईल. जातींमधील सलोख्यासाठी एससी /एसटी/ बीसी यांच्यातील बुद्धिवंतांनी विधायकपणे विचार करून जबाबदारपणे काम करण्याची पूर्वी कधीही नव्हती एवढी आज मोठी गरज आहे. आपापल्या समाजांमधील राजकारण्यांमध्ये एकी घडवून आणून त्यांना आपल्या भावी पिढ्यांच्या हितांचे कायमस्वरूपी संरक्षण करणारी नवीन राज्यघटना तयार करण्यासाठी एकदिलाने, निष्ठेने काम करण्यासाठी प्रेरणा देणे हे एससी /एसटी/ बीसी यांच्यातील बुद्धिवंतांसमोर असलेले भले मोठे काम आहे. दरम्यान, सध्याची राज्यघटना दूर करण्यात होणाऱ्या दिरंगाईमुळे त्यांच्या हितावर होणाऱ्या दूरगामी परिणामांच्या काळजीपूर्वक, नियमित अभ्यासासाठी त्यांच्या अखत्यारीतील सर्व स्रोत, संसाधने त्यांनी एकत्र केलीच पाहिजेत.'

## दलित व इतरांत अद्यापही मोठी तफावत टिकून

भाजपच्या जाहीरनाम्यात दलित आणि इतरांमधील तफावत सांधण्याचे वचन देण्यात आले होते. भाजपच्या जाहीरनाम्याने ठोस सुधारणा करणारी धोरणे आणि योजना विकसित करण्याचे आणि त्याद्वारे एससी आणि इतरांमधील तफावत कमी करण्याचा निदर्शक म्हणून पाहता येणे शक्य असलेले फलित देण्याचे आश्वासन दिले होते. दुर्दैवाने, २०१४ ते २०१८ या कालखंडात या तफावतीत कोणते बदल झाले त्याचा अभ्यास करण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही माहिती उपलब्ध नाही, कारण अलीकडच्या काळात नॅशनल सॅम्पल सर्व्हेचा एकही अहवाल प्रसिद्ध झालेला नाही. उपलब्ध असलेली अद्ययावत माहिती ही २०११-१२ ची आहे. या अहवालातून केंद्रात भाजप सत्तेत येण्याआधीच्या एका किंवा दोन वर्षांतील गरिबी, रोजगार, मालमत्तांची मालकी आणि शिक्षण यांविषयीची माहिती मिळते.

सन २०१२ मध्ये सुमारे २२ टक्के लोक गरीब होते. एससींमध्ये ३० टक्के, ओबीसींमध्ये २० टक्के आणि उच्चवर्णीयांमध्ये ९ टक्के गरिबी होती. एससींची गरिबी ही उच्चवर्णीयांमधील गरिबीच्या तुलनेत तिपटीने अधिक होती. त्याचप्रमाणे २०१४ मध्ये उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षणासाठी प्रवेश घेण्याचे प्रमाण उच्चवर्णीयांमध्ये ९७ टक्के, ओबीसींमध्ये ८० टक्के आणि एससींमध्ये ७३ टक्के होते. उच्चतर शिक्षणासाठी प्रवेश घेण्याचे प्रमाण उच्चवर्णीयांमध्ये ४३ टक्के, ओबीसींमध्ये २९ टक्के आणि एससींमध्ये २० टक्के होते. याचा अर्थ, उच्चवर्णीयांच्या तुलनेत उच्चतर शिक्षणासाठी प्रवेश घेण्याचे एससींमधील प्रमाण दुपटीहून अधिक प्रमाणात कमी होते. अशा प्रकारे गरिबी आणि शिक्षण या मानव विकास निदर्शकांच्या बाबतीत एससी उच्चवर्णीयांच्या तुलनेत खूपच मागे होते. यामागची कारणे स्पष्ट आहेत. दलितांकडे उत्पन्न मिळवून देणाऱ्या मालमत्तांचा अभाव आहे. सन २०१३ मध्ये देशातील सुमारे ४५ टक्के संपत्ती उच्चवर्णीयांच्या मालकीची




पुरेशा तरतुदीअभावी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती मिळत नाह
त्यामुळे शिष्यवृत्ती वेळेत मिळावी या मागणीसाठी विद्यार्थ्यांना आंदोलनाच

होती. लोकसंख्येतील त्यांची टक्केवारी २१ आहे. म्हणजेच लोकसंख्येच्या तुलनेत त्यांच्याकडे असलेली संपत्तीची मालकी जवळजवळ दुपटीने अधिक होती. ओबीसींकडे ३१ टक्के संपत्ती होती आणि त्यांच्या ३६ टक्के या लोकसंख्येच्या प्रमाणाचा विचार करता ती जवळजवळ योग्य प्रमाणात होती असे म्हणता येते. देशातील फक्त सात टक्के संपत्ती एससींकडे होती. त्यांचे लोकसंख्येतील प्रमाण १६.६ टक्के असताना त्या तुलनेत त्यांच्याकडे असलेली संपत्ती बऱ्याच प्रमाणात कमी होती. (नॅशनल सॅम्पल सर्व्हे, २०१६). दलितांकडे उत्पन्न मिळवून देणाऱ्या मालमत्तांचा अभाव असल्यामुळे ते इतरांच्या तुलनेत रोजंदारीवरील कामात अधिक प्रमाणात गुंतल्याचे दिसून येते. परंतु कामगार बाजारपेठेतही त्यांना भेदभावाचा त्रास सहन करावा लागतो आणि उच्च बेरोजगारीला तोंड द्यावे लागते. सन २०१२ मध्ये अखिल भारतीय स्तरावर बेरोजगारीचा दर ५.८६ टक्के होता; मात्र एससींमध्ये तो ७.३ टक्के होता. ओबीसींमध्ये तो ५.२ टक्के आणि उच्चवर्णीयांमध्ये ४.३ टक्के होता. (नॅशनल सॅम्पल सर्व्हे,२०१४). भाजपने २०१४ मध्ये सत्ता काबीज केली त्यावेळी २०१२ ते २०१४ या कालावधीतील एससी आणि इतरांच्या मानव विकासातील तफावतीची ही परिस्थिती होती. (थोरात, २०१७). २०१४ नंतर ही तफावत कमी झाली असे समजण्याचे आपल्याकडे कोणतेही कारण नाही. विविध योजनांमध्ये एससीपीअंतर्गत अपुरी तरतूद करण्यात आली आहे. त्यातही विशेषतः शिक्षण आणि रोजगार यांच्या ऋण प्रवेगात वाढ झाल्यामुळे ही तफावत कमी होण्याऐवजी वाढली असण्याचीच शक्यता अधिक आहे.




ही. भाजप सरकारच्या काळात ही स्थिती आणखी भीषण बनली आहे.
ा मार्ग अवलंबावा लागतो. (संग्रहित छायाचित्र)

## निष्कर्षांची निरीक्षणे

भाजपच्या २०१४ च्या निवडणूक जाहीरनाम्यात देण्यात आलेल्या आश्वासनांच्या पार्श्वभूमीवर आम्ही भाजप सरकारच्या धोरणांचे विश्लेषण केले. जाहीरनाम्याने शिक्षण आणि उद्योजकता या क्षेत्रांवर भर देऊन दलितांच्या आर्थिक सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित करण्याचे अभिवचन दिले होते. सामाजिक सक्षमीकरणात त्यांनी एससींवर होत असलेल्या अत्याचारांना प्रतिबंध करण्यास प्राधान्य देऊन एससींना सुरक्षितता देण्याचे आश्वासन दिले होते. त्यांनी एससी आणि इतरांच्या मानव विकासातील तफावत कमी करण्याचेही आश्वासन दिले होते. अनुभवाधिष्ठित वस्तुस्थितीतून पुढे आलेल्या परिस्थितीवरून असे दिसते की, एससीपीअंतर्गत करण्यात आलेल्या आर्थिक तरतुदींमधून दलितांच्या आर्थिक सक्षमीकरणाला सरकार प्राधान्य देणार असल्याचे प्रतिबिंबित होत नाही. पाच वर्षांच्या कालावधीदरम्यान एससीपीअंतर्गत करण्यात आलेली सरासरी तरतूद ही सुमारे ७ टक्के आहे. १६ टक्के या अपेक्षित दर्जाहून ती खूपच कमी आहे. कमी तरतुदीचा अनेक क्षेत्रांवर आणि विशेषतः शिक्षण क्षेत्रावर विपरीत परिणाम झाला आहे. एससींसाठी दिल्या जाणाऱ्या पोस्ट मॅट्रिक्युलेशन स्कॉलरशिपवर याचा वाईट परिणाम झाला आहे. २०१८-१९ मध्ये या शिष्यवृत्तीची ८० अब्ज रुपयांची रक्कम थकित होती. त्यामुळे दलित विद्यार्थ्यांना अत्यंत कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागले आणि परिणामी त्यांची गळती झाल्याचे दिसते. याखेरीज प्रवेश प्रक्रियेत बदल घडवून आणण्याच्या प्रयत्नांमुळे केंद्रीय विद्यापीठांतील एससी /एसटी /ओबीसी संशोधक विद्यार्थ्यांच्या प्रवेशात घट झाली. विभागांच्या पातळीवर आरक्षण ठेवण्याच्या न्यायालयाच्या निर्णयामुळेही (यामुळे आरक्षणाचे प्रमाण कमी होईल) दलित विद्यार्थ्यांमध्ये आणि प्राध्यापकांमध्ये कमालीचा असंतोष पसरला आहे. एससी /एसटी हबची परिस्थितीही शिक्षण क्षेत्राहून वेगळी नाही. एससी /एसटी उद्योगांकडून चार टक्के खरेदीचे उद्दिष्ट असताना लघू /मध्यम/ सूक्ष्म उद्योग मंत्रालयाने जेमतेम ०.३९ टक्क्यांपर्यंतचीच खरेदी केली. याहूनही अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे विशेषतः भाजपची राजवट असलेल्या राज्यांमध्ये दलितांविरुद्धच्या हिंसाचाराच्या घटनांची संख्याही उच्च राहिली. प्रामुख्याने प्रशासनाकडून केल्या जाणाऱ्या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे दलित अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत दाखल खटल्यांमधून आरोपी निर्दोष सुटण्याचे प्रमाण अत्युच्च आहेच आणि तरीही सर्वोच्च न्यायालयाने दलित अत्याचार प्रतिबंधक कायद्यात बदल केले आहेत. हे गुन्हे अजामीनपात्र ठरवण्याची आणि विभागीय चौकशीशिवाय अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची तरतूद काढून टाकण्यात आली आहे. यातून या कायद्याच्या अंमलबजावणीत केल्या जाणाऱ्या जाणीवपूर्वक दुर्लक्षाला प्रोत्साहन मिळण्याचीच शक्यता अधिक आहे. या सगळ्यांवर कळस म्हणजे वेदकालीन सामाजिक तत्त्वप्रणालीवर आधारित जुनी सामाजिक उतरंड परत आणण्याच्या वरचेवर केल्या जाणाऱ्या घोषणांमुळे दलितांना असुरक्षितपणा जाणवत आहे. या सर्व घडामोडींमुळे दलित अत्यंत असुरक्षित, काळजीने पछाडलेले आणि चिंताग्रस्त बनले आहेत. आतापर्यंत त्यांनी जे काही मिळवले आहे, ते सारे गमवावे लागेल असे त्यांना वाटू लागले आहे. दलितांमध्ये निर्माण झालेल्या वाढत्या असंतोषातून याचे प्रतिबिंब दिसत आहे. विशेषतः दलित अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतील बदलांच्या विरोधात तरुणांनी केलेल्या निदर्शनांतून हे स्पष्ट होत आहे. याखेरीज काही शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये काही उलट दिशेचे बदल करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक त्रस्ततेची भावना निर्माण झाली आहे. निवडणूक पद्धतींविषयी विश्वास नसल्यामुळे काही तरुणांनी भीमसेनेसारखे अराजकीय गट तयार केले आहेत. उना प्रकरणानंतर दलित अत्याचाराची झळ बसलेल्या दलितांचा हिंदुत्त्वाच्या उदारमतवादावर जो काही उरलासुरला विश्वास होता, तोही संपुष्टात आला आहे आणि म्हणूनच काही जणांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला आहे. राजकीय पातळीवर दलित राजकीय पक्ष आणि सामुदायिक कृती करणारे गट हे धर्मनिरपेक्ष शक्तींकडे वळत आहेत. उत्तर प्रदेशात दलित नेत्या मायावती यांचा बहुजन समाज पक्ष किंवा बसपने समाजवादी पक्षाशी केलेली युती हे याचे सर्वाधिक लक्षणीय उदाहरण आहे. न्याय, समता आणि वैयक्तिक स्वातंत्र्य या आधारावर समाजाची उभारणी करण्याच्या तत्त्वप्रणालीपासून दूर जाण्याच्या दिशेने हळूहळू होत असलेल्या बदलांना दिल्या गेलेल्या या स्पष्ट प्रतिक्रिया आहेत. संबंधित लोक या अनुभवाधिष्ठित माहितीकडे लक्ष देतील आणि प्रतिक्रिया व्यक्त करतील, धोरणात दुरुस्ती करून बदल घडवून आणतील अशी मला आशा आहे. ●●●

# मोदींच्या प्रचाराची बरसात






जयदेव डोळे
औरंगाबाद

येत्या लोकसभा निवडणुकीचा प्रचार तसा मागच्या लोकसभा निवडणुकीपासूनच सुरू झाला. त्याचा इंटरनेटवर जगणाऱ्या चार-पाच मंत्र्यांना लाभ झाला. यू ट्यूब, फेसबुक, व्हॉट्स्ॲप, ट्विटर, इन्स्टाग्राम अशी ती काही मंत्र्याची नावे. व्यासपीठेच ती, त्यावर कोणीही यावे व प्रदर्शन करावे अशी त्यांची रचना केलेली. त्याचा फायदा भाजप, संघ परिवार यांनी खूप घेतला. त्यांनी घेणे आणि काँग्रेससकट अन्य पक्षांना तो घेता न येणे याचे रहस्य प्रत्येकाच्या राजकारणात दडले आहे. हे रहस्य येत्या निवडणुकीपर्यंत अगदी परिचयाचे होईल. पण ते समजावून घेतले पाहिजे. २०१४ पासून पंतप्रधान मोदी व त्यांच्या पक्षाने 'आयडेन्टिटी पॉलिटिक्स' अर्थात परिचयाच्या राजकारणाचा खूप वापर केला. त्यात त्यांना यश आले. परिचय म्हणजे ओळख. मी कोण, ते कोण, आम्ही कोण असे आत्मपरिचयाचे व परपरिचयाचे मुद्दे मोदी व भाजप यांनी प्रचारात पेरले. चहावाला, गरीब घरचा, घराणे नसलेला, ओबीसी, सेवाव्रती आणि साहसी अशी स्वतःची ओळख नरेंद्र मोदी आपल्या भाषणांमधून करत सुटले. काँग्रेस पक्ष म्हणजे भ्रष्टाचारी, कामचुकार, घराणेशाहीचे डबके, दुबळे नेतृत्त्व आणि तडजोडवादी असा प्रचार ते करू लागले. यासोबत धर्म, ईश्वर, परंपरा, इतिहास यांचे पालन करणारा नेता व पक्ष अशीही प्रतिमा बनवली गेली. गरीब-श्रीमंत, शोषक-शोषित, समाजवादी-भांडवलदार, निधर्मी-धर्मनिष्ठ, समतावादी-विषमतापूजक, अवर्ण-सवर्ण, लोकशाही- हुकूमशाही, डावे-उजवे असे जे राजकीय तात्त्विक मुद्दे होते, ते सारे बाजूला ठेऊन तडफदार-मिळमिळीत आणि देशी-विदेशी यांसारखे

**समाजमाध्यमे वापरणारे व भाजपच्या प्रचारात उतरणारे जसे ब्राह्मण-मराठा आहेत, तसे धनगर, माळी, सोनार, कुंभार, लोहार, वंजारी, मातंग, कोळी, चर्मकार, आदिवासी आदी समाजघटकही आहेत. सत्ता मिळवण्याचा विश्वासार्ह, बळकट अन् गरजू पक्ष त्यांच्यासाठी भाजप हाच आहे. म्हणून प्रचारात भावनिक, अस्मितेचे, स्वाभिमान, गर्व यांचेच मुद्दे गाजणार व गरजणार. एक विरूद्ध अनेक म्हणजे 'मोदी विरूद्ध बाकीचे विरोधक नेते' असाही एक संघर्ष संघ परिवार उभा करीत आहे. साऱ्या प्रचारात हा मोठा प्रभावी मुद्दा तयार केला जातो आहे. तो आपण हुकूमशाही विरूद्ध लोकशाही अशा दृष्टिकोनातून स्वीकारला पाहिजे.**



वर्णनात्मक मुद्दे प्रचारात घुमवण्यात आले. तडफदार अथवा धडाकेबाज निर्णय करणारा माणूस यांत तत्त्वज्ञान काही नाही. घराणे नसलेला नेता म्हणून पुढे येणे यांत सिद्धांत काही नाही. परंतु असे सारे मुद्दे लोकांच्या गळी उतरवले गेले. इलेक्ट्रॉनिक व्यासपीठांचा बेमालूम वापर त्यासाठी करण्यात आला. सारा प्रचार व्यक्तीकेंद्री आणि ओळखकेंद्री केला गेला. आर्थिक शोषण, शैक्षणिक मागासलेपणा, जातविषयक विषम वागणूक, पर्यावरणाचा अधिकार वगैरे ठोस मुद्दे जाणीवपूर्वक टाळले गेले. कारण भाजप भावनांचे राजकारण करणारा पक्ष आहे. त्याची जननी रा.स्व.संघ ही संघटना ना कधी स्वराज्यासाठी, ना शोषणाविरूद्ध, ना कधी जुलूमांविरूद्ध झगडली. हिंदू कसे असुरक्षित होत चालले आणि दहशतवादाने देश कसा भयग्रस्त झाला आहे, त्याचा भ्रम पसरवला गेला. पोटापाण्याचे मुद्दे






'सबका साथ, सबका विकास' या घोषणेत सामावून टाकले गेले. 'अच्छे दिन आएंगे' असे भोंगळ विधान करून अपेक्षा वाढवण्यात आल्या. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांनी जशी 'लेट अस मेक अमेरिका ग्रेट अगेन' अशी भलामण करीत लोकांच्या 'दुखऱ्या' भावनांना साद घातली; तसेच काहीसे दोन वर्षे आधी भारतात झाले. ओबामासारख्या कृष्णवर्णीय आणि अल्पसंख्याक राष्ट्रपतीने जणू अमेरिकेस खाली खेचले असा भ्रम तयार करीत ट्रम्प निवडणूक जिंकले. तिथे गोऱ्या लोकांचीच सत्ता हवी आणि महिला व परधर्मीय यांचे लाड मुळीच करता कामा नयेत, असा आडून आडून प्रचार करून रिपब्लिकन पक्ष सत्तारूढ झाला. आत्मकेंद्री आणि भावकेंद्री प्रचार आता बहुतेक देशांच्या निवडणुकांचा प्रघात झाला आहे. गोरगरिबांचे स्थलांतर, भूमिपुत्रांचा-भूमिकन्यांचा रोजगार, स्वसंस्कृती आणि देशाची असुरक्षितता आदी भावनिक मुद्दे मांडून या निवडणुका जिंकल्या जात आहेत. नुकताच पुलवामा येथे दहशतवादी हल्ला झाला. तो झाल्या झाल्या संघ परिवाराने प्रचाराचा तो एक अप्रत्यक्ष मुद्दा करून टाकला. राफेल विमान खरेदी, अंबानी, बेरोजगारी, दुष्काळ, शेतमालाला भाव, महागाई, शैक्षणिक दुरवस्था, आरोग्यसेवा आखडलेली, महिलांवर होणारे अत्याचार असे कैक मुद्दे प्रचारातून गायब करण्याची संधीच त्याला मिळाली. बेकारी, गुंतवणूक, औद्योगिकीकरण, संशोधन, पर्यावरणाचे संरक्षण वगैरे मुद्दे थेट सरकारच्या धोरणावर चर्चा करतात. म्हणून ते येऊ द्यायचे नाहीत असा हा डाव आहे. राममंदिराचा कार्यक्रम सरकारचा कसा असू शकतो? पण प्रत्यक्ष भाजपकडून तो न मांडला जाता त्याच्या जवळच्या संघटनेकडून मांडला गेला. तोही 'आयडेंन्टिटी पॉलिटिक्स'चा नमुना. पोट विरूद्ध श्रद्धा असा संघर्ष उभा न करता, श्रद्धा किती महत्त्वाची असते याची भाषणे करीत राहायची. पोटाचा प्रश्न आपोआप बाजूला पडतो अशी अटकळ या राजकारणाची असते.

आरक्षण, मजबूत सरकार, आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची प्रतिष्ठा वाढणे, राष्ट्रैक्य, वेगवान रेल्वे, योगाचे शिक्षण हे मुद्दे सपशेल भावनिक असून ते प्रचारासाठी नक्कीच उपयोगी पडतील. पोटासाठी मात्र नाही! 'माणूस काय फक्त खाण्यापिण्यासाठी जगतो काय? त्याला स्वाभिमान, अस्मिता, अहंकार या भावनाही असतात आणि त्यासाठी तो प्राणत्यागही करू शकतो' असा युक्तिवाद भाजप व संघ परिवार मांडतो. जणू काही भारतातील पोटापाण्याचे प्रश्न मिटले आणि आता मानसन्मानाचे शिल्लक आहेत! मान, स्वाभिमान, अपमान हे मुद्दे मानवीच आहेत, परंतु त्यांचा निवडणूक जिंकण्यासाठी होणारा वापर घोर फसवणूक करणारा आहे. बेकारी प्रचंड अपमानास्पद असते, कर्ज मानहानीकारक असते आणि महागाईमुळेच उच्च शिक्षण घ्यायला फार निराशा येत असते. त्यांची दखल कोण घेणार? पण देशभक्ती जागृत झाली की या साऱ्यांचा विसर पडतो असा ठाम विश्वास संघ परिवाराचा आहे. भांडवलदार नेहमी राष्ट्रवाद, देशभक्ती, त्याग आणि सेवा यांचा गौरव करीत असतात. त्यांच्या हातातील प्रसारमाध्यमांनी मरेस्तोवर काम करावे आणि संसाराकडे लक्ष देऊ नये, कामगाराने मरेस्तोवर काम करावे आणि कारखान्यात सुरक्षिततेच्या उपाययोजनांची मागणी करू नये, महिलांनी भरपूर काम करीत राहावे आणि बाळंतपणाची रजा उपभोगू नये असे त्यांना वाटते की काय? नाझीवाद, फासीवाद व राष्ट्रवाद यांचा म्हणूनच फार निकट संबंध असे. सारे भांडवलदार या वादांच्या पाठीशी उभे होते. हिटलर वांशिक संहार आणि विरोधकांचा निःपात करीत जगाला बंदीवान करू पाहात होता; म्हणून भांडवलदारी देश जर्मनीविरूद्ध उभे राहिले. भारतही असाच हुकूमशाह जन्माला येण्याची वाट पाहतो आहे. सारी भांडवली माध्यमे त्याची प्रतिमा भावनिक मुद्द्यांवर उभी करीत आहेत. अंबानी व त्यांची माध्यमे हेच राजकारण चालवत आहेत.

हिंदू विरूद्ध मुसलमान, ओबीसी विरूद्ध दलित, जुने सवलतवाले विरूद्ध नवे सवलतवाले, परंपरापूजक विरूद्ध

परंपराभंजक, सनातनी विरूद्ध आधुनिक, जुने विरूद्ध नवीन हा 'मी विरूद्ध बाकीचे' असा संघर्ष संघ परिवाराने उभा केला असून तो प्रचारात उमटूही लागला आहे. व्यक्तीवाद नेहमीच तुलना करतो. मी असा आहे वा मी अशी आहे म्हणून माझ्यापाशी अमुक गोष्ट नाही, अशी वंचना तो उभी करतो. ॲड. आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी याचाच उत्तम मासला आणि तो भाजपच्या 'आयडेंन्टिटी पॉलिटिक्स'ला पूरक ठरणारा आहे. या आघाडीत एमआयएम हा मुस्लिमांचाही पक्ष आहे. छोट्या जातींच्या उमेदवारांना अनेकदा डावलले जाते हे खरे आहे. मुसलमानांना तर मुद्दाम वगळले जाते. सामाजिक प्रतिष्ठा राजकीय सत्तेशिवाय प्राप्त होत नाही हा त्यांचा मुद्दा, मात्र आज बोथट झालेला आहे. कारण त्यांनी जी 'बहुजन वंचित आघाडी' बनवलेली आहे, तीमध्ये बहुजन परस्परांना वंचित करीत असतात आणि त्याचे कारण त्यांनीच टिकवून ठेवलेले जातकारण व जातीव्यवस्था हे आहे; याचा विचार केलेला नाही. आरक्षण व सवलती जातिसंस्था नष्ट करण्यासाठी आहेत की, ती बळकट करण्यासाठी? ज्या पक्षाला व संघटनेला हिंदू राष्ट्र उभे करायचे आहे, ती जाती संपवू पाहील की टिकवू? परिचय सांगण्याच्या राजकारणात व प्रचारात आंतरजातीय विवाह, धर्मनिरपेक्षता, समानता, महिलांचे हक्क व स्वातंत्र्ये, अंधश्रद्धा, रूढी-परंपरा आदी विषय येतील कसे? ज्यांना राजकीय सत्ता मिळवायची आहे त्यांना हे मुद्दे प्रचारात न आणता ती मिळाली तरी तिचा उपयोग शून्य आहे. वंचना आत्महीही असते आणि अन्यांकडूनही असते. आत्मवंचना आधी थांबवून मग वंचित ठेवणाऱ्यांविरूद्ध चाल केली पाहिजे. आघाडीचा प्रचार ज्यांनी वंचित ठेवले त्यांच्याविरूद्ध न केला जाता विशिष्ट पक्षांविरूद्ध होतो आहे. वंचना तर सर्वच पक्षांनी केलेली आहे. राजकारणात 'सब घोडे बारा टक्के' ही भूमिका आत्मघातकी असते. शत्रू कोण, मित्र कोण याची निवड करावीच लागते. म्हणजे भारताला भेडसावणाऱ्या समस्यांची वाच्यता निवडणूक प्रचारात करायची जबाबदारी उदारमतवादी, लोकशाहीवादी, डावे, समतावादी, धर्मनिरपेक्षता मूल्ये मानणारे पक्ष उचलणार. (त्यांची समाजमाध्यमातील उपस्थिती गेल्या दोनेक वर्षांत दिसू लागली आहे.) ही माध्यमे भडक, चिथावणीखोर, उथळ, विकृत, असत्य, अर्धसत्य, विपर्यस्त आणि पूर्ण एकांगी मतप्रदर्शन आणि माहिती प्रसारण करतात. भावनिक राजकारणाला अशीच माध्यमे फार उपयुक्त! त्यांचा व ती वापरणारे यांचा संविधानामधील मूल्यांवर व तरतुदींवर विश्वास नाही. लोकशाहीरचना उद्ध्वस्त करण्याचा त्यांचा इरादा उघड झालेला आहे. सर्वत्र संशयाचे वातावरण निर्मून या माध्यमाच्या वापरकर्त्यांनी भयंकर अस्वस्थता सुबुद्ध नागरिकांमध्ये तयार केली आहे. ज्यांना 'आयडेंन्टिटी क्रायसिस' नाही, म्हणजे चेहराच नाही, याची काळजी नाही; ते या प्रचाराचा नीट विचार करू शकतील. सबळ, सत्ताधारी अन् सामाजिकदृष्ट्या प्रगत जातीसुद्धा मागासलेल्यांच्या तुलनेत स्वतःला अन्यायग्रस्त मानू लागल्या व त्यांनाही आरक्षित संवर्गात आणून सोडले हे संघ परिवाराचे एक मोठे यशच. म्हणजे आपली ओळख प्रबळ व




राज्यकर्ता म्हणून राहू नये अशी खटपट ब्राह्मण, मराठा, प्रभू, कायस्थ, राजपूत, जाट इत्यादी जातींनी केली आणि संघ परिवाराने 'ते विरूद्ध



इतर' या रकान्यात त्यांनाही बसवले. त्या जाती आता प्रचारात हिरीरीने उतरून हिंदुत्त्वासाठी जमीन नांगरून ठेवणार! एका अर्थाने आपल्या हातून निसटलेली सत्ता परत मिळवू पाहणार. छोट्या जातींना या बड्या जाती मग पुन्हा भरडत राहणार. कैक छोट्या जातींना भाजप हाच आपला तारणहार वाटतो. मग वंचित बहुजन मते कोणाला देतील? स्वतःच्या पक्षाला की भाजपला? समाजमाध्यमे वापरणारे व भाजपच्या प्रचारात उतरणारे जसे ब्राह्मण-मराठा आहेत, तसे धनगर, माळी, सोनार, कुंभार, लोहार, वंजारी, मातंग, कोळी, चर्मकार, आदिवासी आदी समाजघटकही आहेत. सत्ता मिळवण्याचा विश्वासार्ह, बळकट अन् गरजू पक्ष त्यांच्यासाठी भाजप हाच आहे. म्हणून प्रचारात भावनिक, अस्मितेचे, स्वाभिमान, गर्व यांचेच मुद्दे गाजणार व गरजणार. एक विरूद्ध अनेक म्हणजे 'मोदी विरूद्ध बाकीचे विरोधक नेते' असाही एक संघर्ष संघ परिवार उभा करीत आहे. साऱ्या प्रचारात हा मोठा प्रभावी मुद्दा तयार केला जातो आहे. तो आपण हुकूमशाही विरूद्ध लोकशाही अशा दृष्टिकोनातून स्वीकारला पाहिजे. एककेंद्री सत्ता भारताला पचत नाही. भारताचे संघराज्यात्मक राजकीय स्वरूप सर्व राज्ये व राज्यांच्या संस्कृती यांना सारखा वाटा देणारे आहे. इथे मोदी व शाह यांनी गुजराती अधिकारी, भांडवलदार, पत्रकार, आध्यात्मिक गुरू, कलावंत यांची फौज उभी करून कारभार चालवल्याचे आपण पाहतो आहोत. पातळी सोडून बोलणे, आपण पंतप्रधान आहोत हे विसरून धमकीवजा, बदनामीकारक, निंदक आणि कुत्सित भाषणे करणे याचाही आता खूप अनुभव भारतीयांना येत राहील. मोदी यांचे असे बोलणे समाज माध्यमांमधून जो बेभान व असभ्य मजकूर सांडला जातो त्यासारखे वाटू लागले आहे. ही माध्यमे असंख्य हिंसक घटनांना कारण ठरली आहेत. बेगुमानपणा लोकशाहीच्या सर्व संकेतांची मोडतोड करणारा असतो. त्यामुळे लोकशाही चौकट उखडून टाकायची योजना यावेळच्या प्रचारात दिसू लागेल. लोकशाहीने दिलेल्या अनेक सोयींचा तिचाच घात करण्यासाठी होणारा वापर पाहणे आपणासारख्यांनी सहन करू नये. त्याचा प्रतिकार व्हायलाच हवा. एक उदाहरण पाहू. २०१४ साली भ्रष्टाचाराचा केवढा तरी मुद्दा प्रचारात आणून भाजपने सत्ता मिळवली. नंतर मात्र कधी त्यांचे नेते लाचलुचपत आणि अफरातफर वा भ्रष्टाचार यांचा उल्लेख करताना ऐकू आले नाहीत. भारतातील भ्रष्टाचार राजकारणनिर्मित असून त्यात सारेच पक्ष सामील असतात. आजही कोठेही पैसे खाणे कमी झालेले नाही. मंत्री खात नाहीत म्हणजे अधिकारी-कर्मचारी, पाकसाफ आहेत असे कसे मानायचे? सत्ताधाऱ्यांपर्यंत अदृश्यपणे पैसा पोचतच असतो. तो घेताना आपण दिसू नये एवढी काळजी घेतली म्हणजे झाले! लोकपाल व लोकायुक्त नेमणुकीसाठी आग्रही असलेला भाजप त्यांच्या पाच वर्षांत नेमणुका का करू धजला नाही? विरोधक तरी याचा उल्लेख करू शकतील का? याचा अर्थ समाज माध्यमाच्या रचनेत दडलेला आहे. सर्वसामान्य माणूस 'भ्रष्टाचार हटाव' ची मागणी करीत असल्याचा भास निर्माण करण्यात आला आणि आम्ही सत्तेवर आल्यास तो (भ्रष्टाचार) समूळ नष्ट करू, असाही भास उभा करण्यात आला! मतदार बिचारे भुलले आणि गंडले. समाजमाध्यमे कोणा एकाला जबाबदार नसतात. वृत्तपत्रात जसा संपादक व प्रकाशक असतो तशी रचना ट्विटर अथवा अन्यत्र नाही. सारे संदेश इकडून तिकडे बेफिकीर पाठवले जात असतात. त्याचा प्रचार करण्यासाठी फार लाभ झाला. कारण अफवा, असत्य आणि अर्धसत्य दूरवर पोचवणे सोपे आहे. मी, माझे, मला असा आत्मकेंद्री प्रचाराचा गाभा असलेला हा मीडिया खुद्द मोदी यांनाही लाभतो आहे. एकंदर, व्यक्तीवाद, आत्मकेंद्रीपणा आणि परनिंदा यांमध्येच येत्या निवडणुकीचा प्रचार दिसणार आहे.

●●●



# पुरुषप्रधान संस्कृतीमुळे बहुजन महिलांचे राजकारण मर्यादित





**डॉ. माला मुखर्जी**
नवी दिल्ली

**संस्कृती** आणि राजकारण यांचे हब म्हणून असलेल्या कोलकात्यात माझा जन्म झाला आणि तिथेच मी लहानाची मोठीही झाले. त्यामुळे राजकीय चर्चा ही नियमित प्रक्रिया असलेल्या किंवा त्याहूनही जास्त चांगल्या शब्दांत सांगायचे तर प्रौढांचा वेळ घालवण्याचा आवडता छंद असलेल्या आणि त्यात महिलाही सक्रियपणे सहभागी होत असलेल्या वातावरणातच माझे बालपण गेले. माझ्या मॉमच्या कार्यालयात दर वर्षी महिला दिन साजरा करत मी मोठी झाले. तिथे महिलांच्या विविध हक्कांविषयी सविस्तर चर्चा होत असे. मात्र महिलांच्या राजकीय हक्कांविषयी अगदी क्वचितच कोणीतरी चर्चा करत असे. सार्वत्रिक प्रौढ मताधिकारामुळे आपल्या देशात महिलांना समान नागरिकत्व आणि मताधिकार मिळाला आहे. मात्र कायदे तयार करण्यातील आणि संसदीय राजकारणातील महिलांच्या भूमिकेचा प्रश्न हा मोठ्या प्रमाणात दुर्लक्षित, चर्चा न होता तसाच राहिला आहे. आमच्या देशात खरे तर ममता बॅनर्जी किंवा दीदींसारख्या आधीच वलयांकित असलेल्या प्रभावी महिला राजकारणी आहेत. त्यांनी राष्ट्रीय पातळीवरच्या राजकारणात आधीच इतिहास घडवला आहे. दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधींच्या आणि स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झालेल्या महिला नेत्यांच्या वारशातून संसदेतील आपल्या आरक्षणासाठी संघर्ष करण्यासाठी सर्वसामान्य महिलांना फारशी प्रेरणा मिळालेली नाही. पानस्कुरा मतदारसंघाच्या खासदार गीता मुखर्जी यांनी प्रत्येक वर्तुळात राजकारणातील महिलांच्या आरक्षणाची मागणी केली असली आणि त्यातूनच प्रसिद्ध महिला आरक्षण विधेयक आकाराला आले असले तरीही या विधेयकाची तारीफ होण्याऐवजी त्याच्यामुळे अनेक वादविवादांनाच तोंड फुटले आहे. अगदी आजही राजकीय वादविवादाचा तो एक अत्यंत ज्वलंत विषय आहे.

या विधेयकाला बरा-वाईट, यशापयशाचा इतिहास आहे. १९९६ मध्ये पहिल्यांदा आणि १९९८ मध्ये पुन्हा एकदा ते मांडण्यात आले. त्यानंतर २००८ मध्ये ते पुन्हा एकदा मांडले गेले. मात्र दर वेळी उप-कोट्याच्या आणि अंमलबजावणीच्या पद्धतींसंदर्भातील विविध वादविवादांमुळे ते बारगळले. ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्ती कायद्याने आधीच स्थानिक स्वयं-शासनातील महिला आरक्षणाची हमी दिली आहे. परंतु अद्यापही राज्य विधानसभांच्या आणि संसदीय पातळ्यांवर त्याची अंमलबजावणी झालेली नाही.

सन १९९६ मध्ये ज्यावेळी हे विधेयक पहिल्यांदा मांडण्यात आले होते, त्यावेळी गीता मुखर्जी यांच्या नेतृत्त्वाखालील संयुक्त संसदीय समितीने या विधेयकाचे परीक्षण करून काही शिफारशी सुचवल्या होत्या. लोकसभेत आणि प्रत्येक राज्याच्या विधानसभांतही त्या त्या ठिकाणच्या एकूण जागांच्या एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या जाव्यात अशी या समितीने शिफारस केली होती. दुसरी गोष्ट म्हणजे, या कोट्यांतर्गत एससी, एसटी, ओबीसी आणि अल्पसंख्याक व विशेषतः अँग्लो इंडियन महिलांसाठी कोटा ठेवला जावा अशीही शिफारस करण्यात आली होती. तिसरी गोष्ट अशी होती, की प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतर सर्व आरक्षित जागा आलटून पालटून दिल्या जाव्यात आणि सर्व मतदारसंघ


पुन्हा एकदा आरक्षित केले जावेत अशीही शिफारस करण्यात आली होती. चौथ्या शिफारशीनुसार राज्यसभा किंवा वरच्या सभागृहातील आरक्षणाच्या समस्यांचे परीक्षण करण्याची गरज व्यक्त करण्यात आली होती. मात्र सन २००८ मध्ये राज्यसभा आणि राज्य विधानसभांच्या वरिष्ठ सभागृहांतील किंवा राज्य विधानपरिषदांमधील महिला आरक्षण वगळता यांपैकी बहुतांश शिफारशी मान्य करण्यात आल्या. दुसरी गोष्ट म्हणजे, यात अँग्लो इंडियन वगळता ओबीसी आणि अल्पसंख्याक आरक्षणासाठीच्या कोट्याची तरतूदही नव्हती. म्हणून या विधेयकावर विविध राजकीय पक्षांनी आणि नेत्यांनी प्रचंड टीका केली. त्यांनी असा दावा केला होता, की ओबीसी आणि अल्पसंख्याक आरक्षण दिले गेले नाही तर त्यामुळे या आरक्षणाद्वारे केवळ अभिजन वर्गाच्या राजकारणाला प्रोत्साहन मिळेल आणि त्यामुळे उपेक्षित किंवा वंचित विभागातील महिलांऐवजी फक्त अभिजन समाजातील महिलांच्या प्रतिनिधित्वातच वाढ होईल.

सन २००८ मध्ये कायदा आणि न्यायविषयक स्थायी समितीकडे हे विधेयक पाठवण्यात आले. त्याच्या दोन सदस्यांनी आणखी सूचना केल्या. पहिली म्हणजे प्रत्येक राजकीय पक्षाने महिला उमेदवारांना २० टक्के तिकिटांचे वाटप केलेच पाहिजे आणि दुसरी म्हणजे आरक्षण २० टक्क्यांच्या पलीकडे जाता कामा नये. तिसरी गोष्ट म्हणजे, ओबीसी आणि अल्पसंख्याक यांच्यासाठी कोटा असला पाहिजे. मात्र या समितीला अंतिम अहवालासंदर्भात एकमताने निर्णय घेण्यात अपयश आले. आता इथे असा प्रश्न उद्भवतो की, राज्यसभेत महिलांना आरक्षण मिळणे एवढे अवघड का आहे? घटनेचे ८० वे कलम असे स्पष्ट करते की, राज्य विधानसभांचे आणि केंद्रशासित प्रदेशांचे सदस्य यांच्याकडून सापेक्ष प्रमाणातील प्रतिनिधित्वाच्या माध्यमातून एका हस्तांतरणीय मताद्वारे राज्यसभेचे खासदार निवडले जातील. साध्या शब्दांत सांगायचे तर आपण आमदारांना निवडून देतो आणि आमदार त्यांच्या पक्षांनी नामनिर्देशित केलेल्या लोकांमधून राज्यसभेच्या खासदारांची निवड करतात. पहिल्यांदा सर्वाधिक प्राधान्य असलेल्या उमेदवाराला मते दिली जातात आणि नंतर त्याहून कमी कमी प्राधान्य असलेल्या मतदारांना मते दिली जातात. म्हणून अगदी ३३ टक्के जागा महिलांसाठी किंवा एससी, एसटींसाठी आरक्षित असल्या तरीही त्या सर्वच्या सर्व महिला सर्वाधिक प्राधान्यक्रमाच्या उमेदवार असतीलच याची हमी देता येत नाही. 'फर्स्ट पास्ट द पोस्ट' यंत्रणेतून आरक्षणाची अंमलबाजवणी करणे शक्य आहे. म्हणून राज्यसभेत आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी घटनात्मक दुरुस्तीची गरज आहे.

राज्यसभेतील आरक्षणाविषयीची चर्चा बाजूला ठेऊन आपण भारताच्या संसदीय राजकारणातील महिलांच्या प्रतिनिधित्वात आणि सहभागात झालेला बदल आणि त्याची संरचना याकडे पाहिले तर आपल्याला एक रोचक चित्र पहायला मिळते. सध्याचा सत्ताधारी पक्ष असा दावा करतो, की १६ व्या लोकसभेत गेल्या सत्तर वर्षांचा विचार करता महिला खासदारांची संख्या सर्वोच्च आहे आणि त्या प्रामुख्याने सत्ताधारी पक्षाच्या आहेत. हा दावा खरा असला, तरी त्यात किंचित बदल आहे. सोळाव्या लोकसभेत ६८ महिला खासदार आहेत. परंतु त्यापैकी फक्त १२ जणीच एससी समाजाच्या आहेत. एकूण एससी खासदार ८४ आहेत आणि एकूण एससी संसद सदस्यांमध्ये महिला सदस्यांचे प्रमाण केवळ १४.२९ टक्के आहे.

कालौघात महिलांच्या संसदेतील प्रतिनिधित्वात वाढ झाली आहे असा आपण दावा केला तरी ते अंशतः सत्य आहे. कारण एससीच्या महिलांचे प्रतिनिधित्व कमी किंवा तितकेच राहिले आहे आणि ते फक्त २ टक्के आहे. या आलेखातून हे उघड होते, की सर्वसामान्य वर्गवारीतील महिलांची टक्केवारी १९७१ च्या ३.४ टक्क्यांवरून २०१४ मध्ये ९.२ टक्क्यांवर (१६ व्या लोकसभेत) पोहचली असली तरीही एससी महिलांचे प्रमाण १ (१९७१) टक्क्यावरून २ टक्क्यांवरच गेले आहे. काही वर्षांमध्ये तर ही टक्केवारी १ टक्क्यांहूनही खाली घसरली होती.

**आलेख १. लोकसभेतील एससी आणि सर्वसामान्य वर्गवारीतील महिलांचे प्रतिनिधित्व (१९७१-२०१४)**




**माहितीचा स्रोत:** पीआरएस लेजिस्लेटिव्ह रिसर्च
http://www.prsindia.org/

एसटीच्या महिलांचा विचार करता, सध्याच्या लोकसभेत फक्त ५ महिला आहेत. म्हणून ज्या ज्या वेळी आपण महिलांच्या संसदेतील प्रतिनिधित्त्वाविषयी बोलतो, त्या त्या वेळी आपण एससी/एसटीच्या महिलांच्या प्रतिनिधित्वाचा क्वचितच विचार करतो. असेही आढळून आले आहे की, एससी/एसटी प्रतिनिधी आणि त्यातही विशेषतः महिला प्रतिनिधी या प्रामुख्याने विविध स्थानिक पक्षांच्या आहेत. सध्याच्या सत्ताधारी पक्षाकडे पाच एससी महिला खासदार असल्या तरी इतर खासदार या स्थानिक पक्षांच्या आहेत आणि म्हणूनच त्यांच्यापैकी बहुतेक महिला खासदार या तामिळनाडूच्या किंवा पश्चिम बंगालच्या आहेत. त्यांच्यापैकी थोड्या जणी ओडिशाच्या आहेत. एसटी महिला संसद सदस्यांच्या बाबतीतही असाच प्रवाह दिसून येतो. महाराष्ट्रातून एकही एससी महिला खासदार नसावी ही आश्चर्यचकित करणारी बाब आहे.

सोळाव्या लोकसभेतील एससी महिला खासदारांपैकी ५० टक्के खासदार भाजपच्या, २५ टक्के एआयटीसीच्या, १७

टक्के अखिल भारतीय अण्णा द्रमुकच्या आणि भारतीय जनता दलाच्या आहेत. त्यांच्यापैकी एकही खासदार बसपाची किंवा जातिव्यवस्थेच्या विरोधात पूर्णपणे संघर्ष करणाऱ्या इतर कोणत्याही पक्षाची नाही, ही बाबही रोचक आहे.

स्थानिक पक्ष राष्ट्रीय पक्षांच्या तुलनेत स्थानिक समस्या अधिक चांगल्या प्रकारे मांडू शकतात. ते फक्त स्थानिक समस्याच सोडवत नाहीत, तर स्थानिक समाजांमध्ये मोकळेपणाने मिसळूही शकतात. एवढेच नव्हे; तर लोकप्रिय स्थानिक नेते नेहमीच आपली भाषणे स्थानिक भाषांमध्ये देतात आणि त्यामुळे सर्वसामान्य लोक त्यांच्या भाषणांकडे आकर्षित होतात. अशाप्रकारे स्थानिक पक्ष तळागाळातील स्तरापासूनच्या सर्व समाजांना सहजपणे सक्रिय करू शकतात आणि एकजूट करू शकतात. इथे भाषा हा मुख्य अडथळा असतो. स्थानिक पक्ष स्थानिक भाषांचा वापर करतात; परंतु अखिल भारतीय पातळीवरचे पक्ष स्थानिक भाषांऐवजी हिंदी किंवा इंग्रजी भाषाच अधिक प्रमाणात वापरतात. या सर्व घटकांमुळे उपेक्षित, वंचित समाजांमध्ये स्थानिक पक्षच अधिक लोकप्रिय असतात.

सोळाव्या लोकसभेतील एससी महिला खासदार या प्रामुख्याने पहिल्यांदाच संसदेत गेलेल्या आहेत. त्यांच्यापैकी ९२ टक्के खासदार या पहिल्यांदाच लोकसभेवर निवडून गेल्या आहेत. तर ६६ टक्के एससी पुरुष आणि ५८ टक्के उच्चवर्णीय महिला या पहिल्यांदाच खासदार बनल्या आहेत.

प्रतिनिधित्वाप्रमाणेच संसदेतील कामकाजातील एससी खासदारांचा सहभाग मोठ्या प्रमाणात भिन्न आहे. एससी महिला खासदार या एससी पुरुष खासदारांच्या आणि त्यांच्या उच्चवर्णीय भगिनींच्या तुलनेत अधिक नियमितपणे संसदेत उपस्थित राहतात. त्यांच्यापैकी कोणाचीही उपस्थिती ७० टक्क्यांहून कमी नाही आणि अनेक जणींची उपस्थिती तर विक्रमी म्हणावी एवढी म्हणजे ९० टक्क्यांहून अधिक आहे.

**एससी (पुरुष आणि स्त्रिया) आणि उच्चवर्णीय महिला खासदारांचा उपस्थितीचा दर (सोळावी लोकसभा – २०१४)**


| | एससी महिला | | एससी पुरुष | | इतर महिला | |
|---|---|---|---|---|---|---|
| उपस्थिती | एन | % | एन | % | एन | % |
| ५०% हून कमी | ० | ० | १ | १.४० | ९ | १८ |
| ५० ते ७०% | ० | ० | ६ | ८.६० | १० | २० |
| ७० ते९०% | ९ | ७५ | ३२ | ४५.७० | १९ | ३८ |
| ९०%हून अधिक | ३ | २५ | ३१ | ४४.३० | १२ | २४ |
| एकूण | १२ | १०० | ७० | १०० | ५० | १०० |

(ही माहिती १ जून २०१४ ते ९ ऑगस्ट २०१८ या कालावधीतील आहे. (८ ऑगस्ट २०१८ पर्यंतच्या उपस्थितीची आकडेवारी उपलब्ध आहे.)

नियमित उपस्थितीप्रमाणेच एससी/एसटी महिला खासदार राष्ट्रीय चर्चेत सक्रिय सहभागी होतात. सध्याच्या लोकसभेत ६२.९ टक्के चर्चा या राष्ट्रीय विषयांवरच्या होत्या. ८० टक्क्यांहून अधिक एससी महिला खासदार या चर्चांना उपस्थित राहिल्या आणि त्यात त्यांनी भागही घेतला. जवळजवळ एससी पुरुषांच्या टक्केवारीएवढेच त्यांचेही या बाबतीतील प्रमाण आहे.

**आकृती २. राष्ट्रीय चर्चांमधील सहभाग**

**राष्ट्रीय चर्चेतील सहभाग (सरासरी ६२.९)**




**माहितीचा स्रोत :** पीआरएस लेजिस्लेटिव्ह रिसर्च

मात्र तरीही कायदे बनवण्याच्या प्रक्रियेत एससी महिला खासदार सर्वात कमी सक्रिय आहेत. एससीच्या महिला खासदारांनी कोणतेही 'खासगी सदस्य विधेयक' मांडले नसल्याचे दिसून आले आहे.

**खासगी सदस्य विधेयके मांडणाऱ्या खासदारांची टक्केवारी**

| | उच्चवर्णीय महिला | | एससी महिला | | एससी पुरुष | |
|---|---|---|---|---|---|---|
| विधेयक नाही | ३४ | ६८% | १२ | १०० | ५५ | ७८.६०% |
| एक विधेयक | २ | ४% | ० | ० | ३ | ४.३०% |
| एकाहून अधिक | १४ | २८% | ० | ० | १९ | २७.१४% |

**माहितीचा स्रोत** ... पीआरएस लेजिस्लेटिव्ह रिसर्च
http://www.prsindia.org/

सत्ताधारी पक्षाकडे एससी महिला खासदारांची आणि महिला खासदारांचीही सर्वोच्च संख्या आहे. मात्र त्यांच्यापैकी एकही कॅबिनेट मंत्रिमंडळात नाही. त्या विविध स्थायी समित्यांच्या सदस्या आहेत, मात्र त्यांच्यापैकी एकीकडेही एकही खाते नाही.

एससी प्रतिनिधित्व आणि विशेषतः एससींमधील महिलांचे प्रतिनिधित्व पाहता काही निरीक्षणे नोंदवता येतात. महिलांना फक्त कमी प्रतिनिधित्वच मिळालेले नाही; तर विविध राजकीय पक्षांनी त्यांना वेगवेगळ्या प्रकारे, वेगवेगळ्या प्रमाणात प्रतिनिधित्व दिले आहे. सध्याच्या लोकसभेतील एकही एससी महिला खासदाराला जातिव्यवस्थेविरोधात लढा देणाऱ्या पक्षाची पार्श्वभूमी नाही. त्या सगळ्याच जातींशी संबंधित विषयांकडे दुर्लक्ष करणाऱ्या विविध स्थानिक पक्षांच्या किंवा सत्ताधारी पक्षाच्या आहेत. अगदी निवडून आल्यानंतरही त्यांचा कायदे बनवण्याच्या प्रक्रियेतील सहभाग कमीच राहतो, कारण त्यांना क्वचितच एखादे खाते सांभाळण्याची किंवा 'खासगी सदस्य

विधेयके' मांडण्याची संधी मिळते. त्यांचा एकंदर सहभाग उच्च असला तरी वैयक्तिक सहभाग कमी आहे.

आपल्याला महिलांच्या आरक्षणाच्या विधेयकाची आणि त्यामध्ये सामाजिक गटांच्या आरक्षणाची का गरज आहे? एखादी व्यक्ती असाही युक्तिवाद करू शकेल, की एवढे कमी प्रतिनिधित्व असूनही महिला राजकारणी आणि विशेषतः एससी महिला नियमित सहभागी होत आहेत. त्यांच्यापैकी बऱ्याच जणी पहिल्यांदाच निवडून आलेल्या आहेत. त्यामुळे पुनःपुन्हा संधी मिळालेल्या व्यक्तींपैकी त्या नाहीत आणि त्यांच्यापैकी बऱ्याच जणींना घराण्यांच्या वारशाची पार्श्वभूमी नाही. त्या सर्वसामान्य घरांतून आलेल्या आहेत. एकूण १२ खासदारांपैकी आठ जणींनी पदव्युत्तर पदवी मिळवलेली आहे. एक पदवीधर आहे आणि उर्वरित बारावी उत्तीर्ण आहेत. त्यामुळे त्यांची शैक्षणिक पार्श्वभूमीही चांगली आहे. त्यामुळे फक्त अभिजन पार्श्वभूमीच्याच महिलांनी राजकारणात यावे या संकल्पनेला आव्हान मिळण्याचा बदल होण्यास आधीच सुरुवात झाली आहे.

**संसदेत मिळालेली पदे (सोळावी लोकसभा)**

| स्थायी समितीची नावे | एससी महिला खासदारांची संख्या |
|---|---|
| रसायने आणि खते | २ |
| अन्न, ग्राहक व्यवहार आणि सार्वजनिक वितरण | १ |
| आरोग्य आणि कुटुंबकल्याण | १ |
| मानव संसाधन विकास | १ |
| अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती कल्याण | १ |
| विज्ञान आणि तंत्रज्ञान, पर्यावरण आणि वने | २ |
| सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण | १ |
| जल स्रोत | १ |
| एकही स्थायी समितीत नाही | १ |
| एकूण | ११ |

**माहितीचा स्रोत :** पीआरएस लेजिस्लेटिव्ह रिसर्च http://www.prsindia.org/

महिलांच्या आरक्षणामुळे तिकीट वाटपातील विसंगती संपुष्टात येऊ शकते. 'इंडिया टुडे'च्या सर्व्हेक्षणातून असे दिसून आले होते, की गेल्या लोकसभा निवडणुकीत (२०१४ च्या) भाजपने महिला उमेदवारांना ८.८ टक्के तिकिटे दिली होती. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने महिलांना १२ टक्के तिकिटे दिली होती. आम आदमी पक्षाने (आपने) १२.९ टक्के तिकिटे महिला उमेदवारांना दिली होती आणि सर्व पक्षांनी महिला उमेदवारांना दिलेल्या तिकिटांची टक्केवारी पाहता ही सर्वोच्च टक्केवारी होती. बसपने महिलांना फक्त ५.४७ टक्के तिकिटे दिली होती. मात्र या सर्वेक्षणाच्या माहितीतून त्यांच्यापैकी किती महिला एससी होत्या ते स्पष्ट होत नाही.



इथे एक प्रश्न उपस्थित होऊ शकतो. तो म्हणजे मग महिलाभिमुख राजकीय पक्षाची गरज आहे का? होय, भारतात तीसुद्धा गरज आहे. संयुक्त महिला आघाडी किंवा युनायटेड विमेन फ्रंट (यूडब्ल्यूएफ), महिला अधिकार पार्टी (एमएपी) हे दिल्लीतील राजकीय पक्ष आणि नारी शक्ती पार्टी (एनएसपी) हा महाराष्ट्रातील पक्ष यांसारखे महिलांचे राजकीय पक्ष आहेत. काही महिला राजकीय पक्ष उत्तर प्रदेशातही आहेत. तरीही त्यांच्यापैकी एकाही पक्षाला १ टक्क्याची मतांच्या वाट्याची मर्यादा ओलांडता आलेली नाही आणि गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत या पक्षांच्या सर्व उमेदवारांच्या अनामत रकमाही जप्त झाल्या आहेत. निवडणुकीच्या आघाडीवर या सगळ्या पक्षांना ते अत्यंत एकाकी पडल्याचे आढळून आले आहे आणि दिल्ली, महाराष्ट्र व उत्तर प्रदेश येथील शहरी परिसरांतच ते मोठ्या प्रमाणात अडकून पडले आहेत. त्यांच्याविषयी आणि त्यांच्या कार्यक्रमांविषयी अत्यल्प मतदारांना माहिती आहे. या पक्षांकडे महिलाभिमुख कार्यक्रम आहे, परंतु त्या क्वचितच उपेक्षित, दुर्बल समाजांच्या समान अधिकारांविषयी बोलतात आणि तळागाळापर्यंत त्या पोहचू शकलेल्या नाहीत.


महिलांच्या राजकारणातील प्रतिनिधित्वाच्या मुद्याकडे सर्वांगीण दृष्टिकोनातून पाहताना, समाजाचे नेतृत्त्व अद्यापही महिलांपेक्षा पुरुषांकडे सोपवण्याला प्राधान्य दिले जात असल्यामुळे या सर्व प्रक्रियेत एससी महिला या आणखी उपेक्षित, दुर्बल आहेत, या मुद्याला नेहमीच कमी लेखले जाते.

*(**लेखिकेविषयी :** डॉ. माला मुखर्जी या नवी दिल्लीच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ दलित स्टडीजमध्ये साहाय्यक प्राध्यापिका आहेत. विशेषतः राजकीय वर्तुळातील सामाजिक वगळणुकीतील जात आणि लिंग या विषयावर त्या काम करतात. नवी दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटीतून त्यांनी डॉक्टरेटची पदवी मिळवली आहे.)*

संपर्क : mmukherji@dalitstudies.org.in

असोसिएशन फॉर डेमॉक्रॅटिक रिफॉर्म्स सर्व्हे, २०१४

# दलित साहित्य व आफ्रो अमेरिकन साहित्य : दुय्यम ओळखीचे सामाईक पैलू




**आफ्रिकन -अमेरिकनांनी त्यांच्या ओळखींना आकार प्राप्त करून घेत असताना १९६० च्या अखेरीस सशस्त्र विरोध आणि हिंसकता व हिंस्र कलेला जवळ केले. ब्लॅक पँथर्स आणि ब्लॅक पॉवर चळवळी लोकप्रिय झालेल्या असताना 'युनायटेड स्टेट्स अँड ब्लॅक आर्टस चळवळी'ने एक बुद्धिमान; परंतु प्रस्थापितांविरुद्धची संतप्त स्वरूपाची कला प्रसिद्ध केली. भारतात दलित पँथर्सने १९७० च्या सुरुवातीला संप आणि निदर्शने करून आक्रमक तत्त्वप्रणालीला दरवाजा खुला करून दिला होता.**



**डॉ. प्रमोदकुमार**
नवी दिल्ली

अमेरिकेतील आफ्रिकन-अमेरिकन आणि भारतातील दलित कशा प्रकारे तुलना करता येण्याजोग्या वर्चस्वी सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक आणि राजकीय शोषणाच्या रचनांनी बनलेले आहेत, त्यांच्या संबंधित समाजांमध्ये या तथाकथित कनिष्ठ समाजांना कशा प्रकारच्या ओळखी मिळाल्या आहेत आणि त्यांच्या ओळखींवर कशा मर्यादा आणल्या गेल्या आहेत हे दाखवून देण्याच्या हेतूने या दोन अल्पसंख्याक गटांच्या साहित्याचे या लेखात विश्लेषण करण्यात आले आहे. आफ्रिकन-अमेरिकन स्त्रिया, मुले आणि पुरुष यांनी आपल्या राष्ट्रीय ओळखीशी तडजोड केली; तर आधी अस्पृश्य या नावाने ओळखले जाणारे दलित, भारतीय राज्यघटनेने हमी दिलेल्या त्यांच्या राष्ट्रीय ओळखी मिळवण्याचे प्रयत्न करत आहेत. इतिहास काळापासून उपेक्षित, वंचित ठेवण्यात आलेल्या या लोकांनी लिहिलेल्या साहित्यात दडपशाहीला केलेल्या यशस्वी विरोधाचे चित्रण येते आणि त्याद्वारे जबरदस्तीने आवाज बंद करण्यात आलेल्या या मूक कनिष्ठवर्गीयांना आवाज प्राप्त होतो. मात्र याबरोबरच अद्यापही त्यांची ही गळचेपी थांबलेली नाही हे मांडणेही तितकेच महत्त्वाचे आहे आणि त्याकडेही तितक्याच प्रमाणात लक्ष पुरवण्याची गरज आहे. भेदभावाचे आणि उपेक्षेचे समान अनुभव आणि समस्या असलेल्या भिन्न लोकांमध्ये अधिक निकटचे सामंजस्य निर्माण झाले तर त्यामुळे केवळ अन्यायाला विरोध करण्यासाठी संघटित होण्यासाठी एखादी चौकट किंवा व्यासपीठच मिळणार नाही; तर राष्ट्रीय आणि वांशिक अडथळ्यांच्या पलीकडे जाऊन मानवतेविषयी लुप्त झालेला आदर पुन्हा निर्माण होईल, या आशेतून हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

हा संदर्भ १८७३ पर्यंत मागे पोहचतो. त्यावेळी मराठी दलित (त्यावेळी अस्पृश्य म्हणून ओळखले जात होते.) अशी ओळख असलेल्या ज्योतीराव फुले यांनी 'गुलामगिरी' हे पुस्तक प्रकाशित केले होते. गुलामगिरीविरोधात निग्रोंनी अत्युच्च निःस्वार्थीपणे आणि आत्मत्यागी निष्ठेतून दिलेल्या लढ्याविषयीच्या कौतुकाचे प्रतीक म्हणून त्यांनी तत्कालीन अमेरिकेतील निग्रोंना ते अर्पण केले होते. स्वतंत्र आणि नवीन भारताच्या राज्यघटनेचा मसुदा तयार करणाऱ्या आणि भारताचे पहिले कायदामंत्री असलेल्या डॉ. बी.आर. आंबेडकरांनीही 'शूद्र पूर्वी कोण होते?' हे आपले पुस्तक फुल्यांना अर्पण करून त्यांचे ऋण मान्य केले होते. भारताच्या राष्ट्रीय राजकारणात सक्रिय सहभागी असलेल्या






आंबेडकरांनीही वेळोवेळी आफ्रिकन -अमेरिकन आणि दलित यांच्यातील तुलनेवर प्रकाशझोत टाकला होता. १९१३ ते १९१६ या कालावधीत कोलंबिया विद्यापीठाचे विद्यार्थी म्हणून कार्यरत असलेल्या आंबेडकरांनी कृष्णवर्णीयांमधील वाढत्या जागृतीचा आणि त्यांच्यावर दडपशाही करत असलेल्या श्वेतवणीय श्रेष्ठत्वाच्या विरोधात स्वत:ची ओळख मिळवण्यासाठी व मानवतेसाठी कृष्णवर्णीय करत असलेल्या संघर्षाचा अनुभव घेतला होता. त्यावरून भारतातील दडपणुकीच्या कार्यक्रमाला आव्हान देण्यासाठी त्यांना कृष्णवर्णीयांच्या या लढ्यातून एक चौकट प्राप्त झाली असावी, असा अर्थ काढणे अवघड नाही.

साहित्याच्या दृष्टीने विचार केला तर आपल्याला असे दिसून येते की, आफ्रिकन -अमेरिकनांनी त्यांच्या ओळखींना आकार प्राप्त करून घेत असताना १९६० च्या अखेरीस सशस्त्र विरोध आणि हिंसकता व हिंस्र कलेला जवळ केले. ब्लॅक पँथर्स आणि ब्लॅक पॉवर चळवळी लोकप्रिय झालेल्या असताना 'युनायटेड स्टेटस अँड ब्लॅक आर्टस चळवळी'ने एक बुद्धिमान; परंतु प्रस्थापितांविरुद्धची संतप्त स्वरूपाची कला प्रसिद्ध केली. भारतात दलित पँथर्सने १९७० च्या सुरुवातीला संप आणि निदर्शने करून आक्रमक तत्त्वप्रणालीला दरवाजा खुला करून दिला होता. सांस्कृतिक अभिव्यक्तीचा मक्ता घेतलेल्या मध्यमवर्गीय हिंदूंच्या विरोधात निषेधाचा आवाज उठवणाऱ्या कलांची त्यांनी रचना केली.' (कपूर, १२०)

माल्कोम एक्स, कार्मिशेल आणि एल्ट्रीज क्लिव्हर यांच्यावर फ्रांझ फेननचा प्रभाव होता. तसेच अमिरी बराक यांच्यासारख्या कवीला त्यांच्या कविता आणि नाटके लिहिण्यासही त्याच्यापासून स्फूर्ती मिळाली होती. दलित पँथरचे संस्थापक नामदेव ढसाळ आणि अर्जुन डांगळे यांना या कृष्णवर्णीयांच्या 'चर्चे' तून स्फूर्ती मिळाली. मात्र दलित चळवळ ही दलितांशी साम्य असलेल्या कृष्णवर्णीयांच्या चळवळीएवढी आक्रमक किंवा जहाल नव्हती. यामागे इतर अनेक कारणे होती आणि भारतात बंदुका किंवा शस्त्रे उपलब्ध असण्यावर नेहमीच कडक बंदी घातली गेली आहे हेही त्यापैकी एक कारण होते. मात्र या दोन्ही चळवळींमधील साहित्य आणि राजकारण एकमेकांपासून





स्वतंत्र नव्हते.

'लिटरेचर ऑफ मार्जिनॅलिटी : दलित लिटरेचर अँड आफ्रिकन-अमेरिकन लिटरेचर' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत संपादक एन.एस. ॲस्टन असे स्पष्ट करतात की, 'पोएटिक्स ऑफ लिबरेशन' (मुक्तीचे काव्यशास्त्र) हा या दोन्ही साहित्यांना जोडणारा सामाईक धागा आहे. (१०) या काव्यसंग्रहाचा खास उल्लेख करावा लागेल, कारण या दोन्ही गटांतील लेखकांनी मांडलेल्या समान मध्यवर्ती कल्पना तो समोरासमोर ठेवतो. कोणाही समीक्षकाने विशिष्ट लेखनातील सामाईक मुद्यांवर एवढे सखोल समीक्षात्मक लेखन केलेले नाही. एस.डी. कपूर असे निरीक्षण नोंदवतात की, 'या दोन साहित्यांमध्ये सामूहिक स्मृती, अनुभव आणि वाढती जागृती या सामाईक मध्यवर्ती कल्पना आहेत. (११७) एन.एम. ॲस्टन यांनी अस्पृश्यतेला 'दलित लोकांवर लादण्यात आलेली एक प्रकारची सामाजिक-धार्मिक गुलामगिरी' असे म्हटले आहे. शतकानुशतकांच्या कालावधीत या गुलामगिरीने सामाजिक चालीरिती, पद्धती आणि परंपरा यांच्यावर आपला गाढा प्रभाव पाडला.' (१९) या दोन्ही उपेक्षित, वंचित गटांना त्यांचे नियंत्रण नसलेल्या वांशिक घटकांच्या आधारावर आपापल्या देशांमध्ये बहिष्कृत जीवनाचा अनुभव घ्यावा लागला होता, हे स्पष्टच आहे. अलगीकरणाच्या प्रथेमुळे आणि भिन्नत्वांमुळे त्यांच्या ओळखीच्या गंभीर

प्रश्नांना आकार देण्यात आला. वर्ग आणि लिंग यांच्या कठोर आधारावर भेदाभेद, सत्ताहीनता, आवाज उठवता न येणे यांसारखे भेदभाव करण्यात आले.

युरोपियन वसाहतवाद्यांनी इतरांच्या प्रतिमा कशा रचून तयार केल्या होत्या आणि वसाहतीतील प्रजेला स्वातंत्र्यानंतर कशा प्रकारे स्वतःला वसाहतवादी मानसिकतेतून मुक्त करून घेण्याची धडपड करावी लागली, याविषयी एडवर्ड सेडने केलेल्या चर्चेवरून असा दावा करणे शक्य आहे की, स्वप्रतिनिधित्व आणि स्वयंप्रतिमा या समस्येवर साहित्याने यशस्वीरित्या मात केली. डब्ल्यू.ई.बी. ड्यु बॉईसने ज्याला 'दुहेरी सजगता किंवा जागृती' असे म्हटले आहे, त्या प्रकारे या दोन्ही गोष्टींच्या संदर्भात दडपल्या गेलेल्या समाजांना अनेक अंतर्गत संघर्षांना सामोरे जावे लागते.

ऐतिहासिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक पातळ्यांवर दोन्ही देश पूर्णपणे भिन्न असले तरीही टोकाची विषमता हा दोन्ही समाजांचा लक्षणीय गुणधर्म आहे. (२) ही दोन्ही राष्ट्र प्रमुख लोकशाही राष्ट्रे म्हणून महत्त्वाच्या जागतिक भूमिका पार पाडतात आणि या दोन्ही राष्ट्रांमध्ये कमालीची श्रेणीबद्ध रचना किंवा उतरंडी आहेत.(२) अमेरिकेतील गुलामगिरीच्या आणि वांशिकतेच्या रूढींशी भारतातील जातिव्यवस्थेचे; तसेच अस्पृश्यतेचे, शुद्धतेच्या आणि दूषिततेच्या कल्पनांचे साधर्म्य आहे. वंशांच्या आणि जातींच्या सामाजिक- राजकीय रचना संबंधित समाजांमध्ये भिन्न प्रकारे काम करत असल्या तरीही यातून निर्माण होणारे भेदभावाचे, अवमानाचे, विषम संधींचे आणि दुय्यम दर्जाचे परिणाम सक्षमीकरण न झालेल्यांच्या जीवनावर सारखेच विपरित परिणाम करतात. मात्र ज्याप्रमाणे अमेरिकेत ऐतिहासिक दमनाचे ओझे वाहणारा फक्त आफ्रिकन-अमेरिकन एवढाच एकमेव अल्पसंख्याक समूह नाही, भारतातही भेदभावाला तोंड देणारा दलित किंवा अस्पृश्य एवढाच एकमेव गट नाही. इथे एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, ती म्हणजे, अमेरिकेतील आफ्रिकन-अमेरिकन चळवळीतील डॉ. मार्टिन ल्यूथर किंग ज्युनिअर यांच्या नेतृत्त्वामुळे अभिजनवादाचा प्रश्न निर्माण झाला होता, अगदी तसाच अभिजनवाद गांधींच्या नेतृत्त्वातही होता. सबअल्टर्न स्टडीज ग्रुपने त्यावरच प्रभावी टीका केली आणि त्यातूनच दडपल्या गेलेल्या लोकांच्या दृष्टिकोनातून दक्षिण आशियाच्या इतिहासाचे पुनर्लेखन करण्यास ते प्रवृत्त झाले. सबअल्टर्न स्टडीज ग्रुपचे एक संस्थापक रणजित गुहा यांनी गांधींचे डोळे झाकून अनुसरण करणाऱ्या; परंतु अखेरीस परकीय सत्तेच्या विरोधात अंतःस्फूर्तीने काम करणारे लोक म्हणून ओळख न मिळालेल्या लाखो सर्वसामान्य माणसांवर लक्ष केंद्रित केले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि धार्मिक पायावर फाळणी होऊन मुस्लिम देश म्हणून पाकिस्तानची निर्मिती झाली, त्यावेळी तत्कालीन अस्पृश्यांची (म्हणजेच आजच्या दलितांची) दुरवस्था हा गांधी आणि दलितांचे महान नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील मतभेदाचा प्रमुख विषय होता. गांधी




ज्यांना हरिजन म्हणण्यास प्राधान्य देत होते, त्या दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघ असावेत असा आग्रह आंबेडकरांनी स्वातंत्र्याआधी धरला होता. मात्र देशाच्या विभाजनाच्या भीतीने वातावरण तंग बनलेले असताना हिंदूंमधील हे विभाजन रोखण्यासाठी गांधींनी प्रदीर्घ उपोषण केले. हिंदुत्वाच्या कर्मठ ब्राह्मणी अन्वयार्थात आणि हिंदूंच्या विशिष्ट पवित्र ग्रंथांमध्ये जातिव्यवस्थेची मुळे रुजलेली असल्यामुळे आणि त्यांना मान्यताही मिळालेली असल्यामुळे आंबेडकरांना स्वतंत्र मतदारसंघ हा अस्पृश्यांच्या समस्या सोडवण्याचा आदर्श उपाय वाटला होता, कारण सर्वसामान्य मतदारसंघांमध्ये सवर्ण हिंदू नेते निवडून आले असते आणि त्यांनी अस्पृश्यांच्या गरजांकडे कधीही लक्ष दिले नसते. (कपूर ६२)

दलित वर्ग हा भारतातील बहिष्कृत समाजातील प्रमुख समाज आहे; त्याचप्रमाणे आफ्रो -अमेरिकन गट हा कृष्णवर्णीय अमेरिकेतील प्रमुख समाज आहे. एक समाज श्वेतवर्णीय समाजाकडून; दुसरा समाज सवर्णांकडून नागवला गेला आणि त्याची अवनती करण्यात आली. एकाला त्याच्या




जन्मभूमीतून हुसकावून काढून विकण्यात आले आणि दुसऱ्याला जन्मापासूनच 'अस्पृश्य' मानले गेले. डी. ज्ञानीय यांनी असे निरीक्षण नोंदवले आहे की, 'या दोहोंमधील मूलभूत फरक असा आहे की, आफ्रो-अमेरिकन समाजाच्या छळात या लोकांना प्रत्यक्ष मालमत्ता मानले गेले आणि त्यात मालकांना त्यांचा व्यापार करण्याचा हक्क होता. या लोकांची गुलाम म्हणून खरेदी आणि विक्री केली जात होती. त्यांच्या आयुष्यांवर मालकांचा संपूर्ण अधिकार होता आणि अगदी ते या गुलामांना मृत्यूदंडही देऊ शकत होते. दुसरीकडे, अस्पृश्य वैयक्तिकरित्या एखाद्या मालकाची मालमत्ता मानली जात नव्हती. तरीही गोऱ्या आर्यांची त्यांच्यावर सामुदायिक मालकी होती. ब्राह्मण या आकाराने लहान असलेल्या उच्चवर्णीय अभिजन समाजाच्या ते नियंत्रणाखाली आणि अधिकाराखाली होते. हा गुलामगिरीचाच एक प्रकार होता.' दलित आणि आफ्रो अमेरिकन हे दोन्ही समाज एकाच प्रकारच्या मुक्ती चळवळीत सहभागी झाले असेही दिसून येते. स्थान आणि काळ यांचा विचार करता हे दोन्ही समाज भिन्न आहेत. त्यामुळे त्यांच्या साहित्यात काही फरकाचे मुद्दे असणे ही समजण्यासारखी बाब आहे. आत्मचरित्रात्मक लेखन आणि 'आत्मकथा' हेच दलित आणि आफ्रो -अमेरिकन कथनाचे विशेष लक्षणीय असे मध्यवर्ती घटक राहिले आहेत.

दलित लेखकांनी या कथनाला कथा (आत्मकथा) किंवा आत्मवृत्त असे म्हटले. दलित लेखकांच्या बहुतांश कथनातून वैयक्तिक दुःखे, यातना आणि त्यांना त्यांनी दिलेले प्रतिसाद आणि हिंदू समाजात त्यांना भोगाव्या लागलेल्या सामाजिक भावना यांचे कथन येते. दलित साहित्याचा प्रमुख, मोठा भाग हा आत्मचरित्रांच्या स्वरूपात आहे. दलित काव्ये, कादंबऱ्या, संवादात्मक लेखन, समीक्षात्मक गद्य लेखन या सगळ्या प्रकारांत लेखकांनी स्वतःच दिलेल्या विशिष्ट प्रकारच्या 'कबुलीजबाबांच्या गुणधर्माचे' लेखन आहे. ओमप्रकाश वाल्मिकींचे जूठन, शरणकुमार लिंबाळेंचे 'अक्करमाशी', बामा यांचे 'बामाज कर क्कू' ही दलित आत्मचरित्रांची काही उदाहरणे आहेत. फक्त आत्मचरित्रेच नव्हेत; तर नामदेव ढसाळ, दया पवार, वामन निंबाळकर, त्र्यंबक सपकाळे, अर्जुन डांगळे, ज.वि. पवार यांच्यासारख्या दलित कवींनी १९७० मध्ये दलित कविता लिहिण्यास सुरुवात केली.

लिंबाळेंच्या आत्मचरित्राला लिहिलेल्या प्रस्तावनेत जी. एन. देवी यांनी दलित आत्मचरित्रांना 'अचानक झालेला सामाजिक उद्रेक' असे म्हटले आहे. याचा अर्थ स्पष्ट करताना त्यांनी 'आधी कधीही नसलेल्या तीव्रतेने झालेली अभिव्यक्ती' असे स्पष्टीकरण दिले आहे. दलित साहित्याचे काही विशिष्ट गुणधर्म म्हणजे त्याच्यात कारुण्य आणि विरोध व निषेध यांचा मिलाफ दिसतो. सामाजिक अन्यायाविरुद्ध बंड आणि वंचितांसाठी स्वाभिमानाचे, प्रतिष्ठेचे आयुष्य असावे हे स्वप्न असे गुणधर्मही या साहित्यात तितक्याच प्रमाणात असतात. दलित आत्मचरित्रांमध्ये हे सगळे गुणधर्म आढळतात. दलित आत्मचरित्रे लिहिताना नक्कल करण्याजोगे साहित्य उपलब्ध नाही. म्हणूनच दलितांच्या या लेखनात नावीन्यपूर्ण रचना आढळते. दलित आत्मचरित्रे या लेखकांच्या थेट अभिव्यक्ती आहेत, थेट उफाळून आलेल्या भावना आहेत. त्यांच्यामधून बुद्धीची वाढ आणि संवेदनशील मने अचूकतेने वास्तवाची नोंद करतात आणि जातीयवाद हा शुद्ध रानटीपणा असल्याचा संदेश देतात.

त्यांच्या उपेक्षित, कनिष्ठवर्गीय सहकाऱ्यांनी त्यांच्या अवनत स्थितीतून आणि तक्रारींमधून बाहेर पडावे आणि त्यांच्या नेत्यांच्या त्यागातून स्फूर्ती घ्यावी अशी कळकळीची विनंती करताना हे साहित्यिक आक्रमक भाषा वापरतात. अशा प्रकारची आक्रमक भाषाशैली वापरणे आणि आक्रमकतेचा स्वर लावणे हे आधीच्या पिढ्यांची परिस्थितीशी जुळवून घेण्याची सहनशीलता आणि शांततापूर्ण प्रयत्न; तसेच त्यांना सातत्याने मिळत राहिलेली अमानवी वागणूक यांच्याविषयीच्या संतापातून आलेल्या नैराश्याचे लक्षण आहे, असा युक्तिवाद करणे शक्य आहे. अशा प्रकारच्या कट्टर विरोधाच्या स्वराद्वारे आधीच्या काळात कनिष्ठवर्गीयांचा आवाज दडपण्याच्या दडपशाहीच्या

ठिकऱ्या उडवल्या जात असाव्यात आणि अन्यायाला हिंसक विरोध करण्याचे रणशिंग फुंकण्याचे कार्य होत असावे. उदाहरणार्थ, ढसाळांनी जातींची उतरंड हा भारताच्या मानसिकतेला झालेला तीव्र आजार असून देशाच्या प्रगतीसाठी हा आजार मुळासकट उखडून फेकून दिला पाहिजे, असे जाहीर केले. ढसाळांनी आपल्या दलित बांधवांना, माणूस म्हणून समान हक्क असल्याची आठवण करून दिली. श्वेतवर्णीयांच्या तावडीतून आपली ओळख आणि अभिमान हिसकावून घेणाऱ्या मालकोमच्या उदाहरणासारखे वागता आले नाही, तर कधीही भरून न येणाऱ्या अवनतीला तोंड द्यावे लागेल, असा इशारा बराका यांनी आपल्या आफ्रिकन अमेरिकन बांधवांना दिला. अशा प्रकारे दोन्ही कवींसाठी 'कलात्मक निर्मितीचे तंत्र ...हे खरोखरच अमेरिकन (आणि भारतीय) अनुभवाचा वैश्विक आधार म्हणून असलेला दर्जा नष्ट करून त्या अनुभवाची पुनरावृत्ती करते आणि तो नष्टही करते.' (रॉनी ४१७)

ढसाळ लिहितात, 'फक्त तेच (सवर्ण) तेवढे मानवी आईच्या गर्भातून बाहेर पडले आहेत का? आपण बाकीचे सगळे मांजरांची किंवा कुत्र्यांची पिल्लं आहोत का? ते अशा कोणत्या प्रकारच्या भ्रमात जगत आहेत?' (ढसाळ ८२)

दुसरीकडे बराका कृष्णवर्णीयांना माल्कोमचा वारसा चालवण्याचा आग्रह धरत आहेत. त्याच्यासाठी..आणि स्वतः साठी जरा वर पहा


***कृष्णवर्णीय माणसा, अडखळत बोलणं आणि फरफटत जाणं सोडून दे***

***कृष्णवर्णीय माणसा, मुसमुसणं, कुरबुर करणं आणि झुकणं सोडून दे***

यात आपण अपयशी ठरलो तर आपण कधीच शुद्ध हवेत श्वास घ्यायला नको आणि पृथ्वीच्या अंतापर्यंत गोरे लोक आपल्याला जळणाच्या काटक्या म्हणतील (रिडर, २१८)

या दोन्ही समाजांच्या बाबतीत अभिजन समाजाच्या वर्तनात काही विशिष्ट फरक असल्याचे निरीक्षण शरणकुमार लिंबाळेही नोंदवतातः

आफ्रिकन अमेरिकनांच्या आणि दलितांच्या शोषणाची अनेक प्रकारे तुलना करणे शक्य आहे. आफ्रिकन- अमेरिकन व्यक्ती गुलाम असताना पैसे देऊन त्यांचे स्वातंत्र्य विकत घेऊ शकत होत्या. दलित तांत्रिकदृष्ट्या गुलाम नसले तरीही ते पैसे देऊन अगदी घरसुद्धा भाड्याने घेऊ शकत नव्हते. गोरे मालक कृष्णवर्णीय गुलामांची काळजी घेण्यास बांधील होते. मात्र अस्पृश्य गुलाम नव्हते, त्यामुळे सवर्णांना त्यांची चिंता नव्हती. अस्पृश्य हे विशिष्ट समाजाचे गुलाम आहेत. आफ्रिकन गुलामगिरीमागचे कारण आर्थिक होते. दलितांच्या अस्पृश्यतेमागचे कारण सामाजिक आहे. आफ्रिकन- अमेरिकन कोणत्याही प्रकारचे अंगमेहनतीचे काम करू शकत होते; मात्र त्यांचे काम अप्रतिष्ठेचे समजले जात नव्हते. दलित मात्र सर्वोच्च कनिष्ठ प्रकारचेच काम करू शकत होते आणि त्यांचा व्यवसाय हा नेहमीच अप्रतिष्ठेचा समजला जात होता. आफ्रो -अमेरिकन




आपल्या त्वचेचा रंग लपवू शकत नाहीत; तर अस्पृश्य आपली जात लपवू शकत नाहीत.' दलितांच्या परिस्थितीत मूलभूत बदल करण्याच्या आंबेडकरांच्या मागणीतील बंडखोरीचा ढसाळ मागोवा घेतात. ते म्हणतात ...

***तुम्ही बंडाचा ज्वालामुखी सक्रिय केला***
***तुमचं बंड आंधळं नव्हतं.***
***स्वत्व बदलण्यासाठीचं, जग बदलण्यासाठीचं ते बंड होतं***
***नवे डोळे; नवं हृदय***

दुसरीकडे आफ्रो -अमेरिकन साहित्याची पहिली अभिव्यक्ती ही गुलामांनी केलेली रोचक कथने आहेत. लिखाणाचा वैयक्तिक साचा आहे. आफ्रो- अमेरिकन साहित्यातील हे कथन समाजाच्या वांशिक स्मृतीचे एकत्रितपणे हुबेहूब वर्णन करणारे कथन आहे. एकसारखेपणा, सामाजिक भिन्नत्व, वंश आणि लिंग यांवर त्याचा भर आहे. गुलामांच्या कथनाचे व्यापकपणे तीन भिन्न वर्गात वर्गीकरण करता येते. धार्मिक विकासाच्या कथा, गुलामगिरीच्या उच्चाटनाच्या संघर्षाला स्फूर्ती देणाऱ्या कथा आणि प्रगतीच्या कथा असे हे तीन वर्ग आहेत. ओलॉदाह इक्विॲनो याची किंवा गुस्तानो व्हासा याची जीवनकथा ही गुलामांच्या कथनाची सर्वात जुनी उदाहरणे आहेत. या आफ्रिकनांनी स्वतःच ती लिहिली होती





(१७८९). इक्किॲनोच्या कथेत पश्चिम आफ्रिकेतील त्याच्या बालपणापासून भयावह ट्रान्सॲटलांटिक मिडल पॅसेजपर्यंतच्या त्याच्या प्रवासापर्यंतचा मागोवा आला आहे. अखेरीस ब्रिटिश नागरिक म्हणून त्याला मिळालेले स्वातंत्र्य आणि आर्थिक यश याची माहितीही आली आहे. आफ्रो- अमेरिकन गुलामांच्या कथा या दक्षिणेत त्यांनी केलेली गुलामगिरी आणि पश्चिमेत गेल्यानंतर त्यांची त्यातून झालेली मुक्तता याभोवती फिरत राहतात. आफ्रो -अमेरिकन गुलामांच्या कथांची सहसा वांशिकता, गुलामगिरी आणि सामाजिक मुक्तता ही वैशिष्ट्ये असतात. ल्यूसी टेरी आणि फिलिस व्हिटली यांना गुलामांच्या कथा लिहिणाऱ्या पहिल्या लेखिका म्हणून ओळखले जाते. त्या दोघींनाही गुलामगिरीसाठी विकण्यात आले होते. फिलिस ही कृष्णवर्णीय महिला होती. तिच्या कवितांचे जॉर्ज वॉशिंग्टन यांनी कौतुक केले होते. 'पोएम्स' हा विविध विषयांवरील कविता असलेला तिचा काव्यसंग्रह पुनर्प्रकाशित करण्यात आला त्यावेळी त्याच्यासोबत व्हिटली आणि तिच्या कवितांना अधिकृतता मिळवून देण्यासाठी आणि तिच्या साहित्यिक उद्दिष्टांना प्रमाणित करण्यासाठी, ती सिद्ध करण्यासाठी ओळख पटवणारी अनेक कागदपत्रे जोडण्यात आली होती. ज्युपिटर हॅमन या घरगुती गुलामाने 'ॲन इव्हिनिंग थॉटः साल्व्हेशन बाय क्राईस्ट विथ पेनिटेन्शियल क्राईज' ही त्याची कविता १७६१ मध्ये प्रसिद्ध केली. फ्रेड्रिक डग्लस या अमेरिकन गुलामाचे आत्मकथन १८४५ मध्ये प्रसिद्ध झाले. अंकल टॉम्स केबिन आणि हॅरिएट जॅकोबचे 'इन्सिडेन्ट्स इन द लाईफ ऑफ अ स्लेव्ह गर्ल' हे १८६१ मध्ये प्रसिद्ध झाले. ही सगळीच गुलामांच्या कथनाची काही उदाहरणे आहेत.

१९२० च्या दशकापासून १९३० च्या दशकाच्या मध्यापर्यंत 'हार्लेम रिनायसन्स' ही साहित्यिक, कलात्मक आणि बौद्धिक चळवळ सुरू होती. या चळवळीने नवीन कृष्णवर्णीय सांस्कृतिक ओळख चेतवली. १९२६ मध्ये ॲलेन लॉके या समीक्षक असलेल्या शिक्षकाने तिचा आढावा घेतला. त्याने कलेच्या माध्यमातून असे जाहीर केले की, सामुदायिक अभिव्यक्तीच्या आणि स्वयंनिर्धाराच्या पहिल्या संधी निग्रोंचे जीवन झडप घालून मिळवत आहे, या संधींवर निग्रो नियंत्रण मिळवत आहेत. हार्लेम चळवळ 'स्पिरिच्युअल कमिंग ऑफ एज' चे केंद्रस्थान बनली. यामध्ये लॉकेच्या 'नवीन निग्रो'ने 'सामाजिक भ्रमनिरासाला वांशिक अभिमानात' रूपांतरित केले होते. जिम टूमर, लँग्स्टन ह्युज, रुडॉल्फ फिशर, वॅलेस थर्मन, जेस्सी रेडमन फॉसेट, नेल्ला लार्सन, अर्ना बोन्टेम्प्स, काऊंटी कुलेन आणि झोरा नील हर्स्टन हे सर्व या कालावधीतील प्रमुख लेखक होते. वरील उदाहरणांवरून असे दिसून येते की, या दोन्ही समाजांच्या दुःखात, वेदनांमध्ये, त्यांच्या बंडखोरीत आणि आशा- आकांक्षांमध्ये समानता आहे. त्यांच्या भाषा वेगवेगळ्या असल्या तरीही या साहित्यांतून व्यक्त झालेल्या त्यांच्या मानसिक अवस्था आणि भावना समांतर आहेत. या समाजांचे इतिहास वगळता त्यांच्या साहित्याची आणि चळवळींची दिशा एकच आहे. दोन्ही साहित्ये स्व-ओळखीच्या शोधात आहेत, असा यावरून निष्कर्ष काढता येतो. दोन्ही साहित्यांमधून कथन करण्यात आलेले अनुभव हे विषमतेवर आधारित आहेत आणि सामाजिक जीवनातून ते आलेले आहेत. दोन्ही साहित्ये जीवनातील सत्यावर आधारित आहेत आणि लेखकांच्या बांधिलकींमधून निष्पन्न झाली आहेत. दोन्ही साहित्यांची भाषा ही नवीन सांस्कृतिक मूल्यांच्या शोधात असलेल्या क्रांतीची भाषा आहे.

**संदर्भ :** ॲस्टन एन.एम. ईडी. लिटरेचर ऑफ मार्जिनॅलिटी ... दलित लिटरेचर अँड आफ्रिकन अमेरिकन लिटरेचर, नवी दिल्ली, प्रेस्टिज बुक्स२००१. प्रिंट ■ बाबूल बाबूराव, 'मदर' पॉयझन्ड ब्रेड. ईडी. अर्जुन डांगळे, मुंबई : ओरिएंट लॉंगमन, १९९२. १८३-१९० प्रिंट. रॉय मंत्रा, 'स्पिकिंग' सबअल्टर्न्स : अ कम्पॅरेटिव्ह स्टडी ऑफ आफ्रिकन -अमेरिकन अँड दलित /इंडियन लिटरेचर्स, २०१०. ■ ढसाळ नामदेव, नामदेव ढसाळ : पोएट ऑफ द अंडरवर्ल्ड. अनुवाद - दिलीप चित्रे, इंडिया : नवायन पब्लिशिंग, २००७. प्रिंट ■ फॅनन, फ्रांझ, द रेच्ड ऑफ द अर्थ, न्यू यॉर्क, ग्रूव्ह प्रेस २००४. प्रिंट ■ कपूर एस.डी. दलित२स अँड आफ्रिकन अमेरिकन्स : अ स्टडी इन कम्पॅरिझन. नवी दिल्ली. कल्पाझ पब्लिकेशन्स, २००४, प्रिंट. लूम्बा, ॲनिया : कॉलनियालिझम /पोस्ट कॉलनियालिझम, लंडन आणि न्यू यॉर्क : रुटलेज, १९९८. प्रिंट.

**संपर्क : साहाय्यक प्राध्यापक, इंग्रजी विभाग इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली.**

प्रकाश खंडेलोटे
औरंगाबाद





# गुनित मोंगा : माहितीपटांच

**मासिक पाळी हा अनिवार्य शरीरधर्म असला तरी याबाब मासिक पाळी आलेल्या मुलीने/महिलेने जणू काय एखा पूर्वी दिली जायची. आजही बुरसटलेल्या विचारांचे काह घेत नाहीत. मात्र एका आंतरराष्ट्रीय पुरुस्काराने या वि सार्वजनिकरित्या निषिद्ध मानला जात असल्यामुळे मुल घडविणारा 'पिरियड : एंड ऑफ सेंटेन्स' हा इंग्रजी ल**

अकादमी ऑफ मोशन पिक्चर्स या अमेरिकी चित्रपट उद्योग संघटनेतर्फे दिला जाणारा ऑस्कर पुरस्कार 'पिरिएड : एन्ड ऑफ सेंटेन्स' ला मिळाला आहे. भारतीय चित्रपट निर्माती गुनित मोंगा यांच्या सिख्या एंटरटेन्मेंट या संस्थेची ही निर्मिती आहे. इराणी वंशाच्या अमेरिकन नागरिक असलेल्या दिग्दर्शिका रेका झेहताबची यांनी या लघुमाहितीपटाचे दिग्दर्शन केले आहे. २००९ मध्ये स्लमडॉग मिलिनिअरला मिळालेल्या ऑस्करनंतर तब्बल दशकानंतर भारताशी संबंधित एका कलाकृतीला ऑस्करचा मान मिळालेला आहे. ब्लॅक शिप, एण्ड गेम, लाईफ बोट आणि अ नाईट ॲट द गार्डन या नामांकन झालेल्या माहितीपटांशी स्पर्धा करून 'पिरिएड'ने हा बहुमान मिळवला. दहा वर्षांनी भारतीय लघु माहितीपटाला ऑस्कर मिळणे ही जशी कौतुकाची बाब आहे तशीच ती विशेष बाब यासाठी आहे की, मासिक पाळी या आगळ्यावेगळ्या आणि पुरूषसत्ताक समाजाच्या लेखी अर्थहीन असलेल्या विषयावरील 'पिरिएड...'ला हा पुरस्कार मिळाला. महिलेला आपले ध्येय साध्य करण्यात मासिक पाळीचा अडथळा येत नाही. 'पिरिएड : एन्ड ऑफ सेंटेन्स' म्हणजेच शिक्षेचा काळ संपला, शिक्षणाचा नाही, हे प्रत्येक मुलीने लक्षात घ्यावे, अशी प्रतिक्रिया या लघुमाहितीपटाच्या निर्मात्या गुनित मोंगा यांनी व्यक्त केली आहे. जग बदलण्याच्या आपल्या अभियानास या पुरस्काराने आणखी ताकद मिळणार आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दिल्लीपासून जवळच असलेल्या हापूर या गावातील महिलांनी मासिक पाळीसंदर्भातील समजुतींविरोधात लढा उभारून क्रांतिकारी चळवळ सुरू केलेली आहे. या गावच्या महिलांना सॅनिटरी पॅड मिळत नसल्याने महिलांचे आरोग्याचे प्रश्न आणि शाळेत मुलींच्या गळतीचे प्रमाण वाढलेले होते. ही गंभीर बाब लक्षात आणून दिल्यानंतर शासनाच्या वतीने सॅनिटरी पॅडसाठी गावात व्हेंडिंग यंत्र उभारण्यात आले. त्यानंतर असे पॅड घरीच तयार करून त्यांच्या विक्रीचे कौशल्य महिलांनी शिकून घेतले. 'प्लाय' या नावाखाली पॅड विकून त्याद्वारे समाजाचे सशक्तीकरण करण्याचा प्रयत्न सुरू झाला. या वास्तव घटनेवरच हा लघुमाहितीपट आहे. या लघुमाहितीपटाला ऑस्कर प्रदान होताच हापूर गावात एकच जल्लोष करण्यात आला. एका महत्त्वाच्या समस्येवर या गावात सुरू केलेली चळवळ यशस्वी होताना दिसत असल्याचे मत इथल्या नागरिकांनी व्यक्त केले. मासिक पाळीसारख्या विषयावरील लघुमाहितीपटास ऑस्कर मिळू शकतो, हे अविश्वसनीय असल्याचे दिग्दर्शिका रेका झेहताबची यांनी म्हटले आहे. हा माहितीपट लॉस एंजेलिसमधील विद्यार्थ्यांनी व








# समस्याप्रधान
# ्या निर्मात्या

**न आमच्या देशात विचित्र पुरुषी मानसिकता दिसून येते. दा गुन्हाच केलाय, अशी वागणूक 'त्या' काळात तिला ी पुरुष पाळीच्या काळात त्या महिलेच्या हातचे जेवण विषयाचे महत्त्व अधोरेखित होत आहे. हा विषय भारतात ांची आयुष्ये कशी खुरटली जातात, याचे मार्मिक दर्शन घु माहितीपट ऑस्कर पुरस्काराचा मानकरी ठरला आहे.**



द मेलिया बर्टन या त्यांच्या शिक्षिकेने गोळा केलेल्या लोकवर्गणीतून तयार करण्यात आला आहे. मात्र या चित्रपटाचे चित्रीकरण भारतातील हापूर गावात झाले.

दिल्लीत वाढलेल्या गुनित मोंगा यांनी अन्य काही मोठ्या व्यक्ती आणि सेलिब्रिटीप्रमाणे आपले जन्मस्थळ आणि कौटुंबिक पार्श्वभूमी गोपनीय ठेवलेली आहे. गुनित मोंगा यांचा कल चित्रपट आणि प्रसारमाध्यमांकडे होता. त्यामुळे त्यांनी दिल्लीतील गुरू गोविंदसिंग इंद्रप्रस्थ विद्यापीठाशी संलग्न मधुबाला इस्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स मिडिया या संस्थेतून मास कम्युनिकेशनची पदवी मिळवली. २००३ मध्ये त्यांनी विक सरीन या भारतात जन्मलेल्या कॅनेडियन-अमेरिकन चित्रपट निर्माता, दिग्दर्शकाच्या 'पार्टीशन' पासून निर्मिती समन्वयक म्हणून कारकीर्द सुरू केली. क्रिकेट या जगभरात लोकप्रिय असलेल्या खेळावर आधरित 'से सलाम इंडिया' या चित्रपटासाठी काम सुरू केल्यानंतर २००६ मध्ये त्या मुंबईला आल्या. २००८ मध्ये त्यांनी स्वतःची सिख्या एंटरटेनमेंट ही निर्मिती कंपनी सुरू केली. त्याचवेळी त्यांनी अनुराग कश्यप यांच्यासोबतही काम सुरू केले. कावी (२००९) हा गुनित मोंगा यांचा पहिला प्रमुख आंतरराष्ट्रीय चित्रपट. भारतातील वेठबिगारीच्या समस्येवर आधारित असलेल्या या चित्रपटाने २००९ चे स्टुडन्ट अकादमी अवॉर्ड प्राप्त केले. २०१० च्या उत्कृष्ट लाईव्ह ॲक्शन माहितीपटासाठी दिल्या जाणाऱ्या अकादमी अवॉर्डचे नामांकनही त्याला मिळाले होते. 'गँग्स ऑफ वासेपूर' भाग १ आणि २ (२०१२) आणि 'दॅट गर्ल इन यलो बूटस्' याशिवाय तृष्णा, शैतान, मायकेल, अय्या आदी चित्रपटांसाठीही त्यांनी काम केले. २ कोटी रुपयांचे बजेट असलेल्या पेंडलर्स (२०१२) चित्रपटाची स्क्रिप्ट फेसबुकवर टाकून त्यांनी १ लाख चाळीस हजार अमेरिकन डॉलर एवढी रक्कम उभी केली होती. 'इंटरनॅशनल क्रिटिक्स विक' साठी निवड झालेल्या या चित्रपटाने खूप वाहवा मिळवली आणि तेव्हापासून भारतीय सिनेमासाठी नवीन बाजारपेठ खुली झाली. त्यांनी भारत, नेदरलँड आणि ब्रिटन यांची सहनिर्मिती असलेल्या 'मान्सून शूटआऊट' चीही निर्मिती केली. मे २०१३ मध्ये 'द लंच बॉक्स' आणि 'मान्सून शुटआऊट' या दोन चित्रपटांची कान चित्रपट महोत्सवाचा समांतर बिगर स्पर्धात्मक विभाग असलेल्या इंटरनॅशनल क्रिटिक्स विक आणि कान चित्रपट महोत्सवासाठी निवड झाली तेव्हा अमेरिकन डिजीटल आणि मुद्रित मासिक 'द हॉलिवूड रिपोर्टर'ने, सिनेमाच्या नवीन लाटेतील अतिशय समृद्ध निर्माती असे गुनित मोंगा यांचे वर्णन केले होते.

समस्याप्रधान चित्रपटांची निर्मिती हे ३५ वर्षीय गुनित मोंगा यांचे वैशिष्ट आहे. यापुढील काळातही त्यांच्या हातून 'पिरिएड...' सारख्या दर्जेदार चित्रपटांची निर्मिती व्हावी, ही सदिच्छा.

●●●

ग्रंथ परिचय

# प्रेमचंदांच्या द
# व्यक्त होतो वि

सूर्यनारायण रणसुभे
लातूर



**प्रेमचंद** हे कदाचित पहिले भारतीय लेखक असावेत, ज्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून १९२० पासूनच दलित जाणिवांची अस्वस्थ करणारी अभिव्यक्ती झालेली आहे. उत्तर भारतातल्या ब्राह्मणांनंतर श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या कायस्थ जातीत त्यांचा जन्म झाला. १९०५ पासून ते उर्दूतून कथा-कादंबऱ्या लिहित. साधारणपणे १९३० नंतर ते हिंदीतून लिहू लागले. असामान्य अशी प्रतिभा लाभलेले प्रेमचंद हळूहळू जात, वर्ण, लिंग, प्रदेश या परिघाच्या बाहेर पडून केवळ माणुसकीच्या नात्यातून आपल्या परिसराकडे पाहू लागतात. अभ्यास आणि निरीक्षणाअंती त्यांना हे जाणवू लागते की, येथील धर्म, जाती, अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था ही सर्व बहुसंख्याकांच्या शोषणाची शस्त्रे आहेत. त्यांच्या जीवनाचा आरंभीचा काळ हा खेड्यात गेलेला होता. त्यानंतरचा काळ हा निमशहरी (कस्बा) भागात गेला. त्यानंतर ते बनारस येथे स्थायिक झाले. सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन त्यांनी 'हंस' हे नियतकालिक सुरू केले. केवळ लेखनजीवी झाले. त्यांचा काळ हा भारतीय राजकारण व समाजकारणाच्या संदर्भात धगधगता होता. १९०० ते १९३७ च्या दरम्यान उत्तर भारतात आर्य समाजाचे आंदोलन वेगाने पसरत होते. विधवाविवाह, बालविवाहाचा विरोध व जातिव्यवस्थेचा विरोध ही आंदोलनाची वैशिष्ट्ये होती. आर्य समाजाचे हे आंदोलन सामाजिक सुधारणेचे आंदोलन होते, तर दुसरीकडे टिळकांच्या मृत्यूनंतर राजकारणाची सर्व सूत्रे गांधीजींकडे आलेली होती. गांधीजी एकाच वेळी समाजसुधारणेचे कार्यक्रम राबवीत होते (अस्पृश्योद्धार, मंदिर प्रवेश वगैरे) आणि त्याचवेळी राजकीय स्वातंत्र्यासाठी असहकाराची हाक देत होते. संवेदनशील प्रेमचंद या सर्व आंदोलनांचे आपल्या परीने बारीक निरीक्षण करीत होते. हंस व इतर नियतकालिकांतून या आंदोलनासंदर्भात प्रतिक्रियाही नोंदवत होते. त्याचवेळी ज्या घटना घडत होत्या, त्यास सर्जनात्मक पातळीवर नेऊन कथा-कादंबऱ्यांदेखील लिहीत होते. आर्य समाजाच्या विधवाविवाह आंदोलनापासून प्रेरणा घेऊन त्यांनी विधवेशी लग्नही केले होते.

देशात जी सरंजामी पद्धत त्या काळी प्रचलित होती, त्याविरुद्ध तर त्यांनी लिहिलेलेच आहे; पण अस्पृश्य समाजाची जी अवस्था होती, त्यांच्यासोबत जो माणुसकीशून्य व्यवहार केला जात होता, त्यामुळे ते खूप अस्वस्थ होत आणि त्यातूनच त्यांनी त्या काळी किमान ८-१० लघुकथा लिहिल्या. रंगभूमी व गोदान या आपल्या दोन महत्त्वाच्या कादंबऱ्यांतून या प्रश्नाला वाचा फोडली. विशेषतः त्या काळचे ब्राह्मण पुरोहित व ठाकूर (गावातील प्रमुख) हे दलितांसोबत जो माणुसकीशून्य व्यवहार करायचे, त्याच्याविरोधात ते आक्रमकपणे लिहीत होते. त्या काळच्या बनारसच्या पंडे-पुरोहितांनी त्यांच्याविरोधात बनारसच्या कोर्टात अब्रुनुकसानीची केस केली. काय तर म्हणे, प्रेमचंद हे आपल्या कथा वाङ्‌मयातून पंडे-पुरोहितांची आणि एकूणच ब्राह्मणवर्गाची बदनामी करीत आहेत. १९३६ ला ते वारले. १९९५ च्या दरम्यान दिल्लीतील काही दलित लेखकांनी प्रेमचंदाच्या साहित्याची सामूहिक होळी केली. काय तर त्यांनी आपल्या कथासाहित्यातून दलित समाजाची बदनामी केलेली आहे. आपल्या हयातीत ते एका गटास ब्राह्मणविरोधी वाटले, तर मृत्यूनंतर ते दुसऱ्या गटास दलितविरोधी वाटले. म्हणजे प्रेमचंद नक्की काय होते? वस्तुस्थिती ही आहे की, जो माणुसकीच्या बाजूने उभा राहतो तो त्याच्या हयातीत व नंतरदेखील गटात आणि तटात जगणाऱ्यांकडून नाकारलाच जात असतो. प्रेमचंद जर ब्राह्मणविरोधी होते, तर मग ते दलितविरोधी कसे असू शकतील आणि ते दलितविरोधी असतील तर ब्राह्मणसमर्थक का नव्हते असा प्रश्न कोणालाच का पडत नाही हा माझ्यासारख्याचा प्रश्न आहे. हिंदीतील दलित लेखकांना आजही वाटते की, दलित जाणिवांची पहिली अभिव्यक्ती ही जन्मतः दलित लेखकांनीच केलेली आहे. मीच पहिल्यांदा दलित जाणिवा व्यक्त केल्या असे ओमप्रकाश वाल्मिकींना वाटते, तर दुसरीकडे नैमिष रायना वाटते की, मीच पहिल्यांदा ही जाणीव व्यक्त केलेली आहे. आता अभ्यासक हे श्रेय प्रेमचंदांना-एका अदलित लेखकाला-देत आहेत. ते हिंदीतील दलित लेखकांना सहन होत नाही. त्यामुळे येनकेण प्रकारे प्रेमचंदांचे योगदान नाकारायचे. त्यांची निंदा करायची. त्यावेळी एका लेखात मी लिहिले की, "ओमप्रकाश वाल्मिकी जर दलित साहित्याचे जनकत्व आपल्याकडे घेऊन या साहित्याचे वाल्मिकी होऊ इच्छित असतील तर जरूर व्हावे; पण निदान प्रेमचंदांवर दलितविरोधी म्हणून शिक्का लावू नये." बहुतेक हिंदी दलित लेखक कोणत्याही अदलिताच्या दलित जाणिवांचे साहित्य स्वीकारू इच्छित नाहीत. २०१० नंतर मात्र प्रेमचंदांना विरोध करणे हिंदी दलित लेखकांनी सोडून दिलेले आहे.




प्रेमचंदांच्या सहानुभूतीचे क्षेत्र खूपच व्यापक व विशाल आहे. त्या काळी जेवढे सामाजिक, राजकीय प्रश्न होते, त्यास त्यांनी

# लित कथांमधून द्रोह अन् नकार!




आपल्या सर्जनाचे विषय केलेले आहेत. १९२५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. पाणी ही निसर्गाची देणगी असल्याने पाण्यासंबंधी पवित्र-अपवित्रतेची भावना मूर्खपणाची आहे. चवदार तळ्याच्या पाण्यावर महाडमधील सर्व नागरिकांचा अधिकार आहे, असा ठराव मंजूर होऊनही महाडचे सवर्ण दलितांना तेथून पाणी भरण्यास मज्जाव करीत होते आणि त्यामुळेच डॉ. बाबासाहेबांना या माणुसकीशून्य व्यवहाराच्या विरोधात आक्रमक पवित्रा घ्यावा लागला. या घटनेची चर्चा त्या काळी संपूर्ण भारतात झाली. तेथेच मनुस्मृतीचे दहनदेखील करण्यात आलेले होते. प्रेमचंद या घटनेतून प्रेरणा घेऊन 'ठाकूर का कुआँ' ही छोटीशी पण अस्वस्थ करणारी कथा लिहितात.

जोखू व गंगी हे पती-पत्नी दलित समाजातले. जोखू हा खूप आजारी आहे. रात्रीची वेळ आहे. त्याला खूप तहान लागलेली आहे. गंगी खूप दुरून पिण्याचे पाणी घेऊन यायची. कारण जवळपासच्या सर्व विहिरी या सवर्णांच्या-तेथील पाण्यास स्पर्श करणे केवळ अशक्य! सकाळी तिने जेथून पाणी आणलेले आहे, ते पाणी जोखू पिण्यासाठी घेतो. त्यावेळी त्याला ते पाणी खूपच सडलेले, घाणेरडे, वासयुक्त असते. तो म्हणतो, ''यह कैसा पानी है, मारे बास के पिया नहीं जाता ...तू सड़ा हुआ पानी पिलाए देती है।'' तिने पाण्याचा वास घेतला. खूपच घाणेरडा वास येत होता. आजारी माणूस जर हे पाणी प्याला तर त्याचा आजार आणखीनच बळावेल. आता त्याला चांगले, शुद्ध पाणी कोठून आणू? तरीपण ती म्हणते की, मी जाऊन दुसरे छान पाणी घेऊन येईल. त्यावर तो म्हणतो, ठाकूर आणि साहूजी यांच्या दोन विहिरी जवळपास आहेत. ती म्हणते, ''एक तांब्या पाणी कोणी देणार नाहीत काय?'' त्यावर जोखू जे म्हणतो, ते त्या काळचे वास्तव आहे.

''हाथ-पाँव तुडवा आएगी और कुछ न होगा? बैठ चुपके से। ठाकूर लाठी मारेंगे, साहूजी एक के पाँच लेंगे। गरीबों का दर्द कौन जानते हैं? हम तो मर भी जाते हैं तो कोई दुआर पर झाँकने नहीं आए।'' तरीदेखील गंगी पाणी आणण्यासाठी निघते. कथेच्या दुसऱ्या भागाची सुरुवात होते. रात्रीचे नऊ वाजलेले आहेत. कोणालाही नकळत जवळच्या दोरीने घागरी बांधून ती विहिरीत सोडून पाणी आणण्याची तिची योजना असते. रात्रीची वेळ असल्यामुळे हे सहज शक्य होईल, असे तिला वाटते. त्यावेळी तिच्या मनातील विचार प्रेमचंदांनी या प्रकारे टिपलेले आहेत. त्यांनी गंगीसंदर्भात एक शब्द वापरला आहे. 'गंगी का विद्रोही दिल।' ती विचार करते, ''हम क्यों नीच हैं और यह लोग क्यों ऊँचे हैं? इसलिए कि यह लोग गले में तागा (जानवे) डाल लेते हैं? यहाँ तो जितने हैं एक से एक छंटे हैं (बदमाश) चोरी वे करे, जाल फरेब ये करे, झूठे मुकदमे ये करे। अभी इस ठाकूर ने तो उस दिन बेचारे गडरिये की एक भेड़ चुरा ली थी और बाद में वह बेचारा मार खा कर गया। इन्हीं पंडितजी के घर में बारहों मास जुआ चलता है। यही साहूजी तो घी में तेल मिलाकर बेचते हैं। काम करा लेते हैं, मजूरी देते इनकी नानी मर जाती है। (मजुरी देण्यास कुरबुर) किस बात में हैं ये हम से ऊँचे? कभी गाँव में जाती हूँ, तो रसभरी आँखों से देखने लगते हैं। ...और घमंड यह कि हम ऊँचे हैं।''

गंगी संधीची वाट पाहात होती. कोणीही जवळपास नसेल तरच हे शक्य होते. घागर व दोर घेऊन ती चोरपावलांनी विहिरीकडे निघते. त्याचवेळी या विहिरीवर दोन स्त्रिया पाणी भरण्यास येतात. त्या मजूर असाव्यात. त्यांच्यातील चार-पाच संवादावरून हे स्पष्ट होते की, ही सवर्ण मंडळी मजुरांशी कशा प्रकारचा अमानवीय व्यवहार करीत होते. त्या निघून गेल्यानंतर गंगी हळूच विहिरीजवळ जाते. समोर ठाकुरांची मोठी इमारत आहे. ठाकूरने इमारतीचा दरवाजा बंद केल्याचे तिला जाणवते. ती सुखाचा श्वास घेते व दोरीसहीत घागर विहिरीत सोडते. घागर पाण्यावर आपटल्यामुळे किंचितसा आवाज होतो. गंगी घागर भरून घेते. वर ओढते. घागर हाताजवळ आलेली असते. ती वाकून घागर घेण्यासाठी पुढे सरकते आणि त्याचवेळी ठाकूरच्या घरचा दरवाजा उघडला जातो. गंगी घाबरते. त्यामुळे दोर सुटतो. घागर पाण्यात पडते. आवाज होतो. ठाकूर, कोण आहे तेथे, असे ओरडून विहिरीजवळ निघतो आणि गंगी घाबरून मोठ्या वेगाने पळू लागते. घरी पोहोचल्यावर ती पाहते की, जोखू तहानेमुळे अस्वस्थ होऊन ते घाणेरडे पाणी पीत होता आणि कथा येथेच संपते. प्रेमचंदांनी एकूण तीनशेच्या वर लघुकथा लिहिलेल्या आहेत. सुरुवातीच्या काळात कथेच्या शेवटी ते भाष्य करीत असत. १९३० नंतर ते कथेच्या आरंभी, मध्ये किंवा शेवटी कोणत्याच प्रकारे भाष्य करीत नाहीत. आपल्या वाचकांवर ते सर्व काही सोडतात. ही कथा जेथे संपते तेथून एक वेगळा विचार वाचकांच्या मनात सुरू होतो किंवा सुरू व्हावयास हवा. ही व्यवस्था किती क्रूर आहे. या व्यवस्थेबद्दल प्रेमचंदांच्या मनात जे प्रश्न उभे राहिले ते प्रश्न त्यांनी गंगीच्या माध्यमातून मांडले. हेच प्रश्न वाचकांच्या मनातदेखील उभे राहावेत, अशी प्रेमचंदांची इच्छा आहे. प्रेमचंदांच्या दलित जाणिवांच्या सर्वच कथांतून दलितांचा विद्रोह व नकार व्यक्त होत गेलेला आहे. ●●●

# गुणवत्तापूर्ण काम करणे हीच नैतिकता...




## कस्टम विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. सतीश ढवळे यांचा प्रेरणादायी प्रवास

**चेतन शिंदे**

***प्रश्न : एक सर्वसामान्य विद्यार्थी ते एक डॉक्टर, पुढे उच्च पदस्थ अधिकारी असा आपला प्रेरणादायी प्रवास आहे. तो समजून घेताना तुमची कौटुंबिक पार्श्वभूमी आणि बालपण यापासून सुरुवात करू...***

***डॉ.ढवळे :*** माझं मूळ गांव चांबळी (ता. पुरंदर) हे आहे. परंतु आम्ही लहानपणापासूनच माझ्या आत्याच्या गावी फुरसुंगी इथे राहिलो. वडील कामासाठी शहरात हडपसर येथे राहून काम करतील अशी आर्थिक परिस्थिती नसल्याने ते फुरसुंगी गावात बहिणीजवळ खोली भाड्याने घेऊन राहत होते. रोज ते फुरसुंगी ते हडपसर सायकलवर स्पॉयका प्लास्टिक कंपनीत मजुरीच्या कामाला जायचे. आई तिथे शेतात मजुरीचे काम करायची. आम्ही चार भांवडं होतो. बालपण फार खेळण्या-बागडण्याऐवजी अभ्यास, वाचन आणि घरात मदत करणे यातच गेले. मला शिक्षणात पहिल्यापासूनच खूप आवड होती. बालवाडी ते सातवीपर्यंत गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकलो. चौथी आणि सातवीच्या स्कॉलरशिप परीक्षेत मी तालुक्यात पहिला आलो होतो. शालेय स्तरावर घेण्यात येणाऱ्या परीक्षेतदेखील मी प्रथम यायचो. सातवीनंतर मी शिक्षकांच्या आग्रहाखातर शहरात आलो. यासाठी आईने खूप मेहनत घेतली. तिच्या पाठबळामुळेच शहरात शिक्षणासाठी जाता आले.

***प्रश्न : शहरात शिक्षण घेतानाचा अनुभव काय होता?***

***डॉ.ढवळे :*** आठवीला मी शहरात म्हणजे पुण्याचे उपनगर असलेल्या हडपसर माळवाडी येथे आलो. सुरुवातीला साधना शाळेत ॲडमिशनला गेल्यानंतर शिक्षक मला म्हणाले, गावाकडे चांगले मार्क मिळवणे ठीक आहे, पण इथे स्पर्धा जास्त असेल. तुला अभ्यास पेलवणार नाही, इथे ॲडमिशन घेऊ नको. तेव्हा त्यांना एकदा संधी देण्याची विनंती केली, ती त्यांनी मान्य केली आणि माझे माध्यमिक शिक्षण सुरू झाले. त्यावेळी एका वर्गात खूप विद्यार्थी असल्याने तुकड्या असायच्या. मी सर्व तुकड्यांत (वर्गात) पुढे असायचो. माझे साऱ्या विषयांतील मार्क अधिक असायचे. मी परीक्षेत कायम पहिला नंबर मिळवला. याचा शिक्षकांना फार आनंद वाटायचा. मी अभ्यासाबरोबरच अवांतर वाचनही करत असे. त्यामुळे माझे कौतुक व्हायचे.

यावेळी एक वेगळा अनुभव होता. एस.टी. पासला जास्त पैसे जायचे. त्यामुळे तर मी गावातील एका मुलासोबत वर्षभर सायकलने शाळेत गेलो. पीएमटी बसच्या पासवर ३२ रुपये खर्च व्हायचे आणि सायकलला दिवसाला १ रुपया भाडे असायचे. आम्ही ठरवले की, येताना एकाने सायकल चालवायची जाताना एकाने असे एक वर्ष काढून पैशाची बचत केली. याचवेळी आई-वडिलांनी माझ्या शिक्षणासाठी हडपसरला येऊन राहण्याचे ठरवले. त्यावेळी आम्ही भावंडं आणि आई-वडील माळवाडी परिसरात १० बाय १० च्या अत्यंत छोट्या झोपडीत राहायचो. वडील एमआयडीसीमध्ये रोजंदारीवर कामाला जायचे तर आई




धुणी-भांडी करणे, बांधकामाच्या ठिकाणी सिमेंटच्या विटा उचलणे, भाजीपाला विकणे, अशी कामे करून मला मदत करत होती. याचदरम्यान मी १० वीच्या बोर्ड परीक्षेत मागासवर्गीयात राज्यात तिसरा, तर शाळेत पहिला आलो होतो. १२ वीच्या बोर्ड परीक्षेत मी शाळेत पहिला, तर राज्यात मागासवर्गीयांत दुसरा आलो होतो. गुणवत्तेच्या आधारावर मला मेडिकलला प्रवेश मिळाला. इंजिनिअरिंग आवडत असताना आणि प्रवेश मिळत असतानाही मी मेडिकलला प्रवेश घेतला.

**प्रश्न : आवडीची अभियांत्रिकी शाखा टाळून मेडिकलला प्रवेश घेण्याचे कारण काय?**

**डॉ.ढवळे :** मी आठवी, नववीत असताना शालेय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त खूप पुस्तके, कथा, कादंबऱ्या, आत्मचरित्रे वाचली होती. ८ वीत असल्यापासूनच टाईम्स ऑफ इंडिया हे वृत्तपत्र मी वाचत आलो आहे. दलित साहित्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्य वाचले होते. माझे बालपण खूप हलाखीत गेले. कपडे नीट नसत. घरात गरिबी खूप होती. परंतु मला वेळोवेळी कुणाची ना कुणाची मदत होत गेली. घर छोटे होते तेव्हा अभ्यासाला मोठी मुलं त्यांच्या रूमवर बसू देत, त्यांचा डबा खायला देत, अनेक शिक्षक व मित्र मदत करत होते. त्यामुळे आपणही समाजसेवा करायची हे मनोमन ठरवले होते. आपणही इतरांना मदत करावी ही भावना होती. चांगली समाजसेवा डॉक्टर बनून करता येते म्हणून मेडिकलला प्रवेश घेतला. आई-वडील, मित्रमंडळी यांनाही याचा फायदा होईल, असा विचार होता. यातूनच इंजिनिअरिंग सोडून मेडिकलला प्रवेश निश्चित केला.

**प्रश्न : मेडिकलला शिक्षण घेतानाचे कसे अनुभव होते?**

**डॉ.ढवळे :** मेडिकलला मेरीटच्या आधारे खुल्या जागेवरूनही प्रवेश मिळत होता. मात्र एससी प्रवर्गातून प्रवेश घेतला तो पुढे फिस किंवा इतर काही खर्चिक बाबींचा भार पडू नये यासाठी. पण दुसऱ्याच वर्षात मला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला होता. यावेळी मी बँक ऑफ बडोदाचे शैक्षणिक कर्ज घेतले होते. माझे शिक्षक श्री. प्रकाश फुलारे सर अत्यंत आनंदाने माझ्या शैक्षणिक कर्जाचे जामिनदार झाले. ज्यामुळे मला एमबीबीएसचा अभ्यास करताना खूप मोठी मदत झाली. अभ्यास ताकदीने करता आला. मेडिकलचा अनुभव म्हणावा तर मला वाटायचे की, मेडिकल, इंजिनिअरिंगसारख्या उच्च शिक्षणाच्या प्रवाहात जातीवाद कमी होतो. परंतु तिथेही थोड्या-अधिक प्रमाणात जातीवाद चालतो, हे जाणवले. मेडिकलच्या प्रथम वर्षात असताना सुरूवातीला एकदा कोणाला किती गुण मिळाले, यावर चर्चा सुरू असताना मला एका उच्च जातीच्या मुलाने इंग्रजीला किती गुण मिळाले, असे विचारले. मी ८५ गुण मिळाल्याचे सांगितले. तेव्हा तो म्हणाला की, मी मराठीचे गुण विचारत नाही इंग्रजीचे, तेव्हा मी त्याला इंग्रजीचेच ८५ गुण मिळाल्याचे सांगितल्यानंतर तो गप्प बसला. गावाकडील मुलं दिसायला वेगळी दिसणारी, दलित असल्याने लवकर ओळखता येणारी मुलं हुशार नसतात, असा समज ते करून घेत असतात; परंतु त्यांचा तो समज चुकीचा होता. मेडिकलच्या तिसऱ्या वर्षात असताना मी एक निर्णय घेऊन टाकला, आपणाला डॉक्टरच्या पदवीनंतर वैद्यकीय क्षेत्रापेक्षा मोठ्या प्रशासकीय क्षेत्रात जायचे, जिथून अनेकांच्या जीवनाला मदत होईल. एमबीबीएस केवळ ग्रॅज्युएशनसाठी करायचे ठरवले.

**प्रश्न : आपण एमबीबीएसनंतर एमडी पण केले? तो काय अनुभव?**

**डॉ.ढवळे :** एमबीबीएसनंतर एमडी केले ते परिस्थितीमुळे. मी एमबीबीएसनंतर सिव्हिल सर्व्हिसेसची तयारी सुरू केली. मित्रांच्या अनुभवानुसार, अनेकांच्या सांगण्यानुसार यूपीएससीचा निकालाला वेळ लागतो हे समजल्यानंतर यूपीएससीची तयारी करायची म्हणून प्रथम एम.डी. साठी प्रयत्न केले. घरची




*'डब्ल्यूसीओ'चा पुरस्कार तत्कालीन अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांच्याकडून स्वीकारताना डॉ. सतीश ढवळे.*

परिस्थिती नाजूक होती. आई-वडिलांचे वय वाढत चालले होते. म्हणून मी निर्णय घेतला की, पोस्ट ग्रॅज्युएशन असे करायचे ज्यामुळे आपणास प्राध्यापक होता येईल, शिवाय पैसेही मिळतील. घर सांभाळता येईल आणि यूपीएससीचा अभ्यास करता येईल. तेव्हा चौकशीअंती बायोकेमिस्ट्री हा प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना शिकवला जातो, तो विषय निवडला. तिथे मला ४,००० रुपये मिळणार होते. विचाराअंती मी तिथे ॲडमिशन घेतले. ६ महिने बीजेमेडिकल कॉलेजला शिकवले. पुढे तिथे पोस्ट नव्हती म्हणून मी धुळे मेडिकल कॉलेजला एक वर्ष सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम केले. या दरम्यानच मी बीजे मेडिकल कॉलेजमधून एमडीचा अभ्यासक्रम पूर्ण केला. एमडी करत असतानाच धुळे येथे नोकरी करत होतो. त्यामुळे पैसे मिळाले आणि स्वतंत्रपणे युपीएससीचा जिद्दीने अभ्यासही करता आला पुढे १९९७ मध्ये आयआरएस सर्व्हिसेसमध्ये आलो.

***प्रश्न : आपण १९९७ मध्ये या सेवेत आलात. पहिली पोस्टिंग कुठे मिळाली?***

***डॉ.ढवळे :*** १९९७ ते ९९ अशी दोन वर्षे मसुरी, फरिदाबाद आणि चेन्नई येथे प्रशिक्षण झाले. माझी पहिली पोस्टिंग १९९९ मध्ये नागपूरला झाली. प्रशिक्षणादरम्यान लग्नही झाले. लग्नानंतरची आणि नोकरीतील माझी पहिली पोस्टिंग १९९९ मध्ये नागपूरला झाली. तिथं जवळपास अडीच वर्षे होतो, त्यातले एक वर्ष इनलँड कंटेनर्स डेपोचा चार्ज माझ्याकडे होता. तिथं खूप चांगलं काम करता आले. अधिकारी म्हणून काम करण्याचा नवीन अनुभव होता. आपण कसं वागावं, लोकांना कसा प्रतिसाद द्यावा, हे सगळं नवीन होतं. नागपूरच्या कर्मचाऱ्यांनी मला खूप समजून घेतलं, सहकार्य केलं. त्यामुळे तिथं व्यवस्थित काम करता आलं.

***प्रश्न : नागपुरातील अडीच वर्षात दखल घेण्याजोगी कामगिरी?***

***डॉ.ढवळे :*** नागपूरला पहिले एक वर्ष अजनीच्या कस्टम टर्मिनन्सचा चार्ज माझ्याकडे होता. तिथं मी चांगला महसूल वाढवला. नवनवीन एक्स्पोर्ट्-इम्पोर्ट्स वाढायला लागले. नवनवीन कमोडिटी वाढायला लागल्या. त्या दृष्टीने योग्य ते नियंत्रण मी तिथे ठेवले. त्यानंतर मला सेंट्रल एक्साईज डिव्हिजनला पोस्टिंग मिळाली. त्यावेळी सर्व्हिस टॅक्स नव्यानेच आला होता. त्यावर काम केले. कर चुकविणाऱ्या कंपन्यांवर धाडी टाकून डिव्हिजनचे महसूल उद्दिष्ट वाढवले. कर्मचाऱ्यांच्या कल्याणाकडे लक्ष दिले. एससी-एसटी वेलफेअर कमिटीच्या लोकांशी चर्चा करून त्यांचे प्रश्न सोडवण्यावर भर दिला. नागपुरातील अडीच वर्षे माझी उमेदीची असली तरी तिथं चांगला प्रतिसाद मिळाला. वरिष्ठही चांगले लाभले.

***प्रश्न : पणजी इथे दोन वर्षे केलेल्या कामाबद्दल काय सांगाल?***

***डॉ.ढवळे :*** त्यानंतर पुण्याला बदली झाली. टाटा मोटर्स, मर्सिडिझ बेन्झ ज्या ठिकाणी आहे तिथं सिम्प्लेक्स टॅक्सचा चार्ज एक वर्षे माझ्याकडे होता. तिथंही चांगले काम मी केलं. ते काम पाहून मला मुख्यालय आणि ॲन्टी ईव्हेजन या विभागात पोस्टिंग मिळाली. सर्च करणे, धाडी टाकणे आणि कर चुकवणाऱ्या लोकांना अटक करणे व योग्य ती कारवाई करणे ही चांगली कामे केली. नंतर पणजीला चांगला अधिकारी हवा असल्याने चीफ कमिशनरनी माझी बदली गोवा, पणजी येथे केली. तिथं रोलिंग मिल्सकडून मोठ्या प्रमाणावर कर चुकवेगिरी व्हायची. त्याला अटकाव करून महसूल वाढवला. पुण्याचे चीफ कमिशनर ऑफिस आणि आमच्या कार्यालयाने मिळून भरपूर अबकारी कर वाढवला. तिथं मी दोन वर्षे खूप चांगले काम केले.

***प्रश्न : पुढे बढती वगैरे....?***

**डॉ.ढवळे :** पुन्हा माझी बदली पुण्याला झाली. तिथं एक वर्ष काम केलं. जॉइंट कमिशनर म्हणून २००७ ला मुंबईला बदली झाली. दोन वर्षे बॅलॉर्ड इस्टेट इथं असलेल्या कस्टम प्रिव्हेंटीव्ह कार्यालयात काम केलं. त्यानंतर मूल्यमापन संचालनालयात बदली झाली. देशभरातून होणाऱ्या आयात-निर्यातीवर योग्य प्रकारे कर भरला आहे की नाही, याचं मूल्यमापन इथं होत असतं. ते काम मी केलं. त्याचबरोबर कमोडीटीजवर कर लावण्यासंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात मी पुढाकार घेतला. इथिओपिया, केनिया आणि युगांडा या आफ्रिकन देशांमध्ये जाऊन तिथल्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिलं. मी बजावलेल्या कामगिरीबद्दल ***वर्ल्ड कस्टम ऑर्गनायझेशनचा (डब्ल्यूसीओ) सर्टिफिकेट ऑफ मेरिट हा पुरस्कार तत्कालीन अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते २०१२ ला मला मिळाला.***

***प्रश्न : सेवाकर कार्यालयात असतानाही आपण उत्कृष्ट कामगिरी केलीत. त्याबद्दल सविस्तर सांगा?***

**डॉ.ढवळे :** २०१२ ते २०१४ अशी दोन वर्षे मी चर्चगेट इथल्या सेवाकर कार्यालयात कार्यरत होतो. कर चुकवणाऱ्या लोकांवर धाडी टाकून त्यांच्यावर केसेस करणे आणि करचुकवेगिरीला आळा घालून महसूल वाढविण्याचं काम मी केलं. आमच्या या धडाकेबाज कामगिरीमुळे पहिल्याच वर्षी ५०० ते ६०० कोटी रूपयांचा अतिरिक्त महसूल आम्ही मिळवून दिला. या मोहिमेची गती वाढवून पुढील वर्षी करात ९०० कोटी रुपयांची वाढ आम्ही केली. २०१४ ते २०१७ अशी तीन वर्षे मी सहार एअर कार्गो मुंबई येथे मी सेवा बजावली. तिथे इम्पोर्टचा चार्ज माझ्याकडे होता. आयात-निर्यातदारांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे, त्यांच्यासाठी टर्म अराऊंड टाईम कमी करणे आणि सर्व कन्सेप्ट लवकर कशा स्पष्ट होतील यासाठी मी काम केलं. इज ऑफ डुईंग बिझनेस या माझ्या कामाचेही वरिष्ठांकडून खूप कौतुक झाले.

***प्रश्न : कस्टम कार्यालयातील कामकाजही उत्कृष्ट पद्धतीने केले आहे, त्याबद्दल काय सांगाल?***

**डॉ.ढवळे :** मी २०१७ मध्ये कस्टम कार्यालयात रिस्क मॅनेजमेंट डिव्हीजन येथे रुजू झालो. सेंट्रल बोर्ड ऑफ कस्टम ॲण्ड एक्साइजचा हा एक प्रतिष्ठाप्राप्त विभाग आहे. आता सर्व इम्पोर्ट-एक्स्पोर्टचे व्यवहार ऑनलाईन होत आहेत. ऑनलाईन फायलिंग ऑफ डॉक्युमेंटमध्ये कुठले डॉक्युमेंट विदाऊट ॲसेसमेंट किंवा विदाऊट एक्झामीनेशन क्लिअर झाली पाहिजेत, सिस्टिमनेच त्याला परवानगी दिली पाहिजे. याला काही अडवू नका. कर भरून जाऊ द्या, असे देशभरात होणाऱ्या व्यवहाराचे काम या ठिकाणी चालते. हे काम खूप सेन्सिटिव्ह आहे. ते आम्ही प्रामाणिकपणे पार पाडत असतो.

***प्रश्न : चित्रपट, कादंबरी यात कस्टम डिपार्टमेंटची वेगळी प्रतिमा दाखवली जाते. कस्टमच्या अधिकाऱ्यांचे अंडरवर्ल्डशी संबंध असतात, हे अधिकारी कर चुकविणाऱ्यांना मदत करीत असतात, असे दाखविले जाते. याविषयी काय सांगाल?***

**डॉ.ढवळे :** कस्टमबद्दल लोकांचा गैरसमज होण्यास मिडिया काही प्रमाणात कारणीभूत आहे. धाड टाकली, अमक्याला पकडलं वगैरे बातम्या मिडियात येत असतात. अशा माध्यमातून बातम्या येण्याचे प्रमाण एक ते दोन टक्के आहे. बाकी बहुतांश कर्मचारी शांततेने, चांगले काम करीत असतात. त्यामुळेच तर वर्षाला करापोटी मिळणाऱ्या २२ लाख कोटी रुपयांपैकी निम्मा महसूल विभाग देत असतं. कस्टमबद्दल लोकांचा होणारा गैरसमज दूर झाला पाहिजे. या विभागातील अधिकारी खूप प्रामाणिकपणे काम करत असतात. त्यासाठी चांगली कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना सरकार बक्षिसे देत असतं. कर कसा वाढेल, करदात्यांचे जाळे वाढवण्यासाठी काय करता येईल, करचुकवेगिरीला आळा घालण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत, यासंदर्भात अधिकारी सातत्याने काम करीत असतात. म्हणूनच तर आमचा विभाग महसूलाचे उद्दिष्ट गाठत असतो. माझ्या २१ वर्षांच्या कारकीर्दीत मी पाहिले आहे की, नागपूर असो, पुणे असो की पणजी इथले सर्व अधिकारी डिपार्टमेंटचं मॅन्डेट राखून कर वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असतात.

***प्रश्न : राष्ट्राच्या बांधणीत आपण मोठी कामगिरी बजावत आहात, याबद्दल काय सांगाल...***

**डॉ.ढवळे :** इम्पोर्टरला माल आणायचा असतो. त्याचा जो माल हवाई किंवा समुद्रीमार्गे येणारा असतो, तो लवकर क्लिअर व्हावा असे त्याला वाटते. परंतु कस्टमचे अधिकारी म्हणून आमची जबाबदारी ही राष्ट्रहिताची असते. राष्ट्रबांधणीत नॅशनल सिक्युरिटी आणि फायनान्शिअल सिक्युरिटी या दोन गोष्टी आम्हाला पाहाव्या लागतात. नॅशनल सिक्युरिटी म्हणजे इम्पोर्टर सांगितलेलाच माल आणत आहे का की, त्याऐवजी तो ड्रग्स, शस्त्रे, नार्कोटिक्स हा घातक माल आणत आहे, हे आम्हाला काळजीपूर्वक पाहावे लागते. फायनान्शिअल सिक्युरिटी म्हणजे आयात केल्या जाणाऱ्या मालावर सरकारला योग्य तेवढा कर मिळतो आहे का हेही आम्हाला पाहावे लागते. या दोन गोष्टी पाहण्यासाठी बिल ऑफ एन्ट्री या फॉरमॅटमध्ये इंपोर्टरने दिलेल्या माहितीची ऑनलाईन खातरजमा आम्ही करून घेत असतो. इम्पोर्टरकडून आणला जाणारा माल आणि कर याबाबत केलेली वर्गवारी आणि मूल्यांकन बरोबर आहे की नाही याचे ॲसेसमेंट आम्ही करत असतो.

***प्रश्न : या क्षेत्रातल्या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी नुकतीच तुमची शिफारस करण्यात आली आहे, त्याबद्दल काय सांगाल?***

**डॉ.ढवळे :** या क्षेत्रातील सर्वात प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या अतिविशिष्ट सेवा प्रदान केल्याबद्दल राष्ट्रपती पुरस्कारासाठी माझी शिफारस करण्यात आलेली आहे. माझ्या वरिष्ठांनी या पुरस्कारासाठी माझ्या नावाचा प्रस्ताव पाठवला. माझ्या २० वर्षातील कामाची दखल घेऊन पुरस्कारासाठी शिफारस करण्यात

आली. विद्यार्थी जीवनात सर्वांनी मला जसं सहकार्य केलं, तसंच इथंही सहकार्य केलं जातं. त्यामुळेच सर्व अधिकाऱ्यांच्या सहमतीनं माझ्या नावाची पुरस्कारासाठी शिफारस होऊ शकली.

***प्रश्न : कार्यालयाच्या कामात समर्पित होऊन आपण काम करत आहात. आपणाला राष्ट्रीय दर्जाचे दोन पुरस्कार मिळाले. चांगले काम करण्यामागची प्रेरणा काय?***

**डॉ.ढवळे :** आई ही माझी प्रेरणा आहे. लहानपणी आई सांगायची की, आपण जाऊ तिथं कामाचा ठसा उमटवला पाहिजे. माझंही असं मत आहे की, आपल्याला प्रवेश आरक्षणामुळे मिळाला असला तरी आपल्या कामातून आपण आपलं स्वतंत्र अस्तित्त्व निर्माण केलं पाहिजे. गुणवत्तेच्या बाबतीत आपण आग्रही राहून काम केलं पाहिजे. आपल्याकडे कुणी बोट दाखवेल, असं काम आपल्या हातून होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. त्यामुळे मी शाळेत असताना अभ्यास असो किंवा अन्य कोणतं काम करणं असो, ते जीव लावून केले. त्याचं त्या-त्या वेळी कौतुकही झालं. सहानुभूतीपेक्षा गुणवत्ता महत्त्वाची असल्याचं मी मानतो. माझ्या दृष्टीने गुणवत्तापूर्ण काम करणे हीच खरी नैतिकता आहे.

जी नवीन होतकरू मुलं शिकताहेत, काही करू इच्छित आहेत, त्यांना मला सांगावसं वाटतं की, तुम्ही नैतिक मूल्यांची कास धरली पाहिजे. सध्याचं जग भौतिकवादाकडं जाणारं आहे. आज लोकांना पैशाशिवाय दुसरं काही महत्त्वाचं नाही, असं जरी म्हटलं जात असलं तरी माणसाच्या आयुष्यात प्रथम नैतिक मूल्ये महत्वाची आहेत. तुमच्याकडे नैतिक मूल्ये नसतील तर काहीच नाही. माझं तर असं म्हणणं आहे की, जिथं नैतिकता आहे, तिथंच पैसा येऊ शकतो. नैतिकतेवर तुमचं व्यक्तिमत्त्व विकसित झालेलं असेल तर तुम्ही कुठेही गेलात तरी तिथे उशिराने का होईना, यश नक्कीच मिळते. बऱ्याचदा लोक शॉर्टकट निवडतात. यामुळे मिळणारे यश जास्त काळ टिकत नाही. त्यामुळे कारकून असो की अधिकारी म्हणून काम करणे असो, ते नैतिक मूल्ये ठेवूनच करा. आपण दुसऱ्याकडून चांगल्या वर्तनाची अपेक्षा करीत असू तर आपणही तसंच वागलं पाहिजे. सहकाऱ्यांशी सुसंवाद टिकून राहिला तर एकूणच कामं करणं सहज शक्य होतं. त्याचा फायदा निश्चितच होऊ शकतो.

***प्रश्न : डाटा कलेक्ट करणं, त्याचं विश्लेषण करणं हे काम खूप किचकट आहे. हे काम दिवसभर करूनही आपल्यात अचंबित करणारी ऊर्जा दिसते. याचं कारण काय?***

**डॉ.ढवळे :** पहिली गोष्ट, मी आरोग्याच्या बाबतीत जागरूक आहे. नियमित व्यायाम करणे, धावणे आणि डायटिंगच्या माध्यमातून मी स्वत:ला तंदुरुस्त ठेवले आहे. घरात पत्नी शीतल, मुलगा अद्वैत आणि मुलगी देवश्री यांनी कायमच आनंदाचे वातावरण ठेवलेले असते. आजवर कार्यालयात काम करत असताना, सामाजिक भावनेने काम करताना पत्नी शीतलने कायमच सहकार्य केले आहे. संघर्षाच्या काळात तिने आई-वडील आणि भावंडांच्या बरोबर मोठे पाठबळ दिले आहे. काम करताना कुटुंबातून मोठ्या पाठबळाची आवश्यकता असते. ते सर्व पाठबळ माझ्या परिवाराकडून मिळाले आहे. परिवार हीसुद्धा एक प्रेरणा राहिला आहे. दुसरी गोष्ट अशी की, काम डोक्यातच असतं. आपल्याला अत्यंत प्रामाणिकपणे, जिद्दीने व अधिक गुणवत्तापूर्ण काम करून दाखवायचे आहे, ही भावना कायमच माझ्या ह्रदयात असते. महत्त्वाचे म्हणजे कामाप्रती असलेली बांधिलकी मी जोपासत आलो आहे. त्यामुळे कामात उत्साह, ऊर्जा असतेच. सकारात्मक विचार आणि प्रामाणिक काम हे माझं बलस्थान आहे.

***प्रश्न : दलित अधिकारी म्हणून आपल्याला वेगळी वागणूक मिळतेय किंवा आपण व्यवस्थेतला शेवटचा भाग आहोत म्हणून आपल्याला काहीतरी होतेय, असं वाटतंय का?***

**डॉ.ढवळे :** शालेय जीवनापासून ते अगदी आतापर्यंत ब्लॅटन्ट डिस्क्रिमिनेशन मला जाणवलं नाही. आपण आजही समानतेच्या लेव्हलवर आलेलो नाही. आपल्या पाठीमागे लोक आपल्याबद्दल काहीबाही बोलतात. परंतु प्रत्यक्षात समोर कुणी असं बोलत नाही. तरीही या सगळ्यावर पर्याय म्हणून आपणच स्वत:च्या मर्यादा ओळखल्या पाहिजेत आणि आपल्याला काम करायचं आहे, असं ठरवून त्यासाठी जोरकस प्रयत्न केले पाहिजेत. मी दलित अधिकारी आहे म्हणून मला त्रास होतोय, असं न म्हणता काम केलं पाहिजे. कामात गुणवत्ता दाखवून दिली पाहिजे. दलित विद्यार्थ्यांनीही हे लक्षात ठेवले पाहिजे. दलित अधिकाऱ्यांनी आपण दलित असल्याने त्रास होतो, याचा बाऊ न करता मी दलित असूनही हे काम करू शकतो, हे दाखवून दिलं पाहिजे. सरकारी सेवेत असे खूप अधिकारी आहेत, जे झपाटून काम करतात. राष्ट्रहितात आपले योगदान देतात.

***प्रश्न : आपण मोठा अधिकारी म्हणून नावलौकिक मिळवलात, पुरस्कारही मिळवलेत. पण ज्या समाजातून पुढं आलात, त्या समाजाप्रती काही देणे लागतो, याविषयी काय सांगाल?***

**डॉ.ढवळे :** समाजाप्रती उत्तरदायित्त्वाची जाणीव प्रत्येकाला असलीच पाहिजे, हे दाखवून देण्यासाठी सोशल वेलफेअर ओरिएंटेशन आयएएस, आयपीएस किंवा महसूल विभागातील अधिकाऱ्यांना दाखवण्याची संधी असते. कर खात्यात मात्र यासाठी खूप कमी वाव असतो. तरीही आपल्या परिने सामाजिक उत्तरदायित्व निभावण्याचा प्रयत्न मी करीत असतो. आमच्या खात्यात १५ ते २० टक्के जे दलित अधिकारी-कर्मचारी असतात, त्यांचे प्रश्न मी माझ्या परिने सोडवत आलो आहे. माझ्याकडे येणाऱ्या सर्वच उद्योजकांसोबत दलित उद्योजकांनाही मदत करण्याचा माझा प्रयत्न असतो. शिक्षणासाठी, योग्य सामाजिक उपक्रमासाठी गरीब विद्यार्थ्यांसाठी शक्य होईल ती मदत करतो. समाजाचे ऋण फेडण्यासाठी काही करता यावे म्हणून भविष्यात एखादी सेवाभावी संस्था किंवा फाऊंडेशन स्थापन करुन समाजातील गरजूंच्या हितासाठी काम करण्याचा माझा विचार आहे. ●●●

# निळी पाखरं

निळे विहंग
ज्यांचे त्यांचे
न्यारेच ढंग...

एक निळं पाखरू
दाणे टाकणाऱ्या
पंजावर भाळलं.
त्याच्या पुरतं त्यानं
आपल्याच
कळपाला पाळलं..

एक निळं पाखरू
आधी थेट टॉवरच्या
घड्याळावर बसलं
पंढरपूर व्हाया शिर्डी
हसलं... रुसलं
आता कमळाच्या साथीनं
त्याचं मजेत चाललं...

एक निळं पाखरू
थेट सूर्याच्या कुळातलं.
बळ हरवून बसलं
आपल्याच मुळातलं...

एक निळं पाखरू
तिकडं आरूढ झालं हत्तीवर.
हार जीत पचवत
भिरभिरतंय
बहुजनांच्या वस्तींवर...

काही पाखरं
नुस्तच घुर्र ऽऽ करतात
अन् दर पाच वर्षानं
दाही दिशांना भुर्र ऽऽ
करतात...

पाखरं पांगली
बोधिवृक्ष म्हणाला-
ही गोष्ट नाही चांगली...

– रविचंद्र हडसनकर

# भगव्यांचं चांगभलं दुबळ्यांचं हलाहल

**हिंदुत्ववाद्यांच्या** राजवटीत भगव्यांचं चांगभलं होणार हे आधीच ठरलं होतं. सत्ता त्यांची, त्यांच्यासाठी होती. विशेष म्हणजे, बिनभगव्या मतदारांनी स्वतःशीच गद्दारी करून भगव्यांना सत्तेत बसवलं होतं. पहिली चार वर्षे भगव्यांच्या मालकांनी थोडं अस्ते-अस्ते घेतलं आणि आता कुंभमेळ्यात गंगेमध्ये उडी मारून आपल्या विकासाचे झेंडे फडकवले. सत्ताभोगी बनलेल्या मुख्यमंत्री योगींनी कुंभमेळ्याचं आणि आगामी लोकसभा निवडणुकांचं निमित्त गाठून भगव्यावाल्यांच्या उद्धाराच्या घोषणा एकापाठोपाठ



एक अशा सुरू केल्या. भगवे धारण करणारे जणू काही राष्ट्र घडवणारे श्रमिक आहेत, त्यागी आहेत, राष्ट्रप्रेमी आहेत असं समजून या घोषणा सुरू आहेत. भगवे आता झळकतेय, दिल्लीत धडकतेय आणि आधी मंदिर मग सरकार असा उसना आव आणून घोषणाही करतेय. ज्यांनी ज्यांनी भगवं धारण करून अर्धी दाढी, पूर्ण दाढी वाढवली आहे ते ते सर्व जणू स्वातंत्र्यसैनिक आहेत असं समजून त्यांच्या भल्यासाठी कोटीच्या कोटी उड्डाणे सुरू आहेत. ज्यांनी भगवे धारण न करता आपल्या घामातून, श्रमातून सरकारचा कर भरला त्या पैशातून भगव्यांचा उद्धार होणार आहे. म्हणजे असं बघा, राबणारा उपाशी आणि भगवे तुपाशी. म्हणजे बघा भगव्यांचं चांगभलं आणि राबणाऱ्यांचं हलाहल. आता कोणी याला लोकशाही आणि 'सब का साथ, सब का विकास' म्हणत असतील तर म्हणोत बिचारे! भगव्यांनी तुपात लोळायचं आणि राबणाऱ्यांनी त्यांच्यापर्यंत न पोहोचणाऱ्या विकासाचा कडबा चघळायचा.

तर योगीबाबांनी सर्व साधूंना अर्थात त्यांचं राजकारण पुढं नेणाऱ्या भगव्या वस्त्रातील साधूंना एक जानेवारी २०१८ पासून मासिक सहा हजार रुपये पेन्शन देण्याची घोषणा केली आहे. हा लेख लिहून संपेपर्यंत या घोषणेची अंमलबजावणीही सुरू झालेली असेल. आता ज्या साधूंना घरदार असत नाही, मोह असत नाही त्यांच्यासाठी ही माया कशासाठी? समाज या साऱ्यांना रोज तुपातलं जेऊ घालतो. त्यांच्यासाठी पायघड्या टाकतो. त्यांच्यासाठी मोठमोठे मठ बनवतो. मठासाठी टाटांइतकी संपत्ती जमवतो. त्या सर्वांना आता मासिक पेन्शन कशासाठी असा प्रश्न होईल; पण जेथे श्रद्धा असते तेथे प्रश्न उभाच करायचा नसतो या न्यायानं बघायला हवं. साधू कोण होतात, ते कसं जगतात, मोहमायापासून दूर झालेले हे लोक माया जमवण्यात कसं पुढं असतात, हेही साऱ्यांनाच ठाऊक आहे; पण तरीही यांना त्यागी माणसाचा दर्जा दिला जातोय. उद्या यांना प्रवास, आरोग्य, अन्नपाणी सारं मोफत दिलं जाईल. खरं तर ते आजच आहे. रांगेत राहून रेल्वेचं तिकीट काढणारा कोणी साधू पाहिलाय, आधारकार्डासाठीच्या रांगेत थांबलेला आणि रोजगार हमीवर जाऊन काम करणारा कोणी साधू पाहिलाय, ज्यांच्या इस्टेटी प्रचंड आहेत त्यांना टॅक्स भरताना कोणी पाहिलंय. भारत श्रीमंत संन्याशांचा देश आहे. एकेका राज्याच्या अर्थसंकल्पात बसेल एवढी माया त्यांच्याकडे आहे. तरीही राज्यातला पैसा जणू काही आपल्या बापाच्या मालकीचा असल्याचं ठरवत या भगव्यांना पेन्शन सुरू झाली. कुपोषणाने ज्यांची पोरं मरतात, मातीनं दगा दिला म्हणून जे आत्महत्या करतात, गाव जगवत नाही म्हणून जे शहरातल्या फूटपाथवर संडास उशाला घेऊन झोपतात, नोकरी मिळत नाही म्हणून जे आत्महत्या करतात, यूपीत पोट भरत नाही म्हणून जे स्थलांतर करतात त्यांच्यापैकी कोणाला पेन्शन सुरू करावी असं योगींना आणि त्यांच्या नमोमंत्राला वाटणार नाही; कारण हा देश सामान्य माणसाच्या मालकीचा करायचा नाही तर देशाची पिळवणूक करत आणि भगवे घातल्यानं साधू होता येतं असं सांगत फिरणाऱ्या फुकटचंबू बाबूरावांच्या मालकीचा करायचा आहे. कुणी सांगावं उद्या पेन्शन मिळतेय म्हणून बोगस साधूंची फौज तयार होईल आणि उल्हासनगरमध्ये डुप्लिकेट साधू किंवा झेरॉक्स साधू जन्माला घालायचं काम सुरू होईल. काळाला मागं नेणाऱ्या आणि सनातन प्रवृत्तीलाच धर्म म्हणणाऱ्या या लोकांना कसं रोखायचे हाच एक प्रश्न पंक्चरवाल्यासमोर कधीपासून उभा आहे. ट्यूबमधली हवा ऐन थंडीत कमी झाली; पण पंक्चरची जागा सापडू नये असा हा मामला आहे.

# उद्याचा तरुण भारत मनोरुग्णांच्या विळख्यात



'इंडिया दौड रहा है', 'इंडिया इज शायनिंग', 'चलो एक नया भारत बनायेंगे' अशा घोषणा करून पोत्या-पोत्याने मते गोळा करणाऱ्यांसाठी एका संशोधनानं धक्का दिला आहे. इतका की घोषणा करणाऱ्यांचाच भेजा सैल व्हावा किंवा त्यात पाणी व्हावं किंवा त्यात व्हायरस व्हावेत. या साऱ्याचं एकच कारण म्हणजे जागतिक आरोग्य संघटनेनं केलेल्या पाहणीत देशातील पंचवीस टक्के किशोरवयीन मानसिक आजारांनी पछाडले आहेत. सार्वत्रिक पसरलेला जगातील हा दोन नंबरचा मोठा आजार आहे. 'एक्झाएटी डिप्रेशन' या नावानं तो ओळखला जातो. येत्या चार-पाच वर्षात तो आपला प्रभाव महिला, तरुणी आणि तरुण यांच्यापर्यंत पोहोचवणार आहे. २५ टक्के हा आकडा काही छोटा नाहीय. २५ टक्के उद्याचा भारत यात गुंतला आहे. मानसिक आजार घेऊनच तो पुढं जाणार आहे. त्याचाच नवा देश, नवा समाज बनणार आहे. मानसिक पीडेत अडकलेला उद्याचा हा समाज किंवा उद्याचा हा देश कसा असेल याची कल्पनाही भयावह वाटते.

हा आजार आणि त्याची व्याप्ती आज कळली असली तरी त्यानं नव्वदीनंतर आलेल्या जागतिकीकरण आणि त्यातून काँग्रेसच्या गवताप्रमाणे वाढणाऱ्या स्पर्धेत जन्म घेतला आहे. नवं जग स्पर्धेवर उभं आहे. त्याचा प्रारंभ, मध्य आणि शेवटही स्पर्धाच आहे. श्वास, ध्यास आणि एकूणच जगण्यासाठी या चिमुकल्यांना आणि तरुणांना स्पर्धाच करावी लागते. जो एक पाऊल मागं पडतो तो जणू काही संपतोय. त्यातून साऱ्यांनाच तग धरून राहता येत नाही. त्यासाठीची क्षमता साऱ्यांकडेच असत नाही. जे अगदीच व्याकूळ, घायाळ होतात ते मरणाला मिठी मारतात. आपण विवंचनेतून, हरण्यातून, जखमांतून, धावण्यातून सुटलो एकदाचे अशा भ्रमातच मरण पावतात. शेतकऱ्यांपेक्षा ते काही कमी नाहीत. चिल्लर पार्टी म्हणून व्यवस्था त्यांची दखल घेत नाही. इंडियाला खोटे खोटे पळवणारेही त्याची दखल घेत नाहीत. किशोरवयीनांच्या साऱ्या विवंचना, त्यांना घेरलेले रोग आणि त्यांच्या मरणकळा सारं काही व्यवस्थेकडून दुर्लक्ष केलं जातं.


स्पर्धेच्या काळात मुलांकडून इतक्या अपेक्षा केल्या जातात की, जणू काही त्यांचं रूपांतर गोल्फवरील रेसच्या घोड्यात होतं. रेसवर आपापली घोडी उतरवणं आनंददायी असलं तरी सर्वच घोडी काही विजयी होत नसतात हे मान्य करणंही आवश्यक असतं. व्यवस्था आणि त्यातही पालक हे मान्य करत नाहीत. घोडे मागं पडले किंवा हरलं तर ते खचून जातं. घरात आणि बाहेर त्याला मिळणारी इज्जत कमी होते. जिंकणारी घोडी हरलेल्या घोड्याला लाथा मारायला लागतात. या साऱ्या चक्रव्यूहातून बाहेर पडणं कठीण होतं. मानसिक अस्वस्थतेतून बाहेर पडणं कठीण होतं. मानसिक अस्वस्थता वाढत जाते. स्पर्धेची भीती वाटायला लागते. जगण्याची भीती वाटायला लागते. घोड्याच्या मालकानं म्हणजे पालकांनी लादलेल्या अपेक्षांचं ओझं टोचायला लागतं. रक्तबंबाळ करतं. जुन्या आणि नव्या अपेक्षा गँगरिनसारख्या अखंड वाहणाऱ्या जखमा तयार करतात. त्या चिघळत वाहतात. वेदनांच्या महापुरात स्वप्नं, अपेक्षा, ध्येये वाहून जातात. आयुष्यही असंच वाहून जातं आणि चिकटतं कुठंतरी दूरवर किनाऱ्याला. स्पर्धेला मात्र हे दिसत नाही. ती चालूच राहते एल.आय.सी.च्या घोषणेप्रमाणं 'मरने के बाद और मरने के पहले ही...' खरं तर एल.आय.सी. बहुतेक वेळा मरणानंतरच धावत येते मढं शोधायला. असो तर स्पर्धा बहुतेक वेळा विषम परिस्थितीत होत असते. म्हणजे सबल विरुद्ध दुर्बल, मठ्ठ विरुद्ध हुशार, खासगी विरुद्ध सरकारी, फूटपाथ विरुद्ध एक्स्प्रेस हायवे, लोकशाही विरुद्ध झुंडशाही, भांडवलशाही विरुद्ध सर्वहारा. या स्पर्धेत कुणी जिंकायचं हे अगोदरच ठरलेलं असतं. कुणी हरायचं हेही ओघानंच ठरतं. हरणाऱ्यांचं जग हरतच जातं आणि जिंकणाऱ्याचं जग कळसावर बसून वाकुल्या दाखवू लागतं. यालाच म्हणतात 'जागतिकीकरण आणि सब का ऱ्हास, किस किस का विकास'.

स्पर्धेत आणि जगण्याच्या टंचाईत चिल्लर पार्टीचाच स्क्रू ढिला होतोय असं नव्हे तर प्रत्येक दहामागे आठ लोक अस्वस्थतेचा विकार घेऊन जगत आहेत. जर ती विशिष्ट एका बिंदूवर रोखली नाही तर स्क्रू आणखी ढिला होतो. वेडेपणाची अवस्था सुरू होते. कदाचित व्यवस्थाही त्याचीच प्रतीक्षा करत असेल. तसं झालं तर मनोरुग्ण तज्ज्ञांच्या मेडिकलमधील जागा वाढवता येतील. वेड्यांची हॉस्पिटल काढता येतील. मूळ रोग कायम ठेऊन हे सारे प्रयत्न होतील. या साऱ्या चिकटपट्ट्या लावल्या जातील. रद्दीपासून तयार केलेलं कोणतं तरी एक कार्ड काढलं जाईल. पंतप्रधानांचं नाव त्याला दिलं जाईल. कार्ड जो वापरेल त्याला वेड्यांच्या इस्पितळात जागा राखीव ठेवल्या जातील. इस्पितळ चालवणाऱ्या मल्टिनॅशनल कंपन्यांचं भलं होईल आणि तसं झालं तर इंडिया भाग रहा है, दौड रहा है असं म्हणता येईल. साला सारी जिंदगीच पंक्चर होईल की...

# भाजप-शिवसेना युती दीर्घकालीन नुरा कुस्ती




**दौड** होणार नाही, होणार नाही असं क्रोधगीत गात जी पुन्हा होते ती भाजप-शिवसेना युती असते. गेली तीस वर्षे महाराष्ट्र हे सारं मौन धारण करून पाहत आला आहे. यंदा तर 'होणार नाही' हे गाणं थोडं जास्तच झालं. युती सत्तेवर आल्यापासून तुटीची भाषा सुरू झाली; पण भाजपनं ते जुमानलं नाही. काही झालं तरी शिवसेना सत्तेची ऊब सोडणार नाही याची त्याला खात्री होती. जनावर दिवसभर कितीही भरकटलं तरी रात्री युतीच्या गोठ्यालाच येतं हे भाजपला ठाऊक होतं. गेली पाच वर्षे शिवसेना सातत्यानं भाजपवर गरळ ओकत राहिली आणि भाजप शिवसेनेवर...! लोक हे सारं पाहत होते. हे सारं असंच चालणार असं म्हणत शांत बसायचे. कधी कंटाळा आला किंवा मनोरंजनाची गरज निर्माण झाली तर युतीची भांडणं ऐकायचे. कधी शिवतीर्थावर, कधी रेशीम बागेजवळ तर कधी विधिमंडळाच्या बाहेर नुरा कुस्ती चालू असायची. भवानी, अंबाबाई, श्रीराम, छत्रपती शिवाजी वगैरेंचा जयघोष करत ही कुस्ती चालायची. कोल्हापुरातून खास बनावटीच्या लंगोटा नेसल्या जायच्या. बारामतीतल्या कारखान्यातून तिळाचं खास तेल मागवलं जायचं. दोन्हीही पैलवानांच्या अंगावर तिळाचं तेल चमकायचं. कुस्तीच्या आखाड्याला भगवा रंग दिला जायचा. दोन्हीही पैलवानांनी सामुदायिकरीत्या या रंगाचं पेटंट घेतलंय. तिकिटाऐवजी पक्षवर्गणी भरलेले दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते कुस्ती पाहायला जमायचे. बेटिंगचा धंदा जोरात यायचा. कोण जिंकणार, कोण हरणार हे ठरवण्यासाठी 'शोले' सिनेमात जय वापरणारा शिक्का घेतला जायचा. या नाण्याच्या दोन्ही बाजूला काटाच असतो. ज्यांनं मुख्यमंत्री आणि लोकसभेचे सभापतिपद भोगल्यानंतर आता पाहण्यासारखं काहीच उरलं नाही म्हणून डोळ्यावर काळ्या रंगाचं कापड ओढून घेतलं. जे पूर्वी कोहिनूर मिलमध्ये तयार व्हायचं. बंद पडलेल्या मिलची आठवण म्हणून मनोहरपंतांनी हे कापड जपून ठेवलंय. प्रत्येक कुस्तीच्या वेळी म्हणजे निवडणुकीच्या अगोदर खेळल्या जाणाऱ्या कुस्तीच्या वेळी त्यांनाच पंच म्हणून नेमलं जातं. दोन्हीही पैलवानांचा त्यांच्यावर विश्वास आहे. ते शरीरानं शिवसेनेत आणि स्वभावानं भाजपमध्ये असतात. कुस्तीसाठी खूप खूप गर्दी जमवली जाते. दोन्हीही पक्ष आपापल्या कार्यकर्त्यांना आदेश काढतात. शिट्ट्या वाजवणाऱ्यांची कमतरता नको म्हणून दरवेळेला हे काम छगन भुजबळ यांच्याकडे दिलं जातं. कुस्ती होणारच नाही, असं नारायण राणे वारंवार सांगत असतात. पण कोणत्याही शापांशिवाय, भाकिताशिवाय कुस्ती होतेच. आखाड्यातला एकही पैलवान ज्यांना दिसत नाही ते पंच कुस्ती बरोबरीत सुटली असं जाहीर करतात. बरोबरीत सुटली म्हणजे दोघेही पैलवान विजयी झाले. आई अंबाबाईच्या कृपेनं कोणताही पैलवान हरत नाही; कारण दोघांनी मिळूनच तसं ठरवलेलं असतं. दोघेही विजयी. एक जण आरएसएसचा पट्टा असं म्हणत एका पायावर उभा राहून छाती रूंद करत शड्डू ठोकतो, तर दुसरा मर्द वाघाचा पट्टा असा म्हणत शड्डू मारतो. यावेळी विधिमंडळाची दारे बंद असतात. शड्डूचा आवाज तेथपर्यंत पोहोचत नाही. या साऱ्याला 'नुरा कुस्ती' म्हणतात. सतत तीस वर्षे तरी खेळल्यामुळे भाजप आणि शिवसेना दोघेही त्यात पारंगत झाले आहेत. स्वबळाची भाषा करण्यात त्यांना लाजरेपणा वाटत नाही. ज्यांच्याकडे स्वबळ नसते तेच युतीच्या कुबड्यांना हिंदुत्वाचा रंग देऊन एकत्र येतात. स्वबळाची भाषा आणि त्यामागं उसनं अवसान आणून उभं केलेलं शौर्य गळून पडलेलं असतं. गंमत म्हणजे आपण हे जे करतो ते जनतेला दिसत नाही आणि ते कळत नाही असं दोन्हीही पैलवानांना वाटत असतं. यंदाही शिवसेनेने सातत्यानं एखाद्या सवतीप्रमाणे भाजपबरोबर नातं ठेवलं. सातत्यानं हल्लाबोल केला. भाजपच्या उमेदवारांविरुद्ध निवडणुका लढवल्या. पंतप्रधानांना चौकीदार, चोर म्हटलं. लोकांना वाटत होतं की युती तुटणार. पण लोकांचा हा विचार भाबडेपणावर उभा होता आणि राजकारण काही भाबडेपणावर चालत नाही. राजकारणाचे सिद्धांतच वेगळे असतात. कधी मिठ्या मारत एकमेकांना संपवलं जातं तर कधी ना-ना करत हा-हा कडे ते नेलं जातं. हे सारे घडत असताना एकच चूक त्यांच्याकडून होते आणि ती म्हणजे आपण डोळे मिटून मांजरीप्रमाणे दूध पीत असलो तरी लोक मात्र आपल्याकडे पाहत असतात हे ते विसरतात. डोळे मिटले काय आणि डोळ्यात सत्तेचा मोतीबिंदू वाढवून ते बंद केले काय पब्लिक मात्र पाहत असतेच. ●●●



# ग्रेट थॉट्स

माझा धर्म अगदी साधा आहे. 'माझा धर्म दयाळूपण आहे.'
**– दलाई लामा चौदावे**






राग न येऊ देता रागावर विजय मिळवा, दुष्टावर चांगुलपणाने विजय मिळवा, औदार्याने कंजुषपणाला जिंका आणि खरे बोलून खोट्यावर विजय मिळवा. **– गौतम बुद्ध**

शिक्षण हे जगातील सर्वात शक्तिशाली शस्त्र असून जग बदलण्यासाठी ते वापरता येते.
**– नेल्सन मंडेला**






खरी शांतता जगात पोहोचवायची असेल तर मुलांना शिकवायला सुरुवात केली पाहिजे.
**– महात्मा गांधी**



एक उत्कृष्ट पुस्तक शंभर चांगल्या मित्रांबरोबर असतं. परंतु एक चांगला मित्र एका वाचनालयासमान असतो.
**– एपीजे अब्दुल कलाम**

एखादं काम अर्ध्यावर सोडून देणं हा आपला सर्वात मोठा दुबळेपणा आहे. आणखी एक वेळ प्रयत्न करणे हा यशाचा अगदी हमखास मार्ग आहे. **– थॉमस एडिसन**





आपल्या मालकीची प्रत्येक गोष्ट आपल्याकडेच येत असते, ती मिळवण्यासाठी आपण तशी क्षमता निर्माण केली तर!
**– रवींद्रनाथ टागोर**

# कोण काय बोलतं...



नारायण राणेंवर मनी लॉँड्रींग प्रकरणात तुरुंगात जाण्याची व त्यांच्या १९२ कंपन्यांच्या चौकशीची वेळ आल्यानेच ती थांबविण्यासाठी त्यांनी भाजपसमोर लोटांगण घातले.

**– विनायक राऊत,** शिवसेना खासदार



खेड्यातील कुस्तीपटूवर लक्ष देण्याची गरज आहे.

**– विनेश फोगट,** कुस्तीपटू



मराठवाडा वैधानिक विकास मंडळ जिवंत ठेवण्याची सरकारचीच इच्छा नाही.

**– कृष्णा भोगे,** माजी सनदी अधिकारी



अपेक्षित आर्थिक वृद्धी गाठण्यासाठी भारताला मोठ्या बँकांची गरज आहे.

**– अरुण जेटली,** अर्थमंत्री



धर्मनिरपेक्षता हाच भारतीय राज्यघटनेचा आत्मा आहे.

**– डॉ. सदानंद मोरे,** संत साहित्याचे अभ्यासक



धर्मभावना अस्मितेची हत्यारे झाल्यामुळे धर्मा-धर्मात तेढ निर्माण झाली आहे.

**– किशोर बेडकिहाळ,** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते



देश सर्वात महत्त्वाचा; त्यानंतर क्रिकेट, त्यामुळे भारताने पाकिस्तानविरुद्ध क्रिकेट सामना खेळूच नये.

**– हरभजनसिंग,** क्रिकेटर



आता निवडणुका आल्यात. सत्ताधारी आश्वासनाचा पाऊस पाडतील. त्यामुळे जनतेने या फसवणुकीपासून सावध राहिले पाहिजे.

**– अशोक चव्हाण,** खासदार




कोणत्याही पुरस्कारावरून व्यक्तीचा दर्जा ठरवला जाऊ नये.

**– वीणा गवाणकर,** लेखिका



देशाला पदकं मिळवून देण्यासाठी मी मेहनत घेते. त्यामुळे मला नेटिझन्सकडून देशभक्ती शिकण्याची गरज नाही.

**– सानिया मिर्झा,** टेनिसपटू



सुख-शांती आणि समाधानासाठी पत्नीवर प्रेम करा आणि आई-वडिलांची सेवा करा.

**– अक्षयकुमार,** अभिनेता



पंतप्रधानांना चौकीदार 'चोर' म्हणून हिणवणारे शिवसेना पक्षप्रमुख स्वत:च चोरांच्या टोळीत सहभागी आहेत.

**– जोगेंद्र कवाडे,** पिरिपा अध्यक्ष

पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

## वार्षिक वर्गणीदारांना

२०%

## सवलत!

**देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक**

---

**हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!**

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदाराचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा :
कार्यालय : ११ तळमजला, बी ब्लॉक, लक्ष्मी निवास,
जे.के. सावंत मार्ग, यशवंत नाट्य मंदीरा समोर,
माहीम (वेस्ट), मुंबई- ४०००१६

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ६०० | ५०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ३०० | ३०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | १५० | १५० | |

(वार्षिक विशेषांक - ६) / (६ महिने-३)

चेक किंवा डीडी ने पेमेंट

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. -------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ---------------

चेक/डीडी क्र. --------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : ------------------------------ जन्म तारीख : --------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : ---------------------------------------------------पत्ता : ---------------------------

-------------------------------------------------------शहर : ---------------------------------------

राज्य : ----------------------- पिन कोड : ----------------- फोन नं. (घर) : -------------------------

मो. नं. : ----------------------इ-मेल : ----------------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता
२९ ऑगस्ट ते १२ सप्टेंबर २०१८

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६३ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

www लॉग ऑन करा www.thepeoplespost.com

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.

■ POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
■ RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

